म. ग्र. म. ठाण
य भू-प्रवास
नं.



FBK-0010791

म. भी. थोरात

# पदयात्रा

## ( केरळ ते काश्मीर )

# पदयात्रा

## ( केरळ ते काश्मीर )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४४०८ वि: ...
क्रमांक ........: लेखक : नों: दि: २३/३/६०.
९०७४
२५४

आ. भी. थोरात

REFBK-0010791
REFBK-0010791

ग्रंथ संग्रहालय ठाणें
९०५९१
(स्थळ प्रत)

विक्रेते :

**श्री लेखन वाचन भांडार,**

गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

★

किंमत : दीड रुपया

प्रकाशक :

**ग. ल. ठोकळ,** बी.ए., बी.टी.

ठोकळ प्रकाशन,

६२ बुधवार, पुणें २.

आवृत्ति पहिली : १९५९

मुद्रक :

**मा. प. तळेकर,**

श्री दत्त मुद्रणालय,

३३५ शनिवार पेठ, पुणें २.

भू-प्रवास
२३।३।६०
२६५४०८
२५४

पंडित राहुल सांकृत्यायन

यांसी

सादर समर्पण !

# प्रवासाविषयीं थोडेंसें

अनेक मित्रांना प्रवासास जाण्याची हौस असते. या पुस्तकाच्या वाचनानें तर ती अनावर होईल असें मला वाटतें. परंतु त्याचबरोबर त्यांना मार्गांतील अनेक अडचणींची भीतीहि वाटत असते. या अडचणी कोणकोणत्या असतात आणि त्या आल्या असतांना काय करावें, याबाबत मला आलेले अनुभव होतकरू पदयात्रींस मार्गदर्शक होतील असें वाटतें.

( १ ) पैशांची अडचण, ( २ ) वेळेची अडचण, ( ३ ) भाषेची अडचण, ( ४ ) हवामान मानवण्याचा प्रश्न व ( ५ ) प्रवासाहून आल्यानंतर पुढें उभे राहणारे अनेक सांसारिक कठीण प्रश्न. ढोबळ मानानें फक्त एवढ्याच प्रमुख अडचणी आहेत.

माझ्या अनुभवापुरतेंच बोलायचें तर वरील सर्व प्रश्नांचीं पुष्कळच समर्पक आणि अनुभवसिद्ध उत्तरें मी देऊं शकेन. पहिला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पैशांचा. तो मीं कसा सोडविला ? मीं हा सर्व प्रवास पैशांशिवाय केला. माझ्या नऊ महिन्यांच्या प्रवासांत तसा एकूण दोन ते तीन हजार रुपये खर्च झाला. परंतु घरून मीं फक्त दोन-तीन रुपयेच घेतलेले होते.

व्याख्यानें देणें, शिल्पकलेची आणि चित्रकलेची माहिती देणें, व्ह्यू मास्टर प्रोग्रॅम करणें, हिचहायकिंगच्या मार्गानें प्रवास करणें, निरनिराळ्या धार्मिक संस्था आणि विद्यार्थी यांच्याकडून मदत मिळविणें, जरूर तेथें पायीं प्रवास व उपासमारहि मीं सहन केली. प्रवास म्हटला कीं, त्यांत त्रास व दगदग ही असणारच ! ती टाळून मजाहि येत नाहीं. उलट या दगदगींतच एक प्रकारची मौज असते. अशा प्रकारें साधारणपणें पैशांचा प्रश्न सोडवितां येतो. इतरहि पुष्कळ मार्ग वेळेवर सुचतात. उदा० जादुगार रघुवीर यांच्या जादूचे प्रयोग शिकण्यासारखे आहेत. फोटोग्राफी किंवा अशाच प्रकारची एखादी कला हस्तगत करतां आल्यास फारच उत्तम !

दुसरा प्रश्न वेळेच्या अडचणीचा. ही गोष्ट संपूर्णपणें प्रवाशाच्या मनावर अवलंबून आहे. मनोनिग्रह आणि आत्मविश्वास असला कीं हा प्रश्न सुटतो. प्रवाशी तरुणावर जर कांहीं कुटुंबांतील व्यक्ति अवलंबून असतील तर त्यानें त्यांची कांहीं थोडीफार व्यवस्था आपल्या गैरहजेरींत उपयोगी पडेल अशी करून ठेवतां आल्यास जरूर करावी. नाहीं तर नाइलाजानें त्यांना स्वयंपूर्ण होण्यास सांगावें. शक्य तर लौकर विवाहाच्या भानगडींत पडूं नये. कोणत्याहि चांगल्या कार्यासाठीं त्याग करावा लागतो, हें कधींहि विसरूं नये. प्रत्येक प्रवाशानें 'घुमक्कड शास्त्र ' हें महापंडित राहुलजी यांचें पुस्तक मात्र अवश्य वाचलें पाहिजे. त्याचा प्रवाशास आत्मविश्वास वाढविण्याच्या कामीं फार मोठा उपयोग होतो.

तिसरा प्रश्न भाषेचा. इंग्रजी, हिंदी आणि मातृभाषा ह्या तीन भाषा साधारण आल्या कीं, प्रवासी देशांतल्या कोणत्याहि प्रांतांत संचार करूं शकतो. स्थानिक सर्व भाषा शिकूं म्हटलें तर ती कठीण गोष्ट आहे. देशांत अनेक भाषा आहेत. परंतु वरील तीन भाषा मात्र आल्याच पाहिजेत. त्याशिवाय प्रवासांत फार अडचणी येतील आणि ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीनेंहि फार तोटा होईल.

चौथा प्रश्न हवामानाचा. प्रवासी हा धडधाकट असावा. मी याला अपवाद आहें. माझी तब्येत अगदींच साधारण आहे. परंतु सर्व प्रवासांत म्हणण्याजोगा आजार मला कधींच आला नाहीं. संवयीनें हाहि प्रश्न सुटतो.

पांचवा आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे एक मोठेंच प्रश्न-चिन्ह आहे. याचें उत्तरहि अवघड आहे. परंतु निश्चय आणि साहस असेल तर हाहि प्रश्न मोठा नाहीं. प्रवासांत खूप ज्ञान मिळवावें, त्याचा उपयोग या प्रश्नाचें उत्तर देण्यास हमखास होतो. चांगला प्रवाशी, लेखक, कवि, चित्रकार अगर असाच कोणी कलावंत होऊं शकतो, आणि मग पैशांचा अगर पुढें काय, हा प्रश्न त्याच्या पुढें उभाच राहात नाहीं. प्रवास करून आल्यानंतर एकदोन प्रवासवर्णनें लिहिणें, हें कांहीं फारसें कठीण काम नाहीं. त्यावर थोडा-फार पैसा मिळण्याची शक्यता असते. त्या अवधींत जोडीला दुसरे प्रयत्न चालू ठेवल्यास हा प्रश्न सुटेल. अशा प्रकारें माझ्या प्रवासीबंधूंना माझें

मार्गदर्शन आहे. याचा त्यांनीं होईल तेवढा उपयोग करावा. जें उपयोगी नसेल तें सोडून द्यावें.

पदयात्रा करतांना जशा माझ्या मार्गांत अडचणी होत्या, तशाच 'पदयात्रा' लिहितांनाहि होत्या. त्या जर तशाच राहिल्या असत्या, तर वाचकांना या 'पदयात्रेंत' अनेक ठिकाणीं ठेंचाळत जावें लागलें असतें. परंतु या पुस्तकाचे प्रकाशक, श्री. ग. ल. ठोकळ, यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन माझा मार्ग सुखकर करून ठेवला. पुस्तकांतील शुद्धलेखनापासून तों प्रसंगीं शैली सांवरण्यासहि त्यांनीं कांहीं ठिकाणीं मला साथ केली आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

मु.—कासारवाडी<br>
पो.—दाणूर<br>
ता.—सिन्नूर<br>
जि.—नाशिक

— मा. भी. थोरात

# अनुक्रमणिका


पहिलें *दक्षिणेंतील काश्मीरकडे* १–९

उंबरघाट – केरळची अजब तऱ्हा – अवघड गणित – प्रस्थान – कोल्हापूर – महालक्ष्मीचें मंदिर – खुळी समजूत – जुना राजवाडा शालिनी पॅलेस – नवा राजवाडा – म्यूझियम – राधानगरी – फोंडाघाटांतील प्रसंग.

दुसरें *कणकवली ते मालवण* १०–१५

कणकवली – गोपुरी आश्रम – गोबर गॅस – हिचहायकिंग – पहिलें व्याख्यान – लिखाणाची स्फूर्ति.

तिसरें *मालवण ते वेंगुर्लें* १५–२८

मालवण – सिंधुदुर्ग – आम्हांला अत्यानंद देणारी गोष्ट – अघेलीचा रिवाज – स्त्री-राज्यांत प्रवेश – वादळ – हवामानखात्याचा अंदाज – कोंकणांतील खेडें – फुरसेंमिया व मणियारबाबू – महाराष्ट्राचें श्रीनगर – दंतकथा – यमदूत कीं देवदूत ?

चौथें *वेंगुर्लें ते सावंतवाडी* २८–३५

अविस्मरणीय स्वागत – मास्तरची व्याख्या – शिरोडा – दुर्दैवी कामगार – यशवंतगड – गोव्याच्या द्वीवर – सावंतवाडी – बांदें – विषाची परीक्षा – प्रवासांतील पहिलीच अडचण.

पांचवें *कर्नाटकांतील सफर* ३५–४०

बेळगांव – बेळगांवचा किल्ला – यल्लूरगड – गोकाक – अविस्मरणीय स्थळ – झुलता पूल.

सहावें *गोल घुमटाच्या परिसरांत* ४१–४९

विजापूर – गोल घुमट – स्वर्गाचा प्रवास – टेंभा विझला ! – अंगांत आलें ! – इब्राहिम रोझा – अलि रोझा – आसर महाल – मुल्कमैदान तोफ – दारूकाम.

सातवें *बदामीचीं नैसर्गिक रंगीत लेणीं* ४९–५१

लेणीं – तांडव नृत्य – कन्नड हुडगी – हुबळी येथें विनोबांची भेट.

आठवें *गिरसप्पाचें जगविख्यात दृश्य* ५२–५५

गिरसप्पा धवधवा – शरावतीची उडी – ट्रॉली – गिरसप्पा गांव.

नववें *कर्नाटकांतील जैनमंदिरें व मूर्ति* ५६–६४

आश्चर्यकारक मूर्ति – होनावर – कर्नल हिल – भुतांच्या – विहिरींत – जैन काशी – सात कोट रुपये – चोरट पॅलेस – पंचनारी तुरग – कार्कल येथील गोमटेश्वर – वेणूरचा गोमटेश्वर – प्रवाशांचें आश्रयस्थान – मंगलोर – केरळचें प्रवेशद्वार.

दहावें *केरळचीं पदयात्रा* ६५–८१

केरळचें सौंदर्य – कासरगोड – मवाल्यांच्या जाळ्यांत सांपडलों – बेकल फोर्ट – अस्पृश्यांसाठीं मंदिरें – स्वामी विवेकानंदांची भेट – कॅन्नूर – त्रिचूरचे रिक्षावाले – जोरसे चलाव ! – कम्युनिस्ट – पार्टी – सर्कसच्या तंबूत – अर्नाक्युलम् – आलेप्पी – गुजराथी शाळा – दक्षिणेकडील श्रीनगर – क्विलॉन – एल्फंटा – विचित्र रोग – त्रिवेंद्रम् – इकडची फॅशन – प्राणिसंग्रहालय – पदार्थ संग्रहालय – असेंब्लीचें कामकाज – कोच्यिम्‌चा रुपेरी मानस्तंभ – येथील कांहीं विचित्र रिवाज –

अकरावें *उत्तरेकडील पदयात्रा* ८१–९३

थोडेंसें पूर्वी – सांची – आग्रा – आयुष्यांतील तो दिवस –– मी गुन्हेगार बनलों ! – कुतुबमिनार – लोहस्तंभ – लाल किल्ला – दिवाण-इ-आम – रंगमहाल – जुम्मा मशीद – थोडें हिमालय-दर्शन.

बारावें *महाराष्ट्रांतील अपूर्व शिल्पदर्शन* ९३–१०२

वेरूळ व अजंठा – दौलताबाद किल्ला – किल्ल्यांतील पांच गुप्त मोक्याचीं ठिकाणें – शिल्पकलेचा कळस. – अजिंठा–चित्रकलेचा कळस – लेणीं प्रकाशांत कशीं आलीं ? – बुद्धाची मूर्ति – पद्मपाणि बुद्ध.

● ● ●

# आमचें चरित्रवाङ्मय

***

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. मानवतेचे पुजारी | भा. १ | —ना. ध. पाटील | १·५० |
| २. ,, ,, | ,, २ | ,, | १·५० |
| ३. ,, ,, | ,, ३ | ,, | २·०० |
| ४. ,, ,, | ,, ४ | ,, | २·०० |
| ५. आजच्या गोष्टी | भा. १ | —के. नारखेडे | १·०० |
| ६. ,, ,, | ,, २ | ,, | १·०० |
| ७. ,, ,, | ,, ३ | ,, | १·०० |
| ८. जगाचे प्रवासी | ,, १ | —श्री. म. माटे | १·२५ |
| ९. ,, ,, | ,, २ | ,, | १·२५ |
| १०. ,, ,, | ,, ३ | ,, | १·२५ |
| ११. बारा शास्त्रज्ञ | | ,, | ३·५० |
| १२. महात्मा फुले | | —ए. के. घोरपडे | २·०० |
| १३. बाबासाहेब आंबेडकर | | ,, | २·०० |
| १४. कर्मवीर भाऊराव पाटील | | ,, | २·५० |
| १५. कोल्हापूरचे शाहू छत्रपति | | ,, | २·०० |
| १६. महर्षि आइन्स्टीन | | —अमरेन्द्र गाडगीळ | ०·५० |
| १७. अहल्याबाई होळकर | | —वा. दा. गोखले | ०·७५ |
| १८. वीर विनायक | | —वा. गो. देशपांडे | २·०० |


## श्री लेखन वाचन भांडार,

गणपती चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

१०७७९ २४.४०८ भू-प्रवास
२०५८ २३/३/६०

# दक्षिणेंतील काश्मीरकडे

: १

**उंबरघाट :** प्रवासाचें माहात्म्य सांगण्याची ही वेळ नव्हे, परंतु गुरूची आठवण करण्यास हवी ना ? कुठल्याहि शुभ कार्याचा प्रारंभ गुरुस्मरणानें करावा.

" सैर कर दुनियाकी गाफील जिंदगानी फिर कहाँ ? ।
जिंदगी अगर रही तो नवजानी फिर कहाँ ! "

या माझ्या गुरूच्या संदतीस अक्षरी मंत्रानें मी अगदीं भारावून गेलों होतों. जगांत प्रयत्नाइतकेंच योगायोगांना महत्त्व असावें असें मला वाटतें. महापंडित राहुल सांकृत्यायन यांचें ' घुमक्कड शास्त्र " हें पुस्तक जर मला लवकर, म्हणजे लहान वयांत वाचावयास मिळालें असतें, तर आजपर्यंत मीं भारताचाच काय परंतु जगांतील अनेक देशांचा प्रवास करून आलों असतों. परंतु असें झालें नाहीं. योगायोगानें हें पुस्तक मला फार उशीरा वाचावयास मिळालें. वेळ अजूनहि गेलेली नव्हती. परंतु पायांत लग्नाची बेडी पडलेली होती. अशा या कैद्यांना ऐन तारुण्यांत ' उंबरघाट ' ओलांडतां येत नाहीं. पोलादी सांखळीपेक्षां मजबूत व खैबरघाटापेक्षां उंच अशी ही बेडी व हा घाट असतो. परंतु माझी अशी खात्री आहे कीं, जो कोणी तरुण राहुलजींचें वरील पुस्तक वाचील तो या सर्व पाशांतून मुक्त होण्यास समर्थ झाल्याखेरीज राहणार नाहीं. माझें असेंच झालें. भारताचा प्रवास करण्याची; माझी



बालपणापासूची उत्कट इच्छा होती. वयाबरोबर ही इच्छाहि वाढत होती. आजूबाजूच्या परिस्थितींत बदल होत होता. आज नवभारताच्या उभारणीचें कार्य चालू आहे. देशाच्या राजसत्तेंत मोठें स्थित्यंतर घडलें आहे. इतकेंच नाहीं, तर आज सर्व जगाचें लक्ष आपल्या देशाकडे विशेषतः केरळ प्रांताकडे लागलें आहे.

**केरळची अजब तऱ्हा :** जगांतील सर्व वर्तमानपत्रांतून रोज कांहींना कांहीं तरी केरळची बातमी असतेच. भारताच्या दृष्टीनें विचार करतां केरळला याहून जास्त महत्त्व अलीकडे प्राप्त झालेलें आहे. देशांतील अनेक पुढारी केरळविषयीं उलटसुलट विचार जाहीरपणें मांडीत आहेत. असें तेथें झालें तरी काय ? हो, झालेंच तसें ! जगाच्या आजपर्यंतच्या इतिहासांत न घडलेली अघटित घटना तेथें घडली आहे. त्या घटनेचे वरील सारे परिणाम आहेत. अशी ही घटना कोणती ? १९५६ ची सार्वत्रिक निवडणूक झाली. काँग्रेसचा तींत पराभव झाला आणि केरळांत कम्युनिस्ट सत्तारूढ झाले. हीच ती अघटित घटना होय. परंतु पूर्वींहि जगांत कम्युनिस्ट सरकारें होतीं. किंबहुना आज जगांतील सर्वांत जास्त बलशाली व पुढारलेलीं अशीं त्यांचींच सरकारें आहेत. असें असतां एवढ्याशा छोट्या प्रांतांत आणखी एक त्यांचें सरकार आलें, यांत आश्चर्य तें कोणतें !

**अवघड गणित :** परंतु दिसतें तेवढें हें गणित सोपें नाहीं. जगांत जेथें जेथें कम्युनिस्ट सरकारें आलीं व तेथील प्रचलित सत्ता गेली तेथें तेथें मोठ्या प्रमाणावर रक्तरंजित सशस्त्र लढा करावा लागला. लाखों लोकांना मरावें व मारावें लागलें. लाखों-करोडों रुपये किंमतीच्या मालमत्तेचा त्यांत नाश झाला. आणखीहि पुष्कळच अनर्थ झाले. जगांत फक्त केरळ हा एकच प्रांत असा आहे कीं, तेथें वरील सर्व अनर्थांशिवाय कम्युनिस्टांना आपली सत्ता प्रस्थापित करतां आली. केवळ मतदानानें, शांततेच्या व सदनशीर मार्गानें जगांत पहिल्या वेळीं फक्त केरळमध्येंच कम्युनिस्ट सत्तारूढ झाले. आणि म्हणूनच ह्या घटनेचें वर्णन मीं अघटित घटना असें केलेलें आहे. असें होण्याचीं कारणें पुष्कळ आहेत. परंतु तो आपला आतांचा विषय नाहीं. केरळ प्रांतांतील सत्तांतरानंतर तो सर्वांच्या चर्चेचा विषय झाला. साहाजीकच माझीहि या प्रांताबद्दल जिज्ञासा वाढली. बोलून चालून मी भटक्या माणूस !

एवढें महत्त्वाचें ठिकाण पाहण्याची इच्छा न होईल तरच नवल! उत्तर भारताच्या प्रवासानंतर मी माझ्या प्रवासाचा मोर्चा केरळच्या दिशेनें वळविला. उत्तर भारतांतील हिमालयपर्वताच्या माझ्या दोन वेळच्या प्रवासांत मला पाहिजे तेवढा वेळ मिळाला नाहीं. या वेळेस मात्र दाक्षिण भारतांत मीं सतत अखंडपणें सहा महिने प्रवास केला.

**प्रस्थान :** या प्रवासाची सुरुवात कोल्हापूरपासून नोव्हेंबर १९५८ मध्यें झाली. सुरुवात करतेवेळीं जरूर तें सामानसुमान घेऊन निघालों. परंतु वाचकांस अश्चर्य वाटेल. या सहा महिन्यांच्या दीर्घ मुदतीच्या प्रवासास निघालेला मी, अवघे तीन रुपये भांडवल घेऊन निघालों होतों. एवढ्या पैशावर काय करावें? यांत काय पाहावें? खावें काय? नि ठेवावें काय? वगैरे नाना प्रश्न माझ्या पुढें आ वासून उभे होते. हे सर्व प्रश्न मीं कसे सोडविले? हें या प्रवासांतील नाना चमत्कारयुक्त हकीकतीबरोबर आपणांस समजेल. तें आपण नंतर पाहूं.

**कोल्हापूर** हें इतिहासप्रसिद्ध शहर आहे. महाराणी ताराबाईनें येथें स्वतंत्र राज्याची स्थापना केली होती. छत्रपति शिवाजीमहाराजांचे वंशज आजहि येथें राहतात. दोन तीन दिवस मी कोल्हापुरला होतों. येथें पुष्कळ प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. त्यांत विशेष प्रसिद्ध अशीं ठिकाणें म्हणजे महालक्ष्मीचें देवालय, दोनतीन नवे व जुने राजवाडे, टाऊन हॉलमधील म्युझियम् वगैरे. प्रथम आपण महालक्ष्मीचें दर्शन घेऊं.

**महालक्ष्मीचें मंदिर :** हें हेमाडपंती मंदिरासारखें दिसणारें दगडी मंदिर असून याचा आकार फारच सुरेख आहे. कमळाच्या फुलासारखा परंतु किंचित् मिटलेल्या—किंबहुना संपूर्ण विकसित न झालेल्या—फुलाप्रमाणें तो आहे. मंदिरासमोरील सभामंडपांतील अतोनात दगडी खांब हें या मंदिराचें वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. हे सर्व खांब काळ्या रंगाच्या दगडाचे असून त्यावर तुळतुळीत काळें पॉलीश केलेलें आहे. त्याचप्रमाणें खांबांवर सुंदर नक्षी कोरलेली आहे. ही नक्षी जास्त नसली तरी सुंदर आहे. खांबांच्या विशिष्ट मांडणीमुळें ते मोजून काढणें हें सहजपणें साधणारें काम नाहीं. त्यासाठीं बराच वेळ खर्च करावा लागतो. मंदिरांत महालक्ष्मीची दोनतीन फूट उंचीची काळ्या रंगाची मूर्ति आहे. मूर्तीच्या अंगावरील भरपूर कपडे व नानाविध प्रकारचीं

रंगीत फुलें यांमुळें तिचें तोंडच काय तें उघडें दिसतें. मंदिरापुढील सभा-मंडपामुळें व त्यांतील शेंकडों खांबांमुळें मंदिरांत दिवसाहि प्रकाश भरपूर पडत नाहीं. तेलाच्या दिव्यांच्या मंद प्रकाशांत मंदिरांतील वातावरणांत अद्भुत शांतता दिसत होती. येथें नवरात्रोत्सव खूप थाटामाटानें साजरा केला जातो असें म्हणतात. अर्थात्च तो मला पाहतां आला नाहीं. मात्र मंदिरांत रोज सकाळीं होणारी आरती मला पाहतां आली. ह्या आरतीच्या वेळींहि खूप मौज येते. मंदिरांतील स्वच्छता प्रकर्षानें नजरेंत भरत होती. येथील राज-दरबारांतून पूर्वी कांहीं रक्कम खास मंदिराच्या उत्सवासाठीं व स्वच्छतेसाठीं राखून ठेवली जात होती. संस्थानें खालसा झाल्यामुळें आतां याबाबत काय व्यवस्था केलेली आहे कोण जाणे !

**खुळी समजूत** : मंदिराविषयीं कांहीं भोळ्या समजुती आहेत. या मंदिराचें धार्मिक महत्त्व फार मोठें आहे. कोल्हापूरला दक्षिण काशी म्हणतात, असेंहि मी ऐकून आहें. आतां जवळ जवळ न दिसणारा परंतु पूर्वी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून टाळ वाजवीत गाणें गात हिंडणारा, कवड्यांची टोपी व माळा धारण केलेला भोपी या देवीची महती घरोघर जाऊन सांगत असे. हातांत पेटलेली मशाल, तेलकट कपडे, एका हातानें वाजणारा तो टाळ आणि पावड मागण्यासाठीं मोठ्यानें गाइलें जाणारें गीत. माझ्या तर तो अगदीं नजरे-समोरच दिसतो. जमाना बदलत आहे. पूर्वीच्या भोळ्या आणि खुळ्या समजुती स्पुटानिकच्या युगांत तग धरूं शकत नाहींत. तरीहि कांहीं लोक पूर्वीच्या रूढीला अंधश्रद्धेनें चिकटून आहेत. अशीच एक खुळी समजूत वरील मंदिरा-संबंधानें मला येथील लोकांत आढळली. ती म्हणजे नवरात्रोत्सवांत उत्सवाच्या दिवशीं मंदिरांत देवीचें तेज पडून एरव्हीं असणारा अंधार आपोआप नाहींसा होतो, अशी ती समजूत आहे. लोकांना याचें कारण विचारलें असतां कांहींनीं सांगितलें, "देवी या दिवशीं प्रसन्न असते. त्यामुळें तिचें देदीप्यमान तेज पडतें." मीं या गोष्टीची माझ्या दैनंदिनींत नोंद करून ठेवली व या गोष्टींतील सत्यांश शोधण्याचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं येथील एका सुशिक्षित तरुणास वरील गोष्टीची माहिती देऊन विचारपूस केली. माहितींतून व चर्चेंतून हवा होता तो निष्कर्ष काढतां आला. सत्य परिस्थिति अशी आहे कीं, मंदिर बरोबर दिशा साधून पूर्वेस तोंड करून बांधलेलें आहे. मंडपापुढें

अतोनात दगडी काळ्या रंगाचे म्हणजे प्रकाशकिरण शोषून घेणारे खांब आहेत व ते सूर्यकिरणहि आडवितात. सूर्य वर्षांतून फक्त दोनदाच विषुव-वृत्तावर, म्हणजे बरोबर पूर्वेला उगवतो. एरव्हीं तो किंचित् उत्तरेकडे अथवा दक्षिणेकडे त्याच्या उत्तरायण-दक्षिणायनाच्या गतीप्रमाणें कलून उगवलेला असतो. ज्या वेळीं सूर्य विषुववृत्तावर म्हणजे बरोबर पूर्वेस येतो त्या वेळीं सूर्यकिरण सरळ पडतात व ते मंदिरांतील खांबांना विशेष न अडखळतां थेट आंत जातात. आणि नेमक्या या दोन्ही वेळेस आंत भरपूर प्रकाश पडतो. कधीं नव्हे तें दुर्मीळपणें दिसणारें हें दृश्य, आणि नेमक्या याच तारखेला दोन्ही वेळीं नवरात्रोत्सव चालू असतो. ही वस्तुस्थिति आहे. अशीच दुसरी खुळी कल्पना—येथील खांब मोजूं नयेत—अशी आहे. त्यामुळें खांब मोजण्याची इच्छा असूनहि ते मला लोकमर्जीकरितां मोजतां आले नाहींत.

**जुना राजवाडा :** हा राजवाडा कमालीचा भव्य आहे, तितकाच तो सुंदरहि असावा. आतां याच्या कांहीं भागाची बरीच पडझड झालेली आहे. कांहीं भाग नव्यानें दुरुस्त केलेला आहे. राजवाड्याच्या मुख्य दरवाजावरील नगारखान्यावर उंच भगवा झेंडा फडकत असतो. त्यामुळें छत्रपति शिवाजी-महाराजांच्या आठवणीनें हृदय भरून येतें; आणि महाराष्ट्रीय लोक शूर व राज्यकर्ते होते याची साक्षात् आठवण होऊन साक्षहि पटते. भगवा झेंडा व छत्रपति शिवाजीमहाराज, हीं दोन नांवें येथें फार पवित्र समजलीं जातात. त्यांचा मोठा आदर केला जातो. अर्थात् महाराष्ट्रांत इतरत्र तो कमी आहे, अशांतला माझ्या म्हणण्याचा अर्थ कृपेनें करूं नये. परंतु इतर ठिकाणांपेक्षां तो मला तरी येथें जास्त मोठ्या प्रमाणावर दृष्टोत्पत्तीस आला. या जुन्या राजवाड्यांत आतां येथील महाराज राहात नाहींत. ते गांवाबाहेर असलेल्या नव्या राजवाड्यांत राहतात. राजवाड्यांत देवीचें एक मंदिर पाहण्यासारखें आहे. याशिवाय आंत आणखी पाहण्यासारखें दुसरें विशेष कांहीं नाहीं. आंतील बऱ्याच भागांतील जागा सरकारी कचेऱ्या वगैरेंनीं व्यापलेली आहे. कचेऱ्यांचें तें नेहमींच्या सर्वांच्या परिचयाचें दृश्य पाहून विशेष नावीन्य न वाटल्यानें फक्त वाड्याच्या पूर्वींच्या भव्य स्वरूपाचा व त्याच्या ऐश्वर्याचा विचार करीत गांवाबाहेर पडलों, व शालिनी पॅलेस पाहण्यासाठीं निघालों.

**शालिनी पॅलेस :** गांवाबाहेर पडतांच एक मोठें विस्तीर्ण तळें दिसूं लागतें. तळ्याचा परीघ सुमारें तीन चार मैल असावा. तळ्यांत भरपूर पाणी होतें. तळ्याच्या एका कोपऱ्यावर शालिनी पॅलेस बांधलेला आहे. पॅलेसजवळ पोहोंचलों तों दुपारचे बारा वाजले होते. ऊन मी म्हणत होतें. वारा पडला होता. झाडाचें पान देखील हालत नव्हतें. त्यामुळें उष्मा खूप वाढला होता. पॅलेससमोर एक सुंदर हिरवागार बगीचा आहे. त्यांत दोनतीन बागवान काम करीत होते. सध्यां या पॅलेसमध्यें कोणी राहात नाहीं. त्यामुळें तो बंद असतो. म्हणून तो पाहण्यासाठीं खास परवानगी महाराजांकडून घ्यावी लागते. तशी परवानगी मीं घेतलेली नव्हती. परंतु बागवानाबरोबर मी दोन चार गोष्टी प्रेमानें बोललों. तो चांगल्या स्वभावाचा माणूस होता. त्यानें स्वतःच मला परवानगी दिली. प्रथम मी तळ्यावर थंड पाण्यानें स्नान केलें. बागेंतून संगमरवरी पांढऱ्याशुभ्र दगडानें तळ्यास एक सुंदर घाट बांधलेला आहे. या गुळगुळीत पायऱ्यांनीं पाण्यांत उतरतांना पायांस गुदगुल्या होतात. पाणी स्वच्छ असल्यानें पाण्यांतील पायऱ्या दिसतातहि फारच सुरेख. येथें उन्हांत स्नान करण्यास खरोखरच फार मौज वाटते. पॅलेसहि फार सुंदर व डौलदार आहे. जमिनीवर संगमरवरी दगडाची फर्शी केलेली आहे. दारांना व खिडक्यांना रंगीबेरंगी चित्रें काढलेलीं सुंदर भव्य तावदानें, पॅलेसमधील उंची फर्निचर, भव्य हॉल्स, वगैरे गोष्टी पाहतांना यांत राहणाऱ्या लोकांच्या ऐश्वर्याची कल्पना सहज येते. सर्व सुखसोईनीं तो युक्त असा आहे. बांधकाम एकदम अद्यावत् धर्तीचें आहे. हा पॅलेस शाहूमहाराजांनीं त्यांच्या बहिणीसाठीं बांधून दिलेला आहे. सदर पॅलेस पाहून झाल्यावर सध्यां ज्या नव्या राजवाड्यांत छत्रपति भोसले राहतात, तो राजवाडा पाहण्याचें ठरविलें. हा नवा राजवाडा शहराच्या बाहेर शालिनी पॅलेसच्या दुसऱ्या विरुद्ध बाजूस बांधलेला आहे. त्यासाठीं पुन्हा शहरांतून जावें लागतें. वाटेंत शहराच्या एका कोपऱ्यावर एक सुंदर इमारत दिसली. इमारतीसमोर एक भव्य विस्तीर्ण उद्यान दिसलें. साहजिकच मीं तेथें थोडा वेळ थांबून इमारतीसबंधीं थोडी चौकशी सुरू केली. ही टाऊन हॉलची इमारत होती. सध्यां हिच्यांत पुराणवस्तूंचा संग्रह करून ठेवलेला आहे. पांच वाजतां ती प्रेक्षकांसाठीं बघण्यास खुली होत असते. तोंपर्यंत मीं नवा राजवाडा पाहून येण्याचें ठरविलें.

**नवा राजवाडा :** हा नवा राजवाडा भव्य आहे, हें दुरूनच ओळखूं येतें. वाड्यावर उंच भगवा झेंडा फडकत होता. वाड्याभोंवतीं चांगलें विस्तीर्ण असें मैदान होतें. मैदानाच्या बाहेरून चौफेर भिंती बांधून तें बंद केलें होतें. एक दोन प्रवेशद्वारें आहेत. त्यामुळें तें खुलें असेल तेवढेंच ! मैदानांत हा राजवाडा आहे. वाड्याभोंवतीं मोठा बगीचा आहे. त्यांत नानाविध पक्षी व प्राणी आहेत. मी रस्त्यानें सरळ थेट वाड्याच्या मुख्य दरवाजापाशीं गेलों. एक संत्री हातांत रायफल घेऊन दरवाजावर पहारा करीत होता. माझ्याकडे त्याची पाठ होती. त्यामुळें त्यानें प्रथम मला पाहिलें नाहीं. माझी चाहूल लागतांच तो दचकला व पळत माझ्याकडे आला. पळतांना पायांचा आवाज न होईल याची तो दक्षता घेत होता. महाराज आंत होते. त्यांना आवाज ऐकूं जाऊन शांततेचा भंग होईल, म्हणून तो एवढा जपत होता. तो म्हणाला, "वाड्यावर झेंडा दिसत नाहीं ? महाराज आंत आहेत. तुम्ही इथपर्यंत कसे आलां ?" त्याच्या बोलण्यावरून मी समजलों कीं, राजवाड्यावर भगवा झेंडा फडकत असेल तेव्हां महाराज आंत आहेत, असें समजावें. परंतु मी पाहुणा असल्यानें मला हें माहीत नव्हतें. ही गोष्ट मीं त्या रखवालदाराला सांगितली. त्यास हें सुद्धां सांगितलें कीं, "मला बाहेरच्या फाटकापासून कोणींहि आडविलें नाहीं, अथवा कोणींहि याबाबत पूर्वसूचनाहि केलेली नाहीं." त्यावर तो म्हणाला, "एवढ्या साध्या गोष्टीची पूर्वसूचना कशासाठीं द्यायची ?" मला आश्चर्य वाटलें. नवीन माणसाला सांगितल्याखेरीज हें कसें कळणार ? परंतु विचार करील तर तो पोलीस कसला ? त्याच्या जातीधर्माला बट्टा लावणारी ही गोष्ट होईल ना ? जास्त न बोलणेंच उचित आहे, असें समजून मी माघारीं निघालों. बाहेर ऑफीस होतें. त्यांत जाऊन परवानगी घ्यावी असें वाटलें. परंतु मला जास्त वेळ नव्हता. म्युझियम पाहावयाचें होतें व राधानगरीकडे प्रयाण करावयाचें होतें. मी सरळ मागें परतलों व शहरांतील टाऊन हॉलमधील म्युझियम पाहण्यासाठीं आलों.

**म्युझियम :** हें म्युझियम नव्यानेंच सुरू करण्यांत आलेलें आहे. येथून जवळच पांचगंगा नदी आहे. तेथें नदीकिनारीं नुकत्याच झालेल्या उत्खननांत सांपडलेल्या कांहीं प्राचीन वस्तु यांत ठेवलेल्या आहेत. या वस्तु सातवाहनकालीन आहेत. कांहीं वस्तु तर अत्यंत आश्चर्यकारक

आहेत. उदा. दोन हजार वर्षांपूर्वीचे तांदूळ, स्त्रियांचे रंगीबेरंगी दगडांचे दागिने, ताम्रपट, शिलालेख वगैरे. इतरहि अनेक वस्तु प्रेक्षणीय आहेत. महामानव गौतम बुद्ध यांच्या प्राचीन सुंदर शिल्पकाम असलेल्या मूर्ति तर मला फार आवडल्या. येथें सांपडलेल्या सर्व वस्तूंसंबधानें अद्याप संशोधन चालू आहे. त्यामुळें येथील इतिहासावर प्रकाश पडणार आहे. शाळा-कॉलेजांपेक्षां जास्त व खरें ज्ञान माणसाला प्रवासांत मिळतें. हिटलरचा दोस्त मुसोलिनी याचें एक वचन प्रसिद्ध आहे. 'अनुभवापेक्षां ज्ञान श्रेष्ठ नाहीं. अनुभवाशिवाय जगांतील श्रेष्ठ ग्रंथ व्यर्थ आहेत.' या त्याच्या वचनाच्या सत्यतेची प्रचीति मला हें म्युझियम पाहतांना आली. अर्थातच मी मुसोलिनीला कुणी श्रेष्ठ तत्त्ववेत्ता मानीत नाहीं आणि असा अर्थ कृपेनें कुणी लावूं नये. परंतु एके काळीं त्यानें जगांत हाहाकार मांडलेला होता. मुख्य गोष्ट तीच आहे. मूर्ख माणसाला हें शक्य नसतें. तो फार तर आपल्या स्वतःच्या घरांत हाहाकार माजवील. अशा प्रकारें छोट्या परंतु नवीन गोष्टींचें ज्ञान करून देणारें हें म्युझियम पाहून मी मुक्कामासाठीं माझ्या एका मित्राकडे गेलों. दुसऱ्या दिवशीं सकाळींच मोटारनें मी राधानगरी हें ठिकाण पाहण्यासाठीं निघालों.

**राधानगरी :** राधानगरी येथें एक धरण आहे. या धरणाबद्दल मी पूर्वीच ऐकून होतों. राधानगरी गांवापासून दोन तीन मैल अंतरावर हें धरण आहे. धरणाच्या मागच्या बाजूस एक प्रचंड जलाशय निर्माण केलेला आहे. दोन्ही बाजूंस हिरव्यागार वृक्षांनीं आच्छादलेल्या अनेक टेकड्या आहेत. पाणी अत्यंत स्वच्छ व शुद्ध आहे. त्यामुळें येथील सृष्टिसौंदर्य अत्यंत नयन-रम्य झालें आहे. धरणाच्या पायथ्याला एक छोटें हैड्रोइलेक्ट्रिक पॉवर स्टेशन आहे. रविवार असल्यानें स्टेशन आंत जाऊन पाहण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न करावे लागले. परंतु माझ्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें ही खटपट व प्रयत्न करून मीं हें स्टेशन पाहिलेंच. येथेंहि म्युझियमप्रमाणें भेट देणारांचें एक रजिस्टर ठेवलेलें असतें. त्यावर नांवगांव लिहून हें स्टेशन पाहिल्यानंतर फोंडा घाटानें कोकणांत उतरून कोकणपट्टीनें गोव्यापर्यंत जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें माल मोटारनें फोंडा घाटांतून उतरून फोंडा गांवीं मुक्कामास निघालों.

**फोंडा घाटांतील प्रसंग :** फोंडा घाट फार मोठा व अवघड आहे. आठदहा मैल नुसता खोल उतरणीचा रस्ता आहे. वळणेंहि अतोनात

आहेत. या प्रवासांत एक बाका प्रसंग येऊन थडकला. मी ज्या लॉरीनें प्रवास करीत होतों, त्या लॉरीचा ड्रायव्हर एक तर अडाणी असावा किंवा तो कांहींतरी नशेंत असावा असें मीं प्रथमदर्शनींच ओळखलें. त्यानें मला मोफत फोंडा गांवापर्यंत नेऊन सोडण्याचें कबूल केलें होतें. परंतु गाडी चालू होतांच माझ्या हृदयांत धस्स झालें. तो अत्यंत वेगानें गाडी चालवीत होता. भोंवतालच्या दृश्यांवर माझी नजर ठरत नव्हती. भराभर दृश्यें दृष्टीआड होत होतीं. वळणावर एक तर गाडीवरचा ताबा सुटेल किंवा गाडीचा ब्रेक तुटेल, अशी सारखी भीति मला वाटत होती. स्वारी निश्चित-पणें दारूच्या नशेंत चूर होती. मीं तात्काळ ओळखलें. परंतु आतां उपाय नव्हता. माझी पांचावर धारण बसली. भीतीनें गाळण उडाली आणि शेवटीं होऊं नये तेंच झालें. वळणावर गाडी एकदम उलटली. पुन्हा राधानगरी-कडे तोंड करून ती उभी राहिली. थोडक्यांत बचावली. नाहींतर पन्नास पाऊणशें फूट खोल दरींतच जायची. मोठा आवाज झाल्याचा भास झाला. माझे डोळे थिजले. कान सुन्न झाले. चेंडूसारखा मी अलगत गाडीच्या बाहेर फेकलों गेलों. सुदैवानें मी लवकर शुद्धीवर आलों. विशेष जखम झालेली नव्हती. उजव्या पायास थोडा मुका मार लागलेला होता. ड्रायव्हर मात्र चांगलाच भाजून निघाला होता. तो शुद्धीवर आलेला नव्हता. त्याला काय उपाय करावा, हेंच मला सुचेना. मी भांबावून गेलों होतों. तो अजूनहि शुद्धींत नव्हता. प्रथमोपचाराचें शिक्षण मला शाळेंत मिळालेलें होतें. परंतु त्याचा येथें कांहीं उपाय चालेना. मीं वॉटरबॅग उघडली व त्याच्या तोंडावर थोडें थंड पाणी शिंपडलें. परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. मी सरळ फोंडा गांवांत निघून गेलों. पुढें त्या ड्रायव्हरचें काय झालें, कोण जाणे ? बिचारा ! त्याचा एक साथीदार होता. त्याला मात्र कसलीच जखम झालेली नव्हती. त्याच्यावरच मी त्याला सोंपवून आलों होतों. या अपघाताची नुसती आठवण झाली कीं, अजूनहि माझें सर्वांग शहारून जातें. अशा या खडतर प्रवासानंतर मीं फोंडा गांवांत मुक्काम केला. कांहीं तरुण मंडळी व शिक्षक, यांनीं आर्थिक मदत केली. तेवढ्या पैशावर कणकवलीपर्यंतचा प्रवास करण्याचें ठरविलें. पुढचें पाहून घेऊं, या माझ्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें निघालों.

● ● ●

# कणकवली ते मालवण : २

**कणकवली :** हें तालुक्याचें गांव आहे. येथील आमदार तावडे व आमदार सावंत यांना जाऊन भेटलों. माझ्या प्रवासाचा उद्देश त्यांना सांगितला. अद्याप शाळा, हायस्कुल्स वगैरे सुट्टीमुळें बंद असल्यानें माझे व्याख्यानाचे कार्यक्रम वगैरे कोठेंच झाले नव्हते. त्यामुळें मी आर्थिक अडचणींत आहें, असें त्यांना सांगितलें. मला दोन्ही आमदारांनीं खूप चांगल्या प्रकारें व आपुलकीच्या भावनेनें वागाविलें. आमदार तावडे यांच्याकडे मुक्काम झाला. त्याच दिवशीं तुळशीचें लग्न होतें. आमदारांच्या घरीं तुलसीविवाह मोठ्या थाटामाटानें साजरा झाला. त्यांच्या मुलामुलींनीं तर या कार्यक्रमांत अतीव उत्साहानें भाग घेतलेला होता. प्रवासांतील कष्ट मी विसरलों होतों. मात्र भूक खूप सपाटून लागलेली होती. दोन-तीन प्रकारचे रुचकर मासे, भात, पोळी वगैरे पदार्थ जेवणासाठीं तयार केलेले होते. भात व मासे यांवर मीं यथेच्छ ताव मारला. ते दोन्ही पदार्थ माझ्या आवडीचे होते. आणि जोडीला “ अधिक थोडें घ्या ” असा आग्रहहि कांहीं कमी नव्हता. रात्रीं झोप खूप शांत आली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रातर्विधि आटोपून चहा घेऊन आमदारांचा निरोप घेतला. निघतांना आमदार सावंत यांच्याकडून मालवण येथील आमदार डॉ. मांजरेकर यांना एक चिट्ठी ओळख म्हणून बरोबर घेण्यास मी विसरलों नाहीं.

**गोपुरी आश्रम :** कणकवलीहून पायींच प्रवास सुरू केला. पदयात्रेंत कांहीं फायदेहि असतात. गांवाबाहेर एक मैलभर अंतर गेलों असेन. वाटेंत एक नदी आडवी आली. नदीवर मोठा पूल बांधलेला होता. पाणी प्रशस्त दिसत होतें. स्नान करण्याची इच्छा झाली, आणि तावडतोब तोहि विधि उरकून घेतला. येथून थोडें पुढें जातांच रस्ता एक मोठें वळण घेतो. रस्त्याच्या दुतर्फा दाट झाडें लावलेलीं होतीं. त्यामुळें रस्त्यावर उन्हाचा एक कवडसादेखील पडलेला नव्हता. आजूबाजूंच्या छोट्यामोठ्या टेकड्या काजू, नारळीच्या झाडांनीं दबून गेलेल्या होत्या. वळणावर उजव्या हातास गोपुरी

आश्रम लागतो. आश्रमाच्या परीसरांत नीटनेटक्या आंखीव जागेंत सुंदर फळझाडें लावलेलीं होतीं. जवळच हिरवींगार शेतें दिसत होतीं. फाटकाजवळ तीनचार सुंदर व सुबक इमारती दिसत होत्या. सर्व गोष्टींत नीटनेटकेपणा दिसत होता. फाटकांतून एका इमारतींत प्रवेश केला. ही ऑफिसची इमारत होती. तेथून मला आश्रम दाखविण्यासाठीं एक स्वयंसेवक मिळाला. आश्रमाची त्याला सर्व बारीक-सारीक माहिती होती. खादीचा पांढराशुभ्र पोशाख केलेला तो स्वयंसेवक एक एक गोष्ट मला दाखवूं लागला. बाहेरून प्रथमदर्शनीं दिसणाऱ्या तीन इमारतींत एक इमारत ऑफिसची होती. एका इमारतींत आश्रमांत तयार झालेला विक्रीचा माल ठेवलेला होता. याच इमारतीच्या एका कोपऱ्यांत पोस्ट ऑफिस होतें. एक इमारतींत कांहीं अंबर चरखे होते. या चरख्यांवर सूत कातण्याचें काम कांहीं मुलेंमुली करीत होत्या. साध्या चरख्यावर मला चांगल्या प्रकारचें सूत काततां येत असलें, तरी या नवीन चरख्यावर सूत कातताना पाहून मला मौज वाटली. बाजूला एक भोजन-गृहाची इमारत होती. गोबर गॅसवर स्वयंपाक चाललेला होता. सर्वपूर्ण अन्न नांवाचा नवा पदार्थ कुकरवर शिजविला जात होता. या नव्यानेंच ऐकलेल्या पदार्थाविषयीं चौकशी केली असतां कळलें कीं—गहूं, तांदूळ, तुरीची डाळ, बटाटे, मीठमिरची, वगैरे पदार्थ यांत ठराविक प्रमाणांत टाकून ठेवलेले असतात. कुकर एकदा गॅसच्या शेगडीवर ठेवून दिला कीं झालें. हिंडून फिरून आलें व कुकर उघडला कीं, स्वयंपाक तयार! वेळेची बचत होते. सकस अन्न खावयास मिळतें. दळणें, मळणें, भाकरी करणें यासारख्या श्रमाची बचत होते. स्वयंपाकघर स्वच्छ राहतें. या पद्धतींत नानाविध फायदे आहेत. मला ही पद्धत फारच आवडली. या गोबर गॅसवरच आश्रमांतील सर्व दिवे लावले जातात. मीं गोबर गॅसची योजना प्रथमच येथें पाहिली. त्यामुळें मीं तिचा खूप अभ्यास केला. मुंबईत गॅसवर लागणारे दिवे आहेत. परंतु मला हें नंतर समजलें. आश्रमांतील अनेक गोष्टी मीं चौकस बुद्धीनें पाहिल्या.

**गोबर गॅस** : सुमारें पंचवीस तीस एकर क्षेत्र आश्रमानें व्यापलेलें आहे. जागा नदीकिनाऱ्यावर आहे. माझ्या आठवणीप्रमाणें ती गढ नदी असावी. नदीवर दहा बारा अश्वशक्तीचें एक एंजिन बसविलेलें असून त्यानें येथील जमिनीस पाणीपुरवठा केला जातो. शेतांत केळीं, पोपई, अननस, फणस,

आंबे वगैरेंचें उत्पन्न काढलें जातें. एक बाजूस विलायती हिरवेंगार गवत वाढविलेलें होतें. आश्रमांतील जनावरांना बाराहि महिने हिरवा चारा पुरवितां यावा, म्हणून वरील गवत सतत वाढविलें जातें. हें सर्व पाहून झाल्यावर जनावरांचे गोठे व शेणवायूची योजना पाहण्यासाठीं गेलों. गोठे मोठे व स्वच्छ होते. सिमेंट काँक्रीटनें जमीन उतरती बांधलेली होती. त्यामुळें मलमूत्र आपोआप वाहून एका ठिकाणीं जमा होत होतें. मूत्र नळावाटें वाहून नेऊन एका तोंडबंद असलेल्या टांकींत सांठविलें जात होतें, व शेणाचें मिश्रण करून तें गोबर गॅसच्या टांकींत टाकलें जातें. मोठीच खुबीदार सोय केलेली होती. एरव्हीं जनावरांचा गोठा म्हटला कीं, तेथें दुर्गंधी असणारच, असा माझा समज असे. परंतु हे गोठे पाहिल्यानंतर तो समज चुकीचा असल्याचें आढळून आलें. गोठ्याच्या मागच्या बाजूस गोबरगॅसची (शेणवायूची) टांकी होती. सदर टाकीची व संपूर्ण योजनेची माहिती मला स्वयंसेवकानें दिली ती अशी—प्रथम सुमारें सहासात फूट व्यास असलेला पंधरा फूट खोलीचा खड्डा खोदला जातो. त्यांत याच मापाची परंतु उंचीनें तीन फूट कमी व तीन इंच कमी व्यासाची एक लोखंडी टांकी बसविण्यांत येते. ह्या टांकीस तीन नळ बसविलेले असतात. दोन तळाला व एक वरच्या टोंकाला. या तिन्ही नळांना कॉक असतात. एकांतून शेण व पाणी यांचें ठराविक प्रमाणांत केलेलें मिश्रण ओतलें जातें. एका नळावाटें गॅस तयार झाल्यावर निरुपयोगी झालेलें शेण बाहेर फेकलें जातें, व एकांतून गॅस धारण झाल्यानंतर जरुरीप्रमाणें घेतला जातो. अशा प्रकारची साधी व सुटसुटीत योजना आहे. एवढी तयारी झाल्यानंतर शेणपाणी टाकण्यापलीकडे कांहींच काम राहात नाहीं. एका नया पैशाचाहि खर्च न करतां सतत वीस वर्षेपर्यंत आपण मोफत उष्णता व प्रकाश मिळवूं शकतों. टांकींत टाकलें जाणारें शेण वायां जात नाहीं. त्याचें उत्तम प्रतीचें खत निर्माण होतें. ही योजना मला तरी फारच आवडली. निसर्गसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावर होत असलेला अपव्यय थांबवून ती शक्ति माणसांच्या कल्याणासाठीं वापरणें अत्यंत जरुरीचें आहे. भारतासारख्या विशाल व शेतीप्रधान देशांत तर ही योजना खेडोपाडीं अमलांत आणतां येण्यासारखी आहे. आणि हें काम अत्यंत जरुरीचें आहे. त्यामुळें जळणासाठीं वापरलें जाणारें लाकूड, शेण, रॉकेल, वगैरेंची बचत होणार आहे. प्रकाशासाठीं वापरल्या जाणाऱ्या

विद्युत्-शक्तीची व तेलाची बचत होणार आहे. ही शक्ति देशाच्या नव-उभारणीच्या कार्यांत अत्यंत मोलाची भर टाकणारी ठरेल. यानंतर आश्रमांत तयार होणाऱ्या निरनिराळ्या वस्तु पाहून मीं पुढें जाण्याचें ठरविलें. खादीचें कापड तर येथें तयार होतेंच, परंतु चप्पल, बूट, सर्पांच्या कातड्याचे सुंदर कमरपट्टे, इत्यादि अनेक प्रकारच्या उत्तम वस्तुहि येथें तयार झालेल्या पाहून मला कौतुक वाटलें. आश्रमाचे चालक व स्वयंसेवक यांनीं आपला वेळ मोडून मला इतका वेळ माहिती सांगितली याबद्दल त्यांचे आभार मानून मीं त्यांचा निरोप घेतला व पुढील मार्ग धरला, म्हणजे पुन्हा माझी पदयात्रा सुरू केली.

पदयात्रेंत एखाद्या वेळीं गंमत होई, ती अशी—गांवांत गेल्यानंतर तेथील एखादा इसम मला प्रश्न विचारी कीं, "तुम्ही कोणत्या सर्व्हिसनें आलांत ?" त्यावर मी उत्तर देई कीं, "पांडुरंग सर्व्हिसनें मी आलों." माझ्या बोलण्याचा आशय त्यांच्या लक्षांत आल्यावर ते खद्खदा हसत.

**हिचहायकिंग :** आश्रम पाहून झाल्यानंतर सुरू झालेली माझी पदयात्रा चालूच होती. पाठीवर वीस-पंचवीस शेराचा बोजा होता, ऊन मी म्हणत होतें, भूक कडकडून लागलेली होती. आश्रमांत जेवणाचा आग्रह होत असतांना व खिशांत एक पैसाहि नसतांना मीं जेवण न घेतल्याबद्दल आतां त्याचा खेद वाटत होता. परंतु आतां त्याचा कांहींच उपयोग नव्हता. इतक्यांत मागच्या बाजूनें एक मोटारट्रक भरधाव वेगानें धावत येतानां मीं पाहिला. मला दोन ब्रिटिश प्रवाश्यांची आठवण झाली. त्यांनीं आपला प्रवास हिचहायकिंगच्या पद्धतीनें केलेला होता. हिचहायकिंग म्हणजे पायीं प्रवास करतांना रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या खाजगी मोटारींना हात देऊन थांबवायचें व पुढें नेऊन सोडण्याची विनंती करायची. या पद्धतीनें प्रवास करण्यास हिचहायकिंग असें म्हणतात. याप्रमाणें मीं त्या ट्रकला हात देऊन उभा केला. "मी प्रवाशी आहें. उत्तर भारताचा संपूर्ण प्रवास करून मी आतां दक्षिण भारताच्या प्रवासास निघालों आहें. मला मालवण येथें जायचें आहे. कृपया आपण मला थोडें पुढें नेऊन सोडाल काय ?" एवढ्या गोष्टी मीं त्याला अत्यंत सुटसुटीतपणें व मोजक्या शब्दांत सांगितल्या. त्यानें माझी विनंती स्वीकारली. ट्रक सावंतवाडीला जाणार असल्यानें त्यानें मला कसालपर्यंत पोहोंचतें केलें. तेथें मी पोलिसचौकीवर गेलों. पूर्वी मीं कांहीं दिवस पोलीसची नोकरी केलेली होती. तिचा उपयोग झाला.

एवढ्याच ओळखीवर माझी जेवणाखाणाची सोय झाली. ताजेतवाने होऊन मी पुन्हां पुढील मार्ग धरला. सुकळवाडी नांवाचें एक खेडें वाटेंत लागलें. तेथें जाईपर्यंत अंधार पडला होता. कोकणांत सर्पाची भीति फार. मी सर्वांपेक्षां सर्पाला जास्त भितों. एवढासा प्राणी परंतु किती भयंकर ! बापरे ऽऽऽ! कोकणांत यांचा फार सुकाळ आहे. माझ्या पदयात्रेंत मीं कोकणांत कितीतरी डझन सर्प पाहिलेले आहेत. देशावर ते क्वचितच दिसतात. भीतभीत मी एकदाचा सुकळवाडी गांवांत पोहोंचलों.

**पहिलें व्याख्यान :** कांहीं दिवस मीं इगतपुरी तालुक्यांत शिक्षकाचें काम केलेलें होतें. त्याचाहि उपयोग झाला. समानधर्मी बंधु हें नातें तसें फार मोठें आहे ! मला नेहमींची मोठी प्रस्तावना न करतां शाळेंत या नात्यामुळेंच चटकन् कार्यक्रम ठरवितां येतो. असेंच येथें झालें. माझा दुसऱ्या दिवसासाठीं शाळेंत व्याख्यानाचा कार्यक्रम ठरला. विषय—माझा उत्तर भारतांतील प्रवास हा होता. जेवण, विश्रांति वगैरे कार्यक्रम यथावकाश पार पडला हें सांगणें नकोच. दुसरे दिवशीं शाळेंतील सर्व मुलामुलींपुढें माझें सुंदरपैकीं व्याख्यान झालें. सुमारे दोन तास सर्व विद्यार्थी व शिक्षक-शिक्षिका व्याख्यानांत रंगून गेलीं होतीं. कार्यक्रम आटोपल्यावर नेहमींच्या रिवाजाप्रमाणें माझे अभार मानून त्यांनीं देणगी म्हणून मला दहा रुपये दिले. दोन तासांचे दहा रुपये मला पुष्कळ वाटले. आतां ' पांडुरंग सर्व्हिसनें ' प्रवास करण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण खिशांत बंदी दहाची नोट होती. सरळ मालवण गांठावें असें माझें मत होतें. परंतु येथील शिक्षकांनीं सल्ला दिला कीं, ' वाटेंत कठ्ठा नांवाच्या गांवीं एक मोठी शाळा आहे. तेथील शिक्षक होतकरू आहेत. तुम्हांला यापेक्षां तेथें जास्त उत्पन्न मिळेल. ' सल्ला चांगला होता. त्याप्रमाणें मी कठ्ठा येथें उतरलों.

**लिखाणाची स्फूर्ति :** कठ्ठा येथील शाळेंत गेलों, आणि कार्यक्रमाविषयीं विचारलें. कार्यक्रम ठरला. व्याख्यान झालें. अपेक्षेपेक्षां कार्यक्रम जास्त चांगला झाला. हें व्याख्यान एका शिक्षिकेला फार आवडलें. त्यांनीं मला सल्ला दिला कीं, ' एखादें प्रवासवर्णनपर पुस्तक लिहा.' हाहि सल्ला चांगला होता, यांत कांहींच संशय नव्हता. परंतु कोणत्याहि नव्या क्षेत्रांत पाऊल टाकतांना ज्या शेंकडों अडीअडचणी पुढें येतात त्यांची मला चांगली कल्पना होती, व

त्यामुळेंच तर मी अनेक वेळां लिहिण्याची स्फूर्ति येऊनहि लिहीत नसे अगर कांहीं लिहिलेंच तर तें छापण्याचा कधीं प्रयत्न करीत नसे. सोविएत रशियानें स्पुटनिक सोडला, तेव्हां 'मीं सृष्टीचा प्रभु' ही कथा लिहिली होती. परंतु ती छापण्यास पाठविण्याचें धैर्य होईना. कारण 'साभार परत' या शेऱ्याला मी फार भितों. शेवटीं धीर धरून मीं ती कथा त्याच दिवशीं कट्ठा येथून युगांतर या साप्ताहिकाकडे पाठवून दिली आणि मालवणकडे निघालों. येथें लॉरेन्स डॉट्स नांवाच्या एका खिश्चन दुकानदाराची ओळख झाली होती. मी येथून निघतांना त्यानें वेंगुर्लें येथील आमदार श्री. चमणकर यांच्यासाठीं मजजवळ एक ओळखपत्र दिलें होतें. तें मला वेंगुर्लें मुक्कामीं फार उपयोगी पडलें. अशीं ओळखपत्रें मीं नेहमीं घेत असें.

●●●

# मालवण ते वेंगुर्लें : ३

**मालवण :** हें समुद्रकिनाऱ्यावरील एक उत्तम बंदर असून तालुक्याचें गांव आहे. येथें छत्रपति शिवाजीमहाराजांनीं समुद्रांत एक दुर्ग बांधलेला आहे. त्याचें नांव सिंधुदुर्ग. हा दुर्ग पाहण्यासाठीं मी मालवणला आलों होतों. येथें येतांच आमदार डॉ. मांजरेकर यांना भेटलों. आमदार सावंत यांचेकडून आणलेली चिठ्ठी त्यांना दिली. त्यांनीं दोन-तीन चिठ्ठ्या लिहिल्या. एक माणूस माझ्याबरोबर दिला. त्याच्या मदतीनें फिरून मीं येथील शाळा-चालकांना त्या दिल्या. माझे दोनतीन व्याख्यानांचे कार्यक्रम ठरले. एक येथील हायस्कूलमध्यें व दुसरा मुलींच्या शाळेंत. कार्यक्रम ठरवून मी एका लॉजिंग-बोर्डिंगमध्यें उतरलों. रात्रीं जेवण उत्तमपैकीं मिळालें. भात, मासे यांच्या जोडीला दहीं व ताकहि भरपूर होतें. भरपूर जेवण झालें. रात्रीं झोपहि गाढ लागली.

**सिंधुदुर्ग** : दिवस उगवला आन्हिकें उरकलीं, व बाहेर पडलों. सिंधुदुर्ग पाहण्यासाठीं समुद्रकिनाऱ्याकडे निघालों. सिंधुदुर्ग समुद्रकिनाऱ्यापासून आंत चांगला एक मैल अंतरावर बांधलेला आहे. किनाऱ्यावरूनच त्याचें दर्शन होतें. आज तीनशें वर्षें तो ऊन, वारा, थंडी, पाऊस या कशालाहि न जुमानतां शिवबांच्या आज्ञेवरून हबश्यांपासून कोंकणचें संरक्षण करीत उभा आहे. काळ्या देहाच्या वृद्ध तपस्व्याप्रमाणें तो मला दिसला. किनाऱ्यावरून पाहून माझें थोडेंच समाधान होणार होतें ! मीं एक होडी भाड्यानें केली, व हा दुर्ग पाहण्यासाठीं निघालों. समुद्राच्या लाटांचे तडाखे खात खात होडी थेट सिंधुदुर्गाच्या दरवाजापर्यंत येऊन थडकली. येथें एक चांगला भक्कम धक्का बांधलेला आहे. येथून जवळच खेटून दोन मोठे जबरदस्त बुरूज आहेत. या बुरुजांच्या आड समोरून दिसणार नाहीं असें तिरपें या दुर्गाचें भव्य प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वारापुढें हनुमानाची एक मोठी मूर्ति असून शिवाजीमहाराजांनीं बांधलेल्या प्रत्येक किल्ल्यापुढें अशी मूर्ति असते, असें येथील गाईडनें मला सांगितलें. हा गाईड येथील मराठा पुजारी असून तो सिंधुदुर्गची माहितीहि येणाऱ्या पाहुण्यांस सांगत असतो. त्यानें माझ्याबरोबर सुमारें तीन चार तास फिरून सिंधुदुर्गची बारीकसारीक माहिती मला सांगितली. त्याची माहिती सांगण्याची शैली फारच आकर्षक होती. प्रेक्षकाला तो माहिती सांगतांना अगदीं भुरळ पडत असे व आपण प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांच्या काळांतच वावरत आहोंत असा भास होत असे. सिंधुदुर्गचें क्षेत्रफळ सुमारें सतरा ते अठरा एकर एवढें असावें. आंत प्रवेश करतांच तटबंदी असलेल्या एखाद्या खेड्यांतच प्रवेश केल्यासारखें वाटतें. अत्यंत शांत व नयनरम्य वातावरण आंत आहे. बाहेरून तटावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटांमुळें या शांततेचा भंग होतो व आपण समुद्रांतील सिंधुदुर्गमध्यें आहोंत याची जाणीव होई. किल्ल्यांत शेंकडों नारळीचीं झाडें आहेत. त्यांतून कांहीं माडाच्या पानांनीं शाकारलेल्या झोपड्याहि डोकावत आहेत. माझ्या बरोबर असलेला **गाईड** आवाज साफ असल्याची खात्री करून घेऊन माहिती सांगूं लागला.—**हा निशाण बुरूज**—छत्रपतींचा व महाराष्ट्राचा लाडका झेंडा—भगवा झेंडा या बुरुजावर रात्रंदिवस फडकत असे. **चोरवाट**—या वाटेंतून प्रसंगीं शत्रूच्या हातावर तुरी देऊन पसार होतां येत असे. समुद्रांतून ही

वाट थेट किनाऱ्यापर्यंत एक मैल समुद्राखालून जाते. **भवानी देवी**—भोसल्यांचें दैवत, स्त्रियांचें स्नानघर व समुद्रांत पोहणें शिकण्याची जागा—असें एकेक दृश्य पाहात व त्याची माहिती ऐकत एका जिन्यानें आम्ही तटावर आलों व भिंतीच्या कडेनें समुद्रशोभा पाहूं लागलों. तटावर समुद्राच्या लाटा नुसत्या तुटून पडत होत्या. आज तीनशें वर्षें सिंधुदुर्गचा हा तट त्यांच्याशीं रात्रंदिवस झुंजत होता. अजूनहि तो ताठ मानेनें समुद्रांत उभा आहे. पश्चिमेकडून लाटांचा मारा विशेष जोराचा होत होता. त्यामुळें त्या बाजूनें तटास थोडें खिंडार पडलेलें दिसलें. 'मोडेल पण वाकणार नाहीं' हा महाराष्ट्राचा बाणा तो कसा विसरेल ? हा दुर्ग आजपर्यंत अजिंक्य आहे. सिंधुदुर्ग लढवून आजपर्यंत कुणालाच जिंकता आला नाहीं असा इतिहास आहे. या किल्ल्याच्या तटास बळकटी येण्यासाठीं जे तीस बुरूज आहेत, ते पाहात पाहात आम्ही चाललों होतों. तटाची भिंत सुमारें सात फूट जाडीची आहे. या भिंतीवरूनच आम्ही प्रवेशद्वाराच्या डाव्या कोपऱ्यांत आलों. शत्रूवर मारा करण्यासाठीं ठिकठिकाणीं मोर्चे बांधलेले आहेत. असा हा अजिंक्य सिंधुदुर्ग पाहून खूप आनंद वाटला.

**आम्हांला अत्यानंद देणारी गोष्ट** : महाराष्ट्रीयाला अभिमान वाटणारी व अंगावर मूठभर मांस चढविणारी अशी एक गोष्ट येथें आढळांत आली. ती कोणती ? अशी दुर्मिळ वस्तु कोणती कीं, जिच्या दर्शनानें आम्हांला स्वर्ग दोनच बोटें उरला होता ? असें तें होतें तरी काय ? कीं जें पाहून आम्ही अरबी समुद्रांत असूनहि आनंदसागरांत गटांगळ्या खात होतों ? आम्हांला आनंदातिशयानें बेहोश करणारी ती गोष्ट काय होती ती सांगूं? सांगतोंच—छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांच्या प्रत्यक्ष उजव्या हाताचा व डाव्या पायाचा सिमेंटवरील अत्यंत ठळकपणें उठलेला ठसा ! जिच्या दर्शनानें प्रेक्षक भारावून जातो तीच ही गोष्ट. याबाबत गाईड सांगूं लागला कीं—सिंधुदुर्गचें बांधकाम चालू असतां छत्रपति श्रीशिवाजीमहाराज येथें आले. त्यांची आठवण म्हणून कारागिरांनीं तटावरील ओल्या सिमेंटवर ( त्यावेळच्या सिमेंटसारख्या चुन्यावर ) त्यांच्या हातापायाचे ठसे उठविण्याची त्यांना विनंती केली. त्याप्रमाणें महाराजांनीं आपल्या हातापायाचे छाप त्या चुन्यावर उठविले आणि माझ्यासारख्या शेंकडों प्रवाश्यांना त्यांच्या पवित्र हातापायांचें दर्शन घेण्याची संधि प्राप्त झाली. त्या कारागिरांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. धन्य

त्यांच्या स्वामिभक्तीची ! शिवरायाचें स्वरूप आठवीत आम्ही खालीं उतरलों. येथें छपत्रति शिवबांचें एक स्मारक आहे. त्यांतील शिवबांच्या सुंदर मराठशाही पगडी परिधान केलेल्या मूर्तीचें दर्शन घेऊन आम्ही सिंधुदुर्गचा निरोप घेतला.

**अधेलीचा रिवाज :** आतांपर्यंत तन्मयतेनें मला माहिती सांगणारा माझा गाईड म्हणाला, " गेले ते दिवस. महाराज गेले व त्यांच्या मागें महाराष्ट्राला उतरती कळा लागली. परवा परवापर्यंत कोल्हापूरच्या महाराजांकडून पूजा-अर्चेसाठीं पंधरा-सोळाशें रुपये सालीना कसे तरी मिळत होते. तेहि आतां बंद झाले. प्रवाशीमहाशय, मी आतां जातों. मला कांहीं अर्थिक मदत करूं शकाल काय ? मी दोन तासांचे आठ आणे घेत असतों. निदान तीन चार तासांचे तेवढेच मला आपण दिले तरी पुरे आहेत. आपण ज्ञानार्जनासाठीं जिवाचें रान करून हिंडत आहांत. जास्त पैसे घेणें बरें वाटत नाहीं. परतु काय करावें ? दिवसच वाईट आले आहेत." मी त्याच्या हातावर एक अधेली ठेवून म्हणालों, " ही तुमच्या माहिती सांगण्यबद्दलची " व आणखी एक अधेली देऊन मीं सांगितलें कीं, " ही तुम्हीं उत्तम माहिती सांगितली म्हणून बक्षीस." तो खुष झाला. पुन्हा कधीं तरी जरूर येण्याचें आमंत्रण देऊन सलाम करून तो निघून गेला. आमच्या होडीवाल्यानें इतका वेळपर्यंत बरेच मासे बाहेर बसून पकडले होते. त्याच्या हातावर ठरलेलें भाडें दोन रुपये देऊन होडींत बसलों व तास अर्ध्या तासांत किनारा गांठला. जेवण आटोपून थोडी विश्रांति घेतली व हायस्कूलमध्यें गेलों. तेथील शिक्षकांकडून सिंधुदुर्गसंबंधीं आणखी कांहीं माहिती मिळाली, ती अशी — शिवाजीमहाराजांचें कोकणच्या आरमाराचें मुख्य ठाणें सिंधुदुर्गवर होतें. हबश्याच्या आरमाराचें मुख्य ठाणें राजापुरी हें शिवाजीमहाराजांनीं जिंकलें होतें. हबश्यापासून कोकणाला उपद्रव होऊं नये म्हणून त्याचा समुद्रांतील जंजिराहि जिंकण्याचा महाराजांचा विचार होता. परंतु हबश्याचें आरमार फार मोठें व किल्ला किंवा पाण्यांतील हा जंजिरा जिंकणें हें कामहि फार अवघड होतें. त्यामुळें महाराजांनीं आपलें स्वतंत्र आरमार स्थापन केलें, व हबश्याच्या जंजिर्‍यापेक्षांहि अजिंक्य असा सिंधुदुर्ग बांधला व कोकणचें संरक्षण केलें. शिवाजीमहाराज किती मुत्सद्दी होते याचें हा जंजिरा म्हणजे सिंधुदुर्ग हा एक मोठा पुरावा आहे.

**स्त्रीराज्यांत प्रवेश :** कार्यक्रमाची वेळ झालेली होती. यापूर्वी प्राथमिक शाळेंतून माझीं अनेक व्याख्यानें झालेलीं होतीं. परंतु हायस्कूलमध्यें व्याख्यान देण्याचा हा माझा पाहिलाच प्रसंग होता. त्यामुळें मनांत किंचित् भीति वाटत होती. परंतु कार्यक्रमानंतर अनुभव उलट आला. प्राथमिक शाळेपेक्षां हा कार्यक्रम सरस ठरला. हायस्कूलमधील मुलें जाणतीं असतात. त्यामुळें त्यांना निरनिराळ्या गोष्टींचें सहज आकलन होत असतें. सर्व विद्यार्थ्यांनीं माझें प्रसंगोचित स्वागत केलें. त्यामुळें हेडमास्तरांनाहि माझें लाजेकाजेस्तव स्वागत करावें लागलें. कारण कार्यक्रम ठरण्यापूर्वीच त्यांनीं माझें शालेय शिक्षण विचारलें होतें, व मी तें इंग्रजी फक्त चौथ्या इयत्तेपर्यंतच झालेलें आहे असें सांगतांच त्यांच्या कपाळावर आंठ्या पडल्या होत्या. आमदारांची चिठ्ठी नसती तर व्याख्यानाची परवानगीहि मिळणें अशक्य होतें. तशांत परीक्षेची गडबड होती, आणि हेडमास्तरसाहेब हे तर अगदीं चिडाचिड्या स्वभावाचे होते. परंतु माझें व्याख्यान झाल्यावर व त्याचा इतर शिक्षकांकडून रिपोर्ट ऐकल्यावर ते म्हणाले, "वयाच्या आणि शिक्षणाच्या मानानें फारच चांगले बोललांत आपण. बी. ए., एम. ए. झालेले लोक येथें येऊन गेलेले आहेत. परंतु मुलें इतकीं कधींच रंगून गेलीं नाहींत." कार्यक्रमाची परवानगी दिल्याबद्दल व देणगीबद्दल त्यांचे आभार मानून मी मुलींच्या शाळेंत व्याख्यानासाठीं गेलों. केवळ मुलींच्याच शाळेंत व्याख्यान देण्याचाहि हा माझा पाहिलाच प्रसंग होता. कार्यक्रमाची सर्व पूर्वतयारी झालेली होती. मी जाण्याचाच अवकाश होता. त्यामुळें मी जातांच कार्यक्रम सुरू झाला. प्रथम तर मला स्त्रीराज्यांतच गेल्यासारखें झालें. मी सोडून एकहि पुरुष तेथें नव्हता. त्यामुळें मला संवय नसल्यानें प्रथम संकोच वाटला. परंतु बिचाऱ्या स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षां अधिक आदरातिथ्यशील व विनयशील असतात. त्यांनीं खेळीमेळीचें वातावरण तेव्हांच निर्माण केलें आणि माझा संकोचहि नाहींसा झाला. व्याख्यान उत्तम झालें हें सांगणें नकोच. अशा प्रकारें मालवण येथें दोन तीन दिवस मजेंत घालवून मी पुन्हा येथून मागें परतलों व मोटारनें कसालहून कुडाळ येथें आलों.

**वादळ :** कुडाळ हें महाल किंवा पेटा आहे. येथें आलों तेव्हां सायंकाळचे साडेपांच वाजले होते. मोटारमधून बाहेर पडतांच आज लवकरच

अंधार पडलेला दिसत होता. आज दिवसभर आकाशांत ढगांनीं पांघरूण घातलेलें होतें. वाऱ्यानें थैमान चालविलें होतें. मधून मधून पावसाचे टपोरे थेंब पडत होते. त्यामुळें पांच सहा वाजतांच संपूर्ण अंधार पडलेला होता. म्हणून मोटारींतून उतरतांच विशेष विचार न करतां एका हॉटेलचा आश्रय घेतला. या हॉटेलचे मालक आरती प्रभु हे तरुण होतकरू कवि आहेत. माझी ओळख होतांच त्यांना फार आनंद झाला व मला लिहिण्याची अत्यंत हौस आहे, हें ऐकून तर ते माझे मित्रच बनले. माझी राहण्याची अत्यंत उत्तम सोय त्यांनीं केली व पैसेहि कमी घेतले. इकडच्या तिकडच्या गोष्टी करून, चहापाणी घेऊन विश्रांतीसाठीं सहज पलंगावर अंग टाकलें, आणि पांच मिनिटेंहि झालीं नाहींत तोंच बाहेर कसला तरी मोठ्यानें गोंगाट चालल्याचें मीं ऐकलें. तसाच उठलों व खिडकींतून बाहेर डोकावलें. पाहतों तों काय ? सर्व लोक वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळत होते. लहान मुलांच्या रडण्या-ओरडण्याचा एकच गिल्ला सुरू झाला होता. स्त्रिया मोठमोठ्यानें ओरडून आपल्या मुलांना शोधीत होत्या. कांहीं लोक धडाधड् दारें-खिडक्या बंद करीत होते. पळापळी, धावाधावी, एकच गोंधळ चालला होता ! क्षणभर तर मला कांहींच समजेना. हें सर्व चाललें आहे तरी काय ? गांवावर एखादा दरोडा येणार आहे, कीं गांवांत एखादा भयंकर जंगली प्राणी घुसला आहे, कांहींच तर्क लढविता येईना. शेवटीं आमच्या खाणावळींचीं दारें-खिडक्या बंद झाल्या. तेव्हां कुठें समजलें कीं, मोठें तुफानी वादळ येत आहे, अशी रेव्हेन्यू ऑफिसला बंदरावरून तार आलेली आहे. यावरून एकूण प्रकार समजला. समुद्रांत ताशीं शंभर मैल वेगाचें चक्री वादळ सुरू आहे. बोटी बंद पडलेल्या आहेत, व तें वादळ वेंगुर्लें कुडाळ या दिशेनें पुढें पुढें सरकत आहे. यामुळें सर्वत्र हाहाकार उडून गेला होता. कुणाच्याहि जिवांत जीव राहिला नव्हता. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें होतें. पुढें काय होतें यावर त्यांचें सर्व लक्ष केंद्रित झालें होतें. आमचे कविमहाशय तर फारच घाबरले होते. ते रसिक तर खरेंच, परंतु अत्यंत कोवळ्या मनाचे. मी त्यांना म्हणालों, " कविमहाशय, तुमच्या दृष्टीनें ही तर सुवर्णसंधि आहे. अहो ! निसर्गाच्या रौद्र स्वरूपावर तुम्हांला काव्य करतां येईल. " " छ् छ् छ् छे, न् न् न् नको तें काव्य. क् क् क् काय भ् भयंकर हा प्रसंग ! " असें ते घाबरून म्हणाले. मी बोलूनचालून प्रवासी

माणूस. प्रवासाचें खडतर व्रत उचललेला. मला अशा मामुली गोष्टीला भिऊन कसें चालेल ? मग तर जगणेंच अशक्य होऊन जाईल. मीं कवींना खूप धीर देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांची त् त् त, म् म् म, कांहीं केल्या बंद होईना. कुठें थोडें खुट् झालें कीं, कवि टण्कन् हातभर उंच उडायचे, “ ब् ब् बापरे ” म्हणून श्वास टाकायचे !

**हवामान खात्याचा अंदाज** : मीं त्यांना सांगितलें कीं, “ कविमहाराज, हा आपल्या हवामान खात्याचा अंदाज आहे. तो शंभर टक्के चूक ठरणार आहे, आणि हा माझा अंदाज मात्र शंभर टक्के खरा आहे. ” मी स्वदेशाभिमानी नाहीं असा अर्थ वाचकांनीं कृपेनें करून घेऊं नये. परंतु आपले दोष, आपली दुर्बलता आपणांस समजली नाहीं तर मग आपल्यासारखे आपणच. माझ्या एकाहि मंत्रानें कवींना गुण आला नाहीं. शेवटीं मी त्रासलों व सांगितलें, “ कविमहाशय, मला जेवायचें आहे, वाढा.” मीं पोट भरून सपाटून जेवण केलें. कवि माझ्या खादाडपणानें चाट पडले. वादळ येणार आहे, आमच्या जिवांत जीव नाहीं नि हा लेकाचा काय बकासुरासारखा खातो आहे, असेंच ते मनोमन म्हणत असतील. जेवण झाल्यावर खरोखरच वादळ येतें आहे कीं काय ? म्हणून मीं थोडा वेळ वाट पाहिली. परंतु तें कांहीं येईना. त्यामुळें आरामशीर पलंगावर झोपून अंगावर मोठा लेप पांघरून घेतला. बिचारे कवि व इतर प्रवाशी रात्रभर वादळाच्या धास्तीनें जागून सकाळपर्यंत ताटकळत होते. शेवटीं रात्र संपली, दिवस उगवला. तेव्हां कुठें त्याचा जीव भांड्यांत पडला. मी जागा होऊन पाहतों तों माझाच अंदाज शंभर टक्के बरोबर ठरला. दुसऱ्या दिवशीं व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. नंतर येथील एका सार्वजनिक वाचनालयास भेट दिली. गांवच्या लोकसंख्येच्या मानानें हें वाचनालय बरेंच मोठें आहे. माझ्याजवळ ‘ गीता प्रवचनें ’ हें विनोबा भावे यांचें पुस्तक होतें. तें वाचून झालेलें असल्यानें मीं ह्या वाचनालयास तें भेट म्हणून देऊन टाकलें. कारण प्रवासांत निरुपयोगी असें थोडेंसुद्धां ओझें मी जवळ ठेवीत नसें. पुस्तक दिल्याबद्दल ग्रंथपालांनीं माझे आभार मानले. यांत विशेष कांहीं नाहीं असें मीं त्यांना सांगून त्यांचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशीं कुडाळ सोडलें. पुन्हा माझी पदयात्रा सुरू झाली. या वेळेस मजजवळ भरपूर पैसे होते. परंतु कोकणांतील सृष्टिसौंदर्य पाहण्याची

मौज पदयात्रेंतच विशेष असते, त्यामुळें मी मुद्दाम पायानेंच चालत निघालों व वेंगुर्ल्याचा रस्ता धरला.

**कोकणांतील खेडें :** कोकणांतील खेडें मला फार आवडतें. आपल्याकडे देशावर तीन चार मैलांनंतर एखादें खेडें अथवा मध्यम गांव लागतें. दोन गांवांमधील रस्त्यावर प्रसंगीं माणूस भेटणेंहि मुष्कीलच. विशेषतः कोरडवाहू जमीन ज्या भागांत आहे अशा भागांत उन्हाळ्याच्या दिवसांत तर रस्त्यानें चिटपांखरूंहि दिसत नाहीं. सर्व रस्ता भयाण व रूक्ष दिसतो. असें दृश्य कोकणांत शोधून सांपडायचें नाहीं. कोकणांतील गांव एकाच ठिकाणीं घरांची गर्दी करून वसलेलें नसतें, व घरही आपल्या देशावरील घराप्रमाणें धाब्याचें नसतें. आपलीं धाब्याचीं घरें उघडींबोडकीं दिसतात. त्यांना कसलेंच सौंदर्याचें दुसरें अंग नसतें. इकडे अशीं घरें नसतात. येथें घर म्हटलें कीं, तें कौलारू व उतरत्या छपराचें असतें. त्याच्या भोंवतीं नारळी-पोफळींच्या झाडांची गर्दी असते. भाजीपाला व फुलझाडें असतात. परसांत आड असतो व या सर्वां-भोंवतीं मोठें कुंपण असतें. त्यामुळें तें अत्यंत आकर्षक व रम्य दिसतें. रस्त्याच्या दुतर्फा शेतांतून अशींच सर्व घरें दिसतात. पांचशें लोकसंख्येच्या एका खेड्याचा दोन चौरस मैलांचा विस्तार असूं शकतो. कोकणची लोकसंख्या सुपीकतेच्या मानानें आपल्यापेक्षां जास्त आहे. त्यामुळें प्रत्येक घरांतून चारदोन माणसें पोट भरण्यासाठीं मुंबईसारख्या शहराच्या आश्रयानें गेलेलीं असतात. कोकणांतील खेडें न पाहिलेलीं माणसें अभागीच समजावींत. कोकणां-तील स्त्रियांना फुलांची आवड फार. रोज सकाळीं स्नान झाल्यानंतर डोक्यांत ताज्या व सुगंधी फुलांची वेणी घातल्याविना एकहि स्त्री राहणार नाहीं. निदान चार दोन ताजीं फुलें डोक्यांत खोवल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाहीं. हा भौगोलिक अनुकूल परिस्थितीचाच परिणाम आहे. इकडे जेवणांत मुख्य पदार्थ भात, मासे, खोबरें, भाज्या वगैरे असतात, हें आपण भूगोल शिकतांना लहानपणींच वाचलें असेल. परंतु पुस्तकांतील वर्णन व प्रत्यक्ष अनुभव यांत जमीनअस्मानाचा फरक असतो. मी कोकणांत दीड महिना होतों. या काळांत मी येथें निदान शंभर वेळां जेवण घेतलें, परंतु या शंभर वेळेसहि मला जेवणांत भात आणि मासे मिळाले. सोबत इतर पालेभाज्या असतात, परंतु त्या फक्त तोंडी लावण्यापुरत्याच. पापलेट, सारंग, बांगडा, बोयर वगैरे तळलेले व

चमचमीत मसालेदार गरम गरम मासें खातांना बहार उडते. पुस्तकांतील नुसतें वर्णन वाचून ही मजा येईल का ? निश्चित नाहीं. स्त्रिया आणि पुरुष दोघेंहि इकडे कपडे फार कमी वापरतात. तेंहि अगदीं तलम. नारळी, पोफळी, काजू, आंबे, फणस वगैरे नानाविध प्रकारचीं झाडें, तांबडीलाल माती, कौलारू घरें, सुंदर फुलें वेणीवर माळून मिरवणाऱ्या स्त्रिया, वेगवेगळ्या खाड्यांवरील डौलानें ये-जा करणाऱ्या होड्या, तेथील नाना जातींचे पक्षी, वृक्षांच्या भारानें दबलेल्या छोट्या मोठ्या हिरव्यागार टेकड्या, मोठमोठ्या बागा, आसपास दरवळलेला फुलांचा सुगंध हें कोकणचें चित्र आहे. कोकणांत कोठेंहि जा, हेंच चित्र दिसणार. कित्येक वेळां तर माझी ह्या सारखेपणामुळें फसगत होई. एखाद्या रस्त्यावरून जातांना दिसणारें भोंवतालचें समान दृश्य पाहून मला नेहमीं वाटे कीं, ह्या रस्त्यानें मी पूर्वी गेलेलों आहें. परंतु तो रस्ता खरोखर पाहतां मला अपरिचित असे. दृश्यांत जरी साम्य असलें तरी तें पाहतांना नीरसपणा वाटत नाहीं अथवा कंटाळाहि येत नाहीं.

**फुरसेंमिया व माणियार बाबू :** अहो पण कोकणच्या वर्णनांत एक मुख्य गोष्ट सांगावयाची राहिलीच कीं ! सृष्टिसौंदर्य पाहात पाहात मी बागेंतून हिंडतांना कोठें तरी सळ्ळ्ळसळ आवाज होई. स्वारी कोठें तरी आहे याची ती पूर्व-सूचनाच असे. माझ्या पोटांत धस्स होई. कधीं नागराज तर कधीं घोणस ' साहेब ', कधीं फुरसें ' मिया ' तर कधीं माणियार ' बाबू ', कधीं हिरवा तर कधीं काळा, कधीं छोटा तर कधीं मोठा अशा प्रकारच्या नानाविध रूपानें हे महाशय मला नेहमीं भेटत असत. खरोखर कोकणांत सर्प फार. आपल्याकडे जर एखादा मोठा साप कोठें निघाला तर त्याला मारण्यासाठीं—प्रामुख्यानें तो बघण्यासाठीं—तोबा गर्दी जमते. परंतु कोकणांतील लोकांना पाली-सरड्याप्रमाणेंच हे परिचित वाटतात. ते यांची विशेष दखल घेत नाहींत. ' नित्य मरे त्याला कोण रडे ? '—रोजच माणूस मरायला लागला तर कोठपर्यंत रडायचें ? मात्र या सर्पांना भिऊन तुम्ही कोकण पाहायचा बेत ठरविला असेल तर बदलूं नका हं ?

**महाराष्ट्राचें श्रीनगर :** वाचकहो ! तुम्ही एकदा तरी कोकण पाहाच. दाक्षिण भारताचें काश्मीर केरळला म्हणतात. तसेंच दाक्षिणेकडील श्रीनगर अलेप्पी. भारताचीं हीं दोन्हीं नंदनवनें. एक थेट उत्तरेला तर एक थेट

दक्षिणेला. मोठा प्रवास केल्याशिवाय यांचें दर्शन घडत नाहीं. परंतु ज्यांना अनेक कारणांमुळें अशा प्रकारचा हा मोठा प्रवास करणें शक्य नसेल त्यांनीं कोकणचा संपूर्ण प्रवास तरी करावा. म्हणजे त्यांना निदान केरळच्या सृष्टि-सौंदर्याची तोंडओळख तरी होईल. कोकण हें महाराष्ट्रांतील नंदनवन आहे, आणि कोकणांतील बांदें हें गांव तर महाराष्ट्राचें श्रीनगरच होय. पण स्वतः पाहिल्याशिवाय हें खरें वाटणार नाहीं. प्रवासाचा आग्रह व महत्त्व मीच आपणांस सांगत आहें असें नाहीं. महाराष्ट्रांतील एक श्रेष्ठ संत श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनींहि तेंच सांगितलें आहे. त्यांच्याच शब्दांत सांगतों—

नाना पुरश्चरणें करावीं। नाना तीर्थाटणें फिरावीं।
नाना सामर्थ्यें वाढवावीं। वैराग्यबळें॥
नित्य नूतन हिंडावें। उदंड देशाटण करावें।
तरीच भिक्षा मागतां बरवें। श्लाघ्यवाणें॥
सृष्टीमध्यें बहुलोक। परिभ्रमणें कळे कौतुक।
नानाप्रकारींचें विवेक। आहळों लागती॥—समर्थ रामदास

अशा प्रकारें कितीतरी थोर पुरुषांनीं प्रवासाचें महत्त्व सांगितलें आहे. मी आपल्याला फक्त सृष्टिसौंदर्यानें नटलेलें सुंदर व आल्हाददायक कोकण पाहण्याचा सल्ला देत आहें. परंतु रामदासस्वामी तर सांगतात,—कुग्रामें अथवा नगरें। पहावीं घरांचीं घरें। भिक्षामिसें लहान थोरें। परीक्षूण सोडावीं॥— कुग्रामें आणि नगरें देखील पाहण्याचा ते सल्ला देतात. तेव्हां यापेक्षां कोकण पाहण्याचा जास्त आग्रह मी आपणांस करीत नाहीं.

कुडाळनंतर मी बिबवणें, वरवडे, मठ या मार्गानें पायीं प्रवास करीत वेंगुर्लें येथें गेलों. वेंगर्ल्यानंतरहि मी कोकणांत पुष्कळ फिरलों. या प्रवासांत मी कोकणांतील लोकस्थिति व रीतीभाती यांचा भरपूर अभ्यास केला. कोकणप्रवासांत एक दोन वेळां तर माझ्यावर अगदीं प्राणसंकट आलें होतें. परंतु सुदैवानें त्यांतून बचावलों. प्रवास म्हटला कीं, त्यांत या दोन गोष्टी हमखास असतात. परंतु दुःखाबरोबर सुखाचे क्षणहि कमी नसतात. किंबहुना सुखाचे क्षण हजारपटींनें जास्त असतात. परंतु मनुष्यस्वभाव असा आहे कीं, तो दुःखाच्या गोष्टी लवकर विसरत नाहीं. असाच एक बांका प्रसंग माझ्यावर आला होता.

**दंतकथा :** मी वरवडें गांवाहून पायीं प्रवासानें वेंगुर्लें येथें जाण्यासाठीं निघालों होतों. निघतांना थोडा उशीर झाला होता. त्यामुळें चालण्याची गति मीं थोडी वाढवली होती. वाटेंत मोठा डोंगर लागतो. या डोंगरापलीकडे मठ नांवाचें एक टुमदार खेडें आहे. या खेड्याहून वेंगुर्लें जवळच चारपांच मैलांवर आहे. या डोंगरांतून दोन रस्ते मठापर्यंत जातात. एक तीन मैल लांबीचा व दुसरा सहा मैल लांबीचा. मला उशीर झालेला असल्यामुळें मीं जवळचा म्हणजे तीन मैल लांबीचा रस्ता पसंत केला होता. परंतु हा रस्ता अवघड होता. तसे दोन्ही रस्ते घाटाचेच होते. परंतु मीं पसंत केलेला रस्ता जास्त धोक्याचा होता. परंतु हें मला फार उशीरा समजलें. घाटाच्या चढणीला सुरुवात झाली आणि अंधार पडला. या घाटासंबंधानें एक दंतकथा मीं ऐकलेली होती. सुमारें एक मैल घाट चढल्यानंतर तांबड्यालाल दगडानें पायऱ्या व पर्ची बांधून दीड मैल लांबीचा रस्ता अत्यंत भक्कम केलेला आहे. या रस्त्यासंबंधानेंच ती दंतकथा होती. या कथेवर इकडील पुष्कळ लोकांचा विश्वास आहे. ती कथा जशीच्या तशीच सांगितल्यास पुष्कळ विस्तार होईल. त्या कथेचा अर्थ एवढाच आहे कीं—या हजारों लाखों मोठमोठ्या दगडांची उलथापालथ करून, डोंगर फोडून, एका रात्रींत हा रस्ता हजारों मजुरांनीं खपून बांधून काढलेला आहे.—एवढ्या अवघड घाटांत इतका लांबरुंद रस्ता शेंकडों पायऱ्या बांधून एका रात्रींत तयार करणें हें साधें काम नाहीं. दंतकथेवर विश्वास ठेवणें न ठेवणें हा प्रश्न वेगळा. परंतु पुष्कळ दंतकथा अशा असतात कीं, त्यांत कांहींना कांहींतरी सत्यांश असतो. सर्वच असत्य नसतात. हें कांहींहि असलें तरी एक गोष्ट मात्र खरी आहे. ती म्हणजे मला रस्ता दाखविण्यासाठीं कोणी मार्गदर्शक नव्हता आणि अंधारांत कोणी सोबतहि नव्हतें. त्यामुळें एका रात्रींत बांधलेला हा रस्ता एका रात्रींत उतरून जाणें हें मला कांहीं शक्य वाटेना. तरीसुद्धां मी अंधारांतून मार्गक्रमण करीत चाललों होतों. खरें म्हणजे नव्यानेंच इकडे आलेल्या माणसानें रात्रींचा हा घाट ओलांडणें हें एक धाडसाचेंच काम होतें. कारण त्याला मार्गांतील धोके ठाऊक नसतात. परंतु 'अज्ञानांत आनंद असतो,' अशी एक इंग्रजी म्हण आहे. मला संभाव्य धोक्याची कांहींच कल्पना नसल्यानें मी निर्धास्तपणें चाललों होतों. कदाचित् माझ्यावर कांहीं वाईट प्रसंग आला असता तर त्याचा

कुणालाच पत्ता लागला नसता. परंतु मला घाटाचे तोंडीं दिवस मावळला होता तरी पुढें जाण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता.

**यमदूत कीं देवदूत ?** : अंधारांतून चालतांना दोन अस्पष्ट अंधुक आकृति मला दिसल्या. परंतु त्या पुढें पुढें सरकत होत्या. मला वाटलें हा दृष्टिभ्रम असावा. परंतु कधीं कधीं त्या चढउताराचे रस्त्यावर तर अत्यंत स्पष्ट दिसूं लागल्या. मी पाय उचलून चाललों व त्यांना थोड्याच वेळांत गांठलें. प्रथम तर त्या दोन व्यक्ति मला घाबरल्या. माझा एकूण प्रवासी पोशाख अंधारांत जास्तच नावीन्यपूर्ण व विलक्षण दिसत होता. परंतु थोडें बोलणेंचालणें झाल्यावर त्यांना धीर आला. मलाहि सोबत मिळाल्यामुळें आनंद वाटला. आतां पुढें अवघड घाटाचा रस्ता सुरू झाला. रस्त्याच्या दुतर्फा किर्रर झाडी होती. त्यामुळें रस्त्यावर काळाकुट्ट अंधार पडलेला होता. आम्ही एकमेकांस दिसत नव्हतों. चालण्याच्या आवाजावरून काय तें ओळखायचें कीं, आपल्याला सोबत आहे म्हणून ! आम्ही अगदीं श्वास रोखून दबा धरून चाललों होतों. कुठें जरा खुट्ट झालें कीं, आम्ही थांबून तो कशाचा आवाज होता याची खात्री करून मग पुढें निघायचों. इतक्यांत तीनचार काळ्याकुळकुळीत देहाचीं उघडींबंब माणसें हातांत बंदुका व भाले घेऊन आमच्या पुढें आलीं. यमदूतांप्रमाणें आमच्यापुढें ते उघडेबोडके लोक पाहून आमची काय स्थिति झाली असेल बरें ? त्या परिस्थितीचें वर्णन न केलेलेंच बरें. सर्व शक्ति एकवटून मीं विचारलें, "कोण आहे ? काय पाहिजे ?" त्यांतील एक म्हणाला, " सायंकाळीं एका रानडुकराला आमची बंदुकीची गोळी लागलेली आहे. त्यामुळें तें अतिशय चवताळलेलें आहे. इतक्यांत या खिंडीनें तें वर आलें आहे. तुम्ही सावध राहा. " प्रथमदर्शनीं आम्हांला यमदूतांप्रमाणें भासलेले ते लोक देवदूत निघाले. त्यांनींच बचावलें. जवळ होतें नव्हतें तेवढें सर्व सामान तेथेंच टाकून मी जवळच्या झाडावर चढलों. त्या प्रवाश्यांनींहि माझें अनुकरण केलें. झाडावर चढून दोन मिनिटें देखील झालीं नसतील तोंच ठ्ठ्ठो ऽऽऽ असा बंदुकीचा कानठळी बसण्यासारखा आवाज झाला. प्रथम एक मोठा चीत्कार व पाठोपाठ लागलीच भलें मोठें धूड दणकन् खालीं आदळलें. अंधारांतहि इतकी अचूक निशाणबाजी पाहून मला त्या शिकाऱ्याचें कौतुक वाटलें, व त्याचबरोबर माझ्या चपलपणाचेंहि !

कारण तें डुक्कर आम्ही जेथें उभे होतों तेथेंच मारलें गेलें. जर झटकन् आम्ही झाडावर चढलों नसतों तर त्या चवताळलेल्या डुकराच्या जागेवर त्यानें आम्हां तिघांनाहि पाडलें असतें. आजचा दिवस विस्मरणीय होता. रात्रीं मीं माझ्या दैनंदिनींत हीं हकीकत लिहून ठेवली. अशा प्रकारें प्रवासांत बरेच प्रसंग आले. त्यांतून बचावणें हा पुनर्जन्मच होय.

# वेंगुर्लें ते सावंतवाडी : ४

**अविस्मरणीय स्वागत :** कुडाळहून पदयात्रा करीत वेंगुर्लें येथें आलों. वेंगुर्लें हें मोठें गांव असून तालुक्याचें ठिकाण आहे. येथें शाळाहि पुष्कळ आहेत. त्यामुळें माझ्या सर्व प्रवासांत वेंगुर्लें व बेळगांव इतकीं व्याख्यानें कोठेंच झालेलीं नाहींत. माझा जेथें जेथें कार्यक्रम झाला तेथें तेथें मला शाळेच्या सहीशिक्क्याचें सर्टिफिकेट मिळालें; परंतु वेंगुर्लें व बेळगांवइतकीं सर्टिफिकेट्स मला कोठेंच मिळालीं नाहींत. येथेंच मीं –सांचीस्तूप–ही छोटी प्रवासवर्णनपर पुस्तिका लिहिली व किरात प्रेसमध्यें छापून घेतली. तीन हजार प्रती अवघ्या एक महिन्यांत खपल्या. दुसरी आवृत्ति काढण्याचा विचार होता, परंतु कोकण–प्रवासानंतर मी कर्नाटकांत गेलों. तेथें मराठी पुस्तकांचा कांहींच उपयोग नसल्यानें तो विचार सोडून द्यावा लागला. वेंगुर्लें व बेळगांव येथील शाळेंतून माझें जेवढें स्वागत तेथील शिक्षक–शिक्षिकांनीं केलें तेवढें स्वागत माझें पूर्वी कोठेंच झालें नव्हतें. कधीं कधीं प्रवासांत तर अगदीं याच्या उलट अनुभव येत असे. मी औरंगाबाद जिल्ह्यांतील अजंठा व वेरूळचीं लेणीं पाहण्यासाठीं गेलों होतों. हीं लेणीं पाहून परत मागें फिरलों. परंतु माझ्या नेहमींच्या संवईप्रमाणें मी आल्या रस्त्यानें परत न जातां जळगांवहून परत जाण्याचें ठरविलें. वाटेंत पहूर नांवाचें गांव

लागलें. येथें माझ्या व्याख्यानाचा एक कार्यक्रम झाला. रात्रीं माझी जेवणाची व राहण्याची व्यवस्था हेडमास्तरांनी एका शिक्षकांकडे केलेली होती. मी त्यांच्याबरोबर त्यांच्या घरीं गेलों. बऱ्याच इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर ते शिक्षक म्हणाले " कां हो ऽऽ! तुमची फार गरिबी आहे काय? असें वणवण करीत फिरण्यांत काय स्वारस्य आहे. काम केलें तर पोटापुरतें कोठेंहि मिळतें. ना बायको ना मूल, या जीवनांत काय अर्थ आहे? "

**मास्तरची व्याख्या :** वेरूळ आणि अजंठा हीं जगविख्यात लेणीं येथून जवळ आहेत तीं पाहण्यासाठीं जगाच्या कोनाकोपऱ्यांतून लोक येतात, परंतु तीं लेणीं आमच्या या दोस्तानें पाहिलींच नव्हतीं. हें आश्चर्य करण्यासारखें नाहींच, परंतु हे गृहस्थ तीन वेळां अजंठा गांवांत कांहीं कामानिमित्त जाऊन आलेले असूनहि त्यांनीं हीं लेणीं पाहिलीं नाहींत. वेरूळ अजंठ्याच्या रस्त्यावरील हा प्राणी पाहून मला त्याची अगदीं अंतःकरणापासून दया आली. मीं लहानपणीं मास्तरची एक व्याख्या ऐकलेली होती. त्या व्याख्येचा अर्थच मास्तर या शब्दांत भरलेला आहे. मास-तर = महिन्याच्या पगारावर तरणारा तो मास्तर. लहान मुलें मोठीं कल्पक असतात. त्यांची ही व्याख्या व हे मला भेटलेले शिक्षक यांची आठवण झाली कीं, अजूनहि मला त्या बिचाऱ्याची कींव येते. सांगण्याचा हेतु एवढाच कीं, वेंगुर्लें हें कोकणांतील गांव आहे. शिक्षणाचें प्रमाण आपल्यापेक्षां तेथें जास्त आहे. ते ज्ञानपिपासू लोक आहेत. प्रवासी म्हटला कीं, त्याला नाना देशांचे नाना चित्रविचित्र अनुभव असतात. निरनिराळ्या अनुभवाचें पोतडें त्याच्याजवळ सतत भरलेलें असतें. तेव्हां हे लोक त्याच्यापासून मिळेल तेवढें जास्तींत जास्त ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. ते माझें जें स्वागत करीत होते तें कांहीं मी मोठा पुढारी किंवा देशभक्त म्हणून नव्हे तर मला खूप ठेवून जास्तींत जास्त फायदा उपटण्याचा त्यांचा त्यांत हेतु असे. मला पुस्तिका छापून घेण्यासाठीं येथें जास्त दिवस थांबणें जरूर होतें, व त्यामुळें जास्त व्याख्यानें देणेंहि क्रमप्राप्त झालें. या परिस्थितीचा त्यांनीं पुरेपूर फायदा करून घेतला.

**शिरोडा :** वेंगुर्ल्यानंतर मी शिरोडा येथें गेलों. वाटेंत लागणाऱ्या खाड्या, डोंगर, टेकड्या पाहून अत्यंत आनंद होतो. शिरोडा हें सुप्रसिद्ध लेखक वि. स. खांडेकर यांचें गांव. ते येथील हायस्कूलमध्यें कांहीं दिवस अध्यापकाचें

काम करीत होते. त्यांनीं जेवढें लिखाण केलें त्यांतील बरेंचसें येथून जवळच असलेल्या भिकारा नांवाच्या टेकडीवर केलें असें खात्रीलायक कळतें. या टेकडीवर एक कुठलें तरी मंदिर आहे. आरवली नांवाच्या गांवाजवळ ही टेकडी आहे. येथील शाळेंत माझें व्याख्यान झालें. व्याख्यानानंतर वरील टेकडीवरील मंदिरांत शाळेंतील मुलांमुलींचा वनभोजनाचा एक कार्यक्रम होता. मुलांनीं मला कार्यक्रमास येण्याविषयीं खूप गळ घातली. त्यामुळेंच अनायासें ही टेकडी मला पाहतां आली. नांव जरी भिकारा असलें तरी येथें झालेली साहित्यनिर्मिति ही महाराष्ट्राच्या वाङ्मयभांडारांत अढळ स्थान मिळवून बसलेली आहे.

**दुर्दैवी कामगार ?** : येथून जवळच रेडी गांव आहे. रेडी येथील कच्च्या लोखंडाची खाण प्रसिद्ध व चांगल्या प्रकारची आहे. एक तर ही समुद्रकिनाऱ्यावर असल्यानें बोटीची स्वस्त वाहतूक करतां येते; आणि दुसरें म्हणजे येथील खाणींतील दगडांत लोखंडाचें प्रमाण शेंकडा साठ ते पासष्ट टक्के इतकें मुबलक असतें. येथून कच्चें लोखंड जर्मनी वगैरे परराष्ट्रांत पक्कें करण्यासाठीं पाठविलें जातें. मी खाणींत काम करणाऱ्या खाण-कामगारांना उन्हातान्हांत राबतांना पाहून विचारलें, " तुम्हांला मजुरी काय मिळते ? " चौकशीअंतीं कळलें कीं, अत्यंत स्वस्त मजुरीवर हे कामगार एवढ्या ढोर मेहनतीचें काम करीत असतात. हे लांबलांबच्या मुलखांतून पोटापाण्यासाठीं येथें आलेले होते. येथें अशा प्रकारच्या तीनचार खाणी आहेत. या सर्व कांहीं खाजगी भांडवलदारांच्या मालकीच्या आहेत असें कळलें. येथील मजुरांच्या घामाच्या धारांवर मालकांनीं आपल्या तिजोऱ्या सोन्यानें भरलेल्या आहेत. मी ऐन दुपारीं येथें गेलों होतों. इकडे लाल रंगाची माती असते. त्यामुळें सर्व कामगारांचे कपडे आखाड्यांतील पहेलवानाप्रमाणें दिसत होते. कपडे म्हणण्यापेक्षां लुंग्या म्हणणेंच जास्त उचित. कारण त्यांतल्या बऱ्याच लोकांना संपूर्ण कपडे घालणें उष्ण हवेमुळें शक्य नव्हतें. त्यामुळें लुंगी नेसलेलेच कामगार जास्त होते. कामगारांत प्रामुख्यानें तेलगू व कानडी कामगारांचा भरणा विशेष होता. मीं त्यांच्या घरीं जाऊन पाहिलें. हातानें स्वयंपाक करून खाणारेच जास्त होते. थोडे लोक कुटुंब करून राहिलेले होते. येथें पुष्कळ तरुण मुली अत्यंत स्वस्तांत पाणी वाहण्याचें काम करतांना मीं

पाहिल्या. कामगारांचीं घरेंहि–घरें कसलीं झोपड्याहि–अत्यंत साध्या होत्या. कुठलीच सोय त्यांत नव्हती. या कामगारांचें जीवन पाहून मला लहानपणीं शाळेच्या भिंतीवर वाचलेल्या एका म्हणीची आठवण झाली.–जो आपणचि कष्टत गेला तोचि भला–मला वाटलें ही म्हण आतां जुनीपुराणी झालेली आहे. त्याऐवजीं आतां शाळेंत जाऊन नवी अद्यावत् म्हण अशी लिहावी कीं–जो आपणाचि कष्टत गेला तोचि मेला—मोत्यांच्या हारापेक्षां घामाच्या धारांनींच मनुष्य जास्त शोभून दिसतो. ही म्हणसुद्धां निदान आजच्या आपल्या समाजव्यवस्थेंत तरी, श्रमजीवी जनतेला चकविण्याची, ऐतखाऊ लोकांची युक्ति आहे. श्रमजीवी जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे. मला येथील कामगारांबद्दल व त्यांच्या एकूण जीवनक्रमाबद्दल खूप वाईट वाटलें; परंतु नुसतें वाईट वाटून काय त्यांचा प्रश्न थोडाच सुटणार होता ? रेडी पाहून हळहळत मी तेथून मागें फिरलों. रेडी गांवांत व्याख्यानाचा कार्यक्रम झाला.

**यशवंतगड :** शिरोड्यास येतांना वाटेंत सडकेपासून सुमारें सहा फर्लांगा-वर समुद्रकिनाऱ्यावर यशवंतगड नांवाचा एक प्राचीन गड आहे. हा गड पाहण्यासाठीं गेलों. महाराष्ट्रांत अशीं कांहीं तीर्थक्षेत्रें आहेत कीं, ज्यांच्या दर्शनानें प्राचीन कालचें चित्र प्रेक्षकांसमोर उभें राहतें. शेंकडों वर्षांपासून धार्मिक भावनेनें का होईना, परंतु तीर्थाटन करावें अशी आपल्या देशांत रूढि आहे. एका दृष्टीनें मला यांत फार मोठा अर्थ वाटतो. यशवंतगड पाहूनहि मला अशाच प्रकारें इतिहासांतील अनेक प्रसंग आठवूं लागले. शिवाजीच्या काळच्या महाराष्ट्राचें चित्र मी कल्पनेनें माझ्या मनश्चक्षूंसमोर उभें करण्याचा प्रयत्न करूं लागलों. चित्रपटाप्रमाणें एकापाठोपाठ एक किती तरी प्रसंग माझ्या नजरेपुढून भरभर सरकत गेले. एके काळीं ह्या किल्ल्याची किती तरी ऊर्जितावस्था असेल ! याच गडावर शेंकडों स्त्री-पुरुष शिवबांच्या छायेंत स्वराज्याचा आनंद उपभोगीत असतील. शिवाजीमहाराज आपल्या कृष्ण-वर्ण ऐटबाज कृष्णा घोडीवर बसून शूर मावळे मित्रांसह कितीतरी वेळा याच रस्त्यानें गडावर गेले असतील. हो, याच रस्त्यानें. दुसरा गडावर जाण्यास मार्गच नाहीं ना ! हा गड ज्या अर्थी त्यांनींच बांधलेला आहे त्या अर्थी ते निश्चित येथें आलेले असतील. यांत कांहींच शंका नाहीं. त्यांना पाहून

गडावरचे लोक आपापसांत कांय बरें बोलत असतील ? यांचें स्वागत ते कशा प्रकारें करीत असतील ? शिवबांच्या स्वागताची त्यांची रीत कांहीं वेगळीच असेल. शिवाजीमहाराज त्यांच्या गळ्यांतले ताईत. मोठीच गडबड उडत असेल त्यांची ! अशा कितीतरी प्रसंगांचीं चित्रें मी पाहात होतों. हा केवळ माझ्यासाठींच असलेला चित्रपट पाहात कोण जाणें मी कितीतरी वेळ चालतों असतों. परंतु मध्येंच एका मुलीनें हटकलें. ती मुलगी आपल्या घरापुढील छपरांत बसून स्वेटर विणीत होती. ती मला म्हणाली, " तुम्ही एकटेच गडावर जाऊं नका. गड ओसाड पडलेला आहे. त्यांत खूप मोठमोठें उंच गवत वाढलेलें आहे. गडावरील भिंतींत व गवतांत अतोनात सर्प असतात. थांबा, मी तुम्हाला कोणीतरी माणूस सोबतीला देतें. " माझी तंद्री अगोदरच उडालेली होती. सर्पमहाशयांचें नांव ऐकून ती आजिबात राहिली नाहीं. त्या मुलीनें एक माणूस माझ्याबरोबर देऊन त्यास मला गड दाखविण्यास सांगितलें. गडाची ठिकठिकाणीं अतोनात पडझड झालेली होती. तरी त्याचें प्रवेशद्वार, तटाच्या कांहीं भिंती वगैरे त्याच्या अभेद्यपणाची व बळकटपणाची साक्ष देत होत्या. तटावर उंच उंच झाडें वाढलेलीं होतीं. गडावर एक मोठी विहीर असून तींत गोडें पाणी होतें. समुद्रकिनाऱ्यावरील एका उंच टेकडीवर ही गोड्या पाण्याची विहीर पाहून प्रेक्षकांस आश्चर्य वाटतें. सिंधुदुर्ग हा समुद्रांत असूनहि त्यांत अशाच प्रकारच्या दोन गोड्या पाण्याच्या विहिरी पाहून मी आश्चर्यानें थक्क झालों होतों. तें पाणी तर मीं स्वतः पिऊन पाहिलें होतें. येथील विहिरीचें देखील पाणी पिऊन खात्री करून घेण्याचा विचार होता; परंतु विहिरींत उतरणें म्हणजे सापघरांत उतरण्यासारखें होतें. तेव्हा विषाची परीक्षा पाहण्यासारखेंच हें काम होतें. त्यामुळें हा विचार सोडून दिला. गड पाहून झाल्यावर खालीं उतरून आलों. मला सोबत माणूस दिल्याबद्दल व इतका वेळ माझी सायकल व सामान सांभाळल्याबद्दल त्या मुलीचे मी आभार मानून शिरोड्यास निघालों. प्रवासांत मिळेल तें साधन वापरण्याची माझी तयारी असायची. रेल्वे, मोटार, सायकल, उंट, घोडा, इतकेंच काय मीं गाढवावरून देखील प्रसंगीं प्रवास केलेला आहे. त्यामुळें गैरसोय कधींच होत नसे.

**गोव्याच्या हद्दीवर :** शिरोड्याला जातांना वाटेंत मोठी खाडी लागते.

खाडींतून सायकल व मला पलीकडे जाण्यासाठीं अवघा एक आणा भाडें पडलें. त्या मानानें पुष्कळच स्वस्तांत ही सोय आहे असें वाटतें. खाडीवरील सृष्टिसौंदर्याचें पुन्हा वर्णन करणें म्हणजे पुनरावृत्तीचा दोष पदरीं घेण्यासारखेंच आहे. परंतु वाचकांना फक्त मी त्याची आठवण करून देतों एवढेंच. नेहमींप्रमाणेंच हें सृष्टिसौंदर्य पाहून शिरोड्यास आलों. शिरोड्याच्या शाळेंत व्याख्यानाचे कार्यक्रम झाले. नंतर मोटरनें सावंतवाडीकडे जाण्यास निघालों. वाटेंत मळेवाड कीं कुठलें तरी गांव लागलें. रात्रीची वेळ होती. आमच्या मोटारला येथें बरीच खोटी झाली. येथील पोलीसचौकीपुढें आमच्या गाडींतील सर्व प्रवाश्यांची खूपच कसून तपासणी झाली. मला तर नाना प्रश्न विचारून हैराण केलें. शेवटीं मी अगदीं चिडलों आणि सांगितलें कीं, " महाशय, आपल्या प्रश्नांचीं उत्तरें मी आतां देऊं इच्छित नाहीं. मला आपल्या समजदार ऑफिसरपुढें घेऊन चला. त्यांनाच काय तें मी सांगेन. तुम्हांला एका प्रश्नाचें एक उत्तर देऊन भागत नाहीं. " त्यामुळें त्यांनीं माझा नाद सोडून दिला. दुसऱ्याहि एका प्रवाश्यानें माझें अनुकरण केलें; परंतु त्याला मात्र हे लोक बरोबर घेऊन गेले. मी मधें पडणार होतों, परंतु तो प्रवासी दारू प्यालेला असल्यानें मी मधें पडलों नाहीं. चौकशीअंतीं मला कळलें कीं, गोवा-सरहद्द येथून फक्त एक मैल अंतरावर आहे. कांहीं काळा बाजारवाले तेथून चोरटा माल आणून त्याचा काळा बाजार करतात. म्हणून ही चौकशी येथें कसून होत असते.

**सावंतवाडी :** हें पूर्वीच्या या संस्थानच्या राजधानीचें गांव होतें. येथील राजवाडा प्रेक्षणीय आहे. राजवाड्यासमोर अत्यंत मोठा विस्तीर्ण तलाव आहे. त्यामुळें राजवाड्याच्या सौंदर्यांत अधिकच भर पडलेली आहे. या राजवाड्यांतील दिवाणखाना तर विशेष प्रेक्षणीय व सुंदर आहे. यांतील राजाचें बसण्याचें सिंहासन हें चांदीचें असून त्यावर नाग व तलवारीच्या छोट्या सोन्याच्या प्रतिमा विशेष सुंदर आहेत. सिंहासनावर अत्यंत सुंदर लाल मखमलीचे गादी-लोड पाहून तर माणूस थक्कच होतो. दिवाणखाना चांगला उंचापुरा व भव्य आहे. दरबार भरल्यानंतर ज्याचे त्याचे हुद्याप्रमाणें बसण्याची स्वतंत्र सोय यांत केलेली आहे. फौज उभी राहण्यासाठीं खास जागा दिवाणखान्यांत आहे. येथील गाईडनें सांगितलें कीं, शिवरामराजे भोसले यांचे

अनुक्रम २६४०६ वि: नों: दि: २३।३।६०


वडील व जवाहरलाल नेहरू हे बरोबरच विलायतेंत शिक्षण घेत होते. नेहरू या राजवाड्यास भेट देऊन गेल्याचेंहि त्यानें सांगितलें. येथील राजदरबार दसरा, दिवाळी, रंगपंचमी, हनुमानजयंति वगैरे दिवशीं भरत असे. त्या वेळीं लोकांचे तंटेबखेडे निकालांत काढले जात असत. दिवाणखान्याच्या वरील गॅलरींत चिकाच्या पड्याआड राजदरबारांतील स्त्रिया व शाही मेहमान यांची बसण्याची खास सोय केलेली आहे. राजवाडा पाहतांना मला सर्वांत आश्चर्य वाटलें तें एका गोष्टीचें. ती म्हणजे येथील जनानखाना. या जनानखान्यांत निवडक तरुण सुंदर स्त्रियांचा भरणा होता. हैदराबादच्या निजामाच्या जनानखान्यांत पांचशें, तर चीनची प्रचंड भिंत बांधणारा प्राचीन चिनी राजा याच्या जनाखान्यांत सोळा हजार स्त्रिया होत्या असें म्हणतात. याला काय म्हणावें ! याचा निर्णय मी वाचकांवरच सोपवतों. परंतु या विसाव्या शतकांत परवापर्यंत राजेलोकांच्या या लीला चालत होत्या. याला महदाश्चर्यच म्हणावें असें मला वाटतें. येथील राजवाडा पाहून मी सावंतवाडी येथील राणी पार्वतीदेवी हायस्कूल व कळसुलकर हायस्कूल येथें दोन व्याख्यानें दिली व बांदें हें गोव्याच्या सरहद्दीवरील गांव पाहण्यासाठीं गेलों.

**बांदें** : बांदें हें सृष्टिसौंदर्यानें बहरलेलें गांव आहे. निसर्गाची बांद्यावर कृपादृष्टि आहे. गोव्याचें सृष्टिसौंदर्य जसें महशूर आहे तसेंच बांद्याचें. गोव्याची हद्द येथून फार तर एक मैल अंतरावर आहे. येथें मी एका विद्यार्थी बोर्डिंगांत उतरलों होतों. बोर्डिंगचे सुपरिंटेन्डेंट हे फार होतकरू व सज्जन गृहस्थ आहेत. ते तेथील हायस्कुलमध्यें शिक्षक म्हणूनहि काम करतात. मी बांदें येथें दोन दिवस होतों. परंतु माझी अत्यंत उत्तम प्रकारें सोय त्यांनीं केली. कांहीं विद्यार्थ्यांबरोबर गोव्याच्या सरहद्दीवर गेलों. रस्त्यानें कांहीं अनोळखी लोक भेटले. त्यांचेकडून गोवा स्वातंत्र्यलढ्याविषयीं इत्थंभूत बातमी समजली. गोव्यांत सध्यां चालू असलेल्या क्रांतिकारकांच्या लढ्याविषयींहि पुष्कळ माहिती मिळाली. हे लोक निघून गेले. जातांना माझेजवळ एक सीलबंद पाकीट दिलें व, "हें पोस्टांत टाका". म्हणून मला सांगितलें. ते निघून गेल्यावर पाहतों तों त्या पाकिटावर पत्ताच घातलेला नव्हता. पोस्टांत टाकून आतां काय उपयोग ? म्हणून मीं तें फोडून पाहिलें. तें मजजवळ पाकीट देणारे इसम दुसरे तिसरे कोणी नसून गोव्यांतील भूमिगत क्रांति-

करकच होते, असें त्यांच्या पत्रांतील मजकुरावरून मला कळलें. त्या पत्रांतील सर्व मजकूर हिंदी भाषेंत लिहिलेला होता. लिपी मात्र इंग्रजी होती. प्रथम मला तें वाचतांच येईना. शेवटीं ही युक्ति ध्यानांत आली, तेव्हां कुठें पत्र वाचतां आलें.

**विषाची परीक्षा :** भारत आणि गोवें यांच्या सीमेवर ज्याच्या त्याच्या हद्दींत ज्या त्या सरकारच्या पोलीस चौक्या आहेत. भारत सरकारच्या पोलीस चौकीपुढें दहापांच पावलांवर आम्ही गेलों. पुढें न जाण्याचा त्यांनीं सल्ला दिला. पोर्तुगीज पोलीस आमच्याकडे गुरगुरणाऱ्या मांजरांप्रमाणें आपल्या तीक्ष्ण घाऱ्या डोळ्यांनीं पाहात होते. नुकताच गोवाविमोचनासाठीं येथें सत्याग्रह झालेला होता. त्यांना वाटलें, हे सत्याग्रहीच आहेत. त्यांची धावपळ सुरू झाली. त्यांनीं आपल्या बंदुका लोड केल्या आणि आम्ही त्यांच्या हद्दींत पाऊल ठेवतों कीं काय, हें ते डोळे विस्फारून पाहूं लागले. सुदैव आमचें कीं त्यांनीं गोळी घातली नाहीं. या रानटी लोकांची परीक्षा पाहण्यांत अर्थ नव्हता. तरीसुद्धां माझ्याबरोबरचे विद्यार्थी हे माझ्यापेक्षांहि जास्त धीट होते. ते मला आणखी दहापांच पावलें पुढें घेऊन गेले. आणि मग जो तमाशा झाला त्याची सांगता सोय नाहीं. माजलेल्या रानडुकरांसारखे ते गलेलठ्ठ पोलीस बंदुका सरसावून धडाधड उड्या मारीत चौकीच्या ओट्यावरून खालीं आले व एका रांगेनें सीमारेषेवर सज्ज होऊन उभे राहिले. माझ्या सर्वांगास कंप भरला. घसा कोरडा पडला. ते विद्यार्थीहि घाबरले. भारतीय चौकींतील पोलिसांनीं तावडतोब आम्हांस मागें ओढून घेतलें. नंतर मात्र तेथें एक सेकंददेखील न थांबतां आम्ही सर्वजण मागें परतलों. बांदें येथील दोन प्राचीन इमारती प्रेक्षणीय आहेत. एक रेडेघुमट व दुसरी बैलघुमट. रेडेघुमट ही इमारत फार भव्य आहे. पूर्वी बांदें येथें डचांची व्यापारी वखार होती. ज्या किल्ल्यामध्यें डच व्यापारी राहात असत, तो अद्यापहि चांगल्या स्थितींत आढळतो. येथें सध्यां पोलीस कचेरी आहे. त्यामुळें परवानगी घेऊन आम्हांला हा किल्ला पाहावा लागला. नदीकिनाऱ्यावरील उंच तटावर हा बांधलेला आहे. येथून नदीवरील देखावा विशाल व नयनरम्य दिसतो. आल्हाददायक थंड हवा लागते. सुमारें एक तास आम्ही येथून नदीकिनाऱ्यावरील शोभा पाहात होतों. दुसरे दिवशीं येथें व्याख्यानाचा कार्यक्रम फार मोठा झाला. विद्यार्थ्यांबरोबर शेंकडों नागरिकां-

नींहि यांत भाग घेतला होता. बांद्यानंतर पुन्हा सावंतवाडीस आलों व दुसरे दिवशीं कोकणांतील प्रसिद्ध आंबोली घाटानें चढून मोटारनें बेळगांवकडे प्रयाण केलें.

**प्रवासांतील पहिलीच अडचण :** घाट चढून मोटार वर चालूं लागतांच सर्व देखावा झपाट्यानें बदलून जातो. सुमारें दीड महिना डोळ्यांना कोकणचें सृष्टिसौंदर्य पाहण्याची संवय झालेली होती. नारळी-पोफळींचीं झाडें, मोठ-मोठ्या बागा, समुद्र, नद्या, खाड्या वगैरे दृश्य जाऊन त्याऐवजीं एकदम देशावरील माळरानाचें दृश्य दिसूं लागतांच थोडा वेळ चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. हा देखावा थेट आपल्याकडील माळरानासारखा दिसतो. नाहीं म्हणायला काजूंचीं व आंब्यांचीं झाडेंच फक्त आपल्या माळरानापेक्षां थोडा फरक दाखवीत होतीं.

# कर्नाटकांतील सफर : ५

**बेळगांव :** हें महाराष्ट्राच्या सरहद्दीवरील मोठें शहर आहे. येथून पुढें कर्नाटकची हद्द सुरू होते. राज्यपुनर्रचना झाल्यापासून बेळगांव कर्नाटकांत सामील झालें आहे. येथें कानडी व मराठी या दोन्ही समाजांचा मोठा भरणा असला तरी मराठा समाज येथें जास्त आहे. शहरांत अतोनात प्राथमिक शाळा आहेत. त्यांत कानडी शाळांपेक्षां मराठी शाळांची संख्या निदान दुप्पट आहे. माझ्या प्रवासांत कोठेंच जेवढ्या अडचणी आल्या नाहींत तेवढ्या प्रथम मला येथें आल्या. शाळेंतून व्याख्यानें देण्याची परवानगी घेण्याची मला कोठेंच गरज पूर्वी भासली नव्हती, ती येथें भासली. ए. ओ. साहेबांची परवानगी मिळविण्यांतच माझे आठ दहा दिवस खर्च होऊन गेले आणि

पुढें कर्नाटकांत तर माझी व्याख्यानांची आजपर्यंत पुरवलेली शिदोरीहि संपणार होती. कारण तिकडे माझें मराठी व्याख्यान कोण ऐकणार! हाहि प्रश्न माझ्यापुढें बकासुराप्रमाणें आ ऽऽ वासून होता. येथें मात्र कार्यक्रमाची परवानगी घेतल्यानंतर मीं सुमारें पाऊणशें व्याख्यानें दिलीं व त्यावर मला पुष्कळ पैसा मिळाला. बेळगांव व आसपासचीं खेडीं मिळून मीं बरींच व्याख्यानें दिलीं, त्यामुळें मला पांचशेंवर रुपये मिळाले. परंतु हे पैसे कर्नाटकांत व केरळमध्यें कसे पुरणार? शेवटीं मीं खूप विचार केला व माझ्यापुढें असलेल्या यक्षप्रश्नावर विचारांतीं मार्ग सांपडला. मीं थ्री डायमेन्शनचे तीनचार व्ह्यु मास्टर विकत घेतले. शंभरवर त्यांच्या रिल्स विकत घेतल्या. त्यांत सुमारें सातशें सुंदर रंगीत चित्रें होतीं. चित्रांची भाषा सर्वत्र एकच असते! यांचा मला खूप उपयोग झाला. पुढील सर्व प्रवास मीं या साधनांच्या साहाय्यानें केला. नऊ महिन्यांत मीं सुमारें तीन हजार रुपये मिळवले व तेवढे खर्चहि केले. प्रवासाला निघतांना तीन रुपये घेऊन गेलों व नऊ महिन्यानें घरीं नऊच आणे घेऊन आलों. कारण कष्टाशिवाय व भांडवलाशिवाय ज्ञान मिळत नाहीं. तें जर सहजसाध्य असतें तर मग जगाचें आज आहे तें चित्र दिसलें नसतें. सर्वच लोक ज्ञानी झाले असते.

**बेळगांवचा किल्ला :** बेळगांव येथील एक प्राचीन किल्ला प्रेक्षणीय आहे. एवढा मोठा अजस्र व सुंदर किल्ला मीं दाक्षिण भारतांत कोठेंच पाहिला नाहीं. हा भुईकोट किल्ला आहे. याचें क्षेत्र सुमारें शंभर एकर आहे. काळ्या रंगाच्या दगडानें बांधलेला तट जाडजूड व तीस फूट उंच आहे. तटाभोंवतीं मोठा भव्य खंदक असून तो सुमारें पन्नास फूट खोल व तितकाच रुंद आहे. त्यांत भरपूर पाणी असतें. या किल्ल्याचें वैशिष्ट्य म्हणजे यांत आजमितीसहि चार हजार लोकांची राहण्याची उत्तम सोय आहे. या रहिवाश्यांमुळें आंत एक मोठें थोरलें गांवच वसलें आहे. यांत दोन प्राचीन जैन मंदिरें आहेत. हीं मंदिरें फारच सुरेख आहेत. पैकीं कमलबस्ती हें मंदिर तर फारच सुंदर आहे. (बस्ती हें नांव जैन मंदिरास वापरतात.) कमळाच्या फुलाप्रमाणें मंदिराचा आकार आहे. त्यामुळें त्याचें वरील नांव पडलें आहे. या मंदिरास दुसरेंहि एक मेणबस्ती असें नांव आहे. मेणबस्ती या नांवाचा अर्थ येथील लोक असा सांगतात कीं, मेणावर जसें कोरीव नक्षीकाम करतां येतें

तसें या मंदिरावर केलेलें आहे. त्यामुळें हेंच नांव सार्थ आहे; आणि हें खरें आहे कीं, या मंदिराच्या सभामंडपाच्या छतावर इंच इंच जागेवर नक्षीकाम केलेलें आहे. त्यांत अनेक जैन मूर्ति वगैरे सुंदर चित्रें आहेत. छताचा आकार तर एकदम हुबेहुब कमळाच्या उमललेल्या फुलाप्रमाणें आहे. दगडांत कमळाच्या पाकळ्या कोरणाऱ्या त्या कलावंतांचें कौतुक वाटतें. धन्य त्यांची कला ! किल्ल्याचें प्रवेशद्वार भव्य आहे. समोर मोठें तळें आहे. या प्रवेशद्वाराचा इतिहास मोठा उद्‌बोधक आहे. दरवाज्यापुढें मोठ्या वाटोळ्या आकाराचा विहिरीसारखा भाग आहे, परंतु हा विहिरीसारखा खोल नसून दरवाजाच्या तटांत बांधलेला आहे. गुन्हेगारास शासन देण्याची ही जागा आहे. या विहिरीस दहा-बारा दरवाजे आंतून आहेत. ते अत्यंत लहान आहेत. गुन्हेगारास शासन देण्याचें ठरलें कीं, त्यास या विहिरींत निःशस्त्र करून सोडून देत. वर एक गॅलरी आहे. तेथें अधिकारी लोक बसत व नंतर विहिरींतील लहान दरवाज्यांतून आठ आठ दिवस उपाशी असलेले बारातेरा सिंह सोडले जात. काय भयंकर ही शिक्षा ! ते सिंह त्या गुन्हेगाराची लांडगेतोड करीत. त्यांच्या एकेकाच्या वांट्यास त्या गुन्हेगाराचा एकेक तुकडाहि येत नसे. अशा प्रकारची ही क्रूर शिक्षा देण्याची पद्धत पाहून अंग शहारून जातें. हा किल्ला पाहून झाल्यावर येथून जवळचा सुमारें सात मैलांवर यळ्ळूरगड नांवाचा एक प्रसिद्ध गड आहे, तो पाहण्यासाठीं मी गेलों.

**यळ्ळूरगड** : हा छोटेखानी व सुबक असा गड आहे. बेळगांव किल्ल्याच्या संरक्षणासाठींच हा बांधलेला होता. गड छोटा असला तरी अत्यंत उंच अशा एका टेकडीवर तो बांधलेला आहे. त्यामुळें टेकडीवरून भोंवतालच्या परिसरांतील सर्व दृश्य दिसतें. येथें कांहीं टेहळे बसत असत. हे लोक शत्रूची कोठेंहि चाहूल लागतांच जाळ करून अथवा अन्य साधनानें बेळगांवच्या किल्ल्यांत इशारा देत. बेळगांवहून हा गड स्पष्टपणें दिसतो. या गडावरील एक बारव पाण्यानें नेहमीं भरलेली असते. असें म्हणतात कीं, येथून बेळगांवच्या किल्ल्यापर्यंत भुयारी रस्ता आहे. येथील एका चोरवाटेंतून आम्ही किल्ल्याच्या बाहेर पडलों. मला ही चोरवाट फार आवडली. अशा प्रकारें हा किल्ला पाहून मी खालीं उतरलों. एक व्याख्यानाचा कार्यक्रम करून बेळगांवला गेलों. येथील एक प्रसिद्ध कम्युनिस्ट पुढारी कॉ. कृष्णा मेणसे यांच्या-

कडून गोकाक येथील एक पुढारी कॉ. अबदुल सत्तार यांना एक ओळखपत्र घेतलें व बेळगांव सोडलें. मग मी रेल्वेनें गोकाक रोड स्टेशनवर आलों.

**गोकाक :** स्टेशनबाहेर पडतांच गोकाक धबधब्याकडे जाणाऱ्या मोटारी बाहेर उभ्या होत्या. परंतु मोटारीवरील सर्व पाट्या कानडींत लिहिल्या होत्या. त्यामुळें मला कोणती मोटार कोठें जाते याचा कांहींच थांगपत्ता लागेना. स्टेशनवर सर्वत्र काळ्या रंगाचे मळकट कपडे घातलेले कानडीअप्पा दिसत होते. त्यांच्या सर्वांचे फेटे मात्र पांढरे सफेत होते. या मंडळींना मीं गोकाक धबधब्याकडे जाणारी मोटार कोणती म्हणून विचारलें. परंतु माझें म्हणणें कोणालाच समजेना. बेळगांवला कांहीं कानडी शब्द ऐकून मला पाठ झालेले होते. उदा० नानु वब्ब प्रवासी उद्येनू. उत्तर भारतद् प्रवास माडे, नानु वब्ब दक्षिण भारतद् प्रवास माडीयते. नानु कन्नड बरूत इल्ले. वगैरे अनेक व्यवहारोपयोगी शब्द मीं पाठ केले होते. त्यामुळें माझा पुष्कळ फायदा झाला. स्टेशनपासून धबधबा सुमारें तीन मैल दूर आहे. दुपारचे बारा वाजले होते. भूक सपाटून लागलेली होती. त्यामुळें मीं प्रथम स्नान व जेवण करून घेण्याचें ठरविलें. स्टेशनपासून जवळच तीन-चार फर्लांगांवर एक धरण घटप्रभा नदीवर बांधलेलें आहे. धरणावर जाऊन स्नान करून आलों. येथील एका खाणावळींत कानडी पदार्थांवर ताव मारून नंतर गोकाक धबधब्याकडे निघालों. रस्त्यानें जातांना सर्व प्रदेश रूक्ष व खडकाळ दिसत होता. गोकाक धबधब्यावर कॉ. अबदुल सत्तार यांच्याकडे उतरलों. थोडा वेळ विश्रांति घेतली व ताबडतोब एक माणूस बरोबर घेऊन निघालों.

**अविस्मरणीय स्थळ :** हा धबधबा घटप्रभा नदीवर आहे. घटप्रभा नदी एकदम सुमारें एकशें ऐंशी फूट खोल दरींत उडी घेते. सुमारें दोनशें चाळीस फूट रुंदीचा व दोनशें फूट उंचीचा एक मोठा कडा येथें तुटून हा धबधबा निर्माण झाला आहे. अमेरिकेंतील प्रसिद्ध नायगरा धबधब्यापेक्षां याची उंची सुमारें तिप्पट अधिक आहे. परंतु नायगऱ्याचा प्रवाह याच्याहि तिप्पट रुंद आहे. गिरसप्पा धबधब्याचे चारहि प्रवाह मिळून गोकाकच्या एक-तृतीयांश आहेत, परंतु गोकाक धबधब्यापेक्षां गिरसप्पाची शक्ति पांचपट अधिक आहे. पावसाळ्यांत या धबधब्याचा आवाज सुमारें पांच ते सहा मैल लांब ऐकूं जातो. धबधब्याच्या पायथ्यास एक हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर-

स्टेशन आहे. तें पाहण्यासाठीं जाण्याचें ठरविलें. परंतु त्याहीपेक्षां या पॉवर स्टेशनकडे जाण्याचा रस्ता जास्त प्रेक्षणीय आहे. धबधब्याच्या पश्चिम बाजूस एक अत्यंत मोठा खडक आहे. या खडकास तडा जाऊन एक भेग पडलेली आहे. या भेगेंतूनच सुमारें पांच-सातशें पायऱ्या काढून खालीं जाण्याचा मार्ग तयार केलेला आहे. दोन्ही बाजूंस उंच अक्राळविक्राळ कडे व त्यांतून हा गेलेला मार्ग आहे. या मार्गानें खालीं उतरतांना मृत्यूच्या दाढेंत उतरल्यासारखें वाटतें. मुळच्या जागेवरून ढळलेला हा कडा जर पुन्हा थोडा ढळला तर काय होईल बरें? अशी एक भयंकर कल्पना काळजाला चाटून जाते. पॉवर स्टेशनजवळून दिसणारें दृश्य अत्यंत भव्य नि दिव्य आहे. निसर्गाच्या विशालतेची कल्पना करवत नाहीं. या घनगंभीर वातावरणांत कमालीची रमणीयता आहे. नदीचें पाणी जवळ जवळ आटलें असल्यामुळें तें वाहात नव्हतें. खालीं प्रचंड पाण्याचा डोह होता. जें कांहीं थोडेंफार पाणी वाहात होतें तें पाईप लाईनमधून या पॉवर स्टेशनसाठीं घेतलेलें होतें. हें पॉवर स्टेशन पाहिल्यानंतर पुन्हा त्या सातशें पायऱ्या चढण्याचें दिव्य आम्हांला करावें लागलें. साहेबलोकांसाठीं मात्र यारी होती. ते या यारीनें ये-जा करीत असत. येथें निर्माण होणाऱ्या विजेवर येथेंच एक कापड गिरणी चालते. गिरणीचा मालक ब्रिटिश भांडवलदार आहे. श्रम आपले लोक करतात. नफा तो विलायतेला रवाना करतो. पूर्वी ब्रिटिश लोकांची येथें सत्ता होती. आतां नाहीं. परंतु पूर्वी ते हेंच करीत होते. आतांहि ते हेंच करतात. स्वातंत्र्यानंतर यांत बदल व्हायला पाहिजे. कां कुणास ठाऊक, पण तो होत नाहीं. या गिरणीसंबंधानें विचार करीत मी एका ब्रिजवर जाऊन पोहोंचलों.

**झुलता पूल** : हा पूल लोखंडी तारांचा बनविलेला आहे. याची लांबी सुमारें साडेसहाशें फूट असून रुंदी फक्त तीनचार फूट इतकी थोडी आहे. नदीच्या पात्रापासून उंची सुमारें तीस ते चाळीस फूट आहे. या पुलावरून चालतांना तो वजनामुळें खालींवर झोके घेतो किंवा झुलतो म्हणून यास झूलता पूल असें नांव आहे. पुलावरून चालतांना संवय नसलेल्या माणसाला भीति वाटते. कधीं कधीं तर भोंवळ येण्याचाहि संभव असतो. खालीं पडण्याची कित्येकांना भीति वाटते. परंतु दोन्ही बाजूंस कमरेइतक्या उंचीच्या तारांचीं जाळीं लावलेलीं आहेत. त्यामुळें खालीं पडण्याचा प्रसंग येत नाहीं. माणूस जर

येथून खालीं पडला, तर मात्र त्याची सोय नाहीं. तो थेट प्रवाहाबरोबर धबधब्यांतच जाणार. कारण, धबधबा येथून अगदीं जवळच खालच्या बाजूस आहे. संवय झाल्यावर मात्र येण्याजाण्याची मजाच वाटते. गांवांतून येणाऱ्या गिरणी-कामगारांना पावसाळ्यांत येण्या-जाण्यासाठीं हा पूल बांधलेला आहे. पुलाच्या दोन्ही टोकांकडे दोन वॉचमन सतत ठेवलेले असतात. पुलाच्या दोन्ही बाजूंस नदीकिनाऱ्यावर दोन प्राचीन सुंदर देवालयें आहेत. धबधब्याच्या जवळपासचें वातावरण अत्यंत रमणीय आहे. आजूबाजूचा प्रदेश मात्र रूक्ष व खडकाळ असा आहे. गोकाक स्टेशनवरून येतांनाहि ही गोष्ट लक्षांत येते. येथें मी दोन दिवस अबदुल सत्तार यांच्याकडेच उतरलों होतों. ते येथील गिरणी-कामगार युनियनचे मोठे पुढारी आहेत. त्यांना हिंदी भाषाहि मोडकीतोडकी समजत होती, बोलतां मात्र येत नव्हती. येथील शाळेंत माझा व्हयू मास्टर प्रोग्रॅम झाला.

रात्रीं येथें एक उघड्यावर सिनेमाचा कार्यक्रम होता. अशा प्रकारचा कार्यक्रम येथें प्रत्येक आठवड्यांतून दोन वेळां असतो. हा सिनेमा गिरणी-मालक येथील कामगार स्त्री–पुरुषांना मोफत दाखवितात. महिन्याकांठीं प्रत्येक कामगाराचे तीन आणे खर्चासाठीं कापले जातात. त्या मानानें पुष्कळ स्वस्तांत म्हणजे जवळ जवळ मोफत येथील सर्व लोक हा कार्यक्रम बघतात. अर्थातच मलासुद्धां हा सिनेमा पाहावा लागला. गोकाक गांव येथून पुढें तीन मैल आहे. तेथें जाण्याचा विचार होता; कारण तेथील लाकडी खेळणीं प्रसिद्ध आहेत. परंतु पुढें जाण्याची मला घाई असल्यानें तो विचार सोडून द्यावा लागला. गोकाक धबधब्यावर असलेली सर्व वस्ती गिरणी-कामगारांची आहे. त्यांच्यासाठीं येथें बऱ्यापैकीं चाळी बांधलेल्या आहेत. पिण्याच्या पाण्याची वगैरे सोय चांगली केलेली आहे. या बाबतींत आपल्या देशी भांडवलदारांपेक्षां हे परकी भांडवलदार फार पटीनें चांगले आहेत. आपल्या भांडवलदारांत असे लोक विरळा सांपडतात. येथून बराच मोठा प्रवास मीं वाटेंत कोठेंच न थांबतां केला. हा सर्व प्रवास रेल्वेनें व मोटारनें करून मी विजापूरला गेलों.

● ● ●

# गोल घुमटाच्या परिसरांत : ६

**विजापूर** : हें इतिहासप्रसिद्ध शहर आहे. मोटार विजापूरपासून मैल दोन मैल मागें असते, तोंच शेंकडों प्राचीन मशिदी, दर्गे वगैरे घुमटाच्या इमारती इतस्ततः विखुरलेल्या दिसतात. शहरांतून फिरतांनादेखील अतोनात अशा इमारती चोहोंकडे दिसतात. त्यामुळें प्रेक्षकास क्षणभर असा भास होतों कीं, आपण आदिलशाहीच्या जमान्यांतच फिरत नाहीं ना? खरोखर येथील या खंडोगणती इमारतींना भेट देणें हें प्रवाश्याच्या आवांक्याबाहेरचें आहे. कारण येथील कांहीं इमारती जगप्रसिद्ध आहेत. त्यांना भेट देण्यांतच प्रवाश्याचा बराच वेळ जातो. त्यामुळें त्याला या सर्व इमारती पाहावयाच्या म्हटलें तर येथला रहिवाशीच झाले पाहिजे.

मी येथें कम्युनिस्ट पार्टीच्या ऑफिसवर उतरलों होतों. कारण प्रवासांतील प्रवाशी माणसांचीं हींच घरें असतात. निदान मी तरी निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या ऑफिसवर, शाळेंत किंवा कुठल्या तरी अशा प्रकारच्या सार्वजनिक ठिकाणीं उतरणेंच पसंत करीत असें. त्यापासून फार फायदे असतात. सुशिक्षित व जबाबदार लोकांचा परिचय होतो. त्यामुळें संरक्षणाची हमी मिळते. कारण नवीन ठिकाणीं कुठल्या तरी खाणावळींत अथवा लॉजिंग-बोर्डिंगमध्यें उतरणें नेहमींच संरक्षणाचें नसतें. प्रवासांत तर मला कांहीं लॉजिंग-बोर्डिंगचा इतका कांहीं वाईट अनुभव आला कीं, सांगतां सोय नाहीं. कायद्याचा प्रश्न आहे. शिवाय ज्या लोकांचें बिंग मी फोडीन, त्यांच्यापासून माझ्या जीवितास धोका आहे. परंतु तरीहि माझ्या अनुभवापासून माझ्या प्रवासीमित्रांना मी सावध करूं इच्छितों कीं, पूर्ण खात्री असल्याशिवाय अवेळीं भलत्याच ठिकाणच्या लॉजिंग-बोर्डिंगचा आश्रय घेऊं नका. त्यामुळें प्रसंगीं तुमच्यावर नसतें संकट येण्याची शक्यता असते. सांगण्याचा हेतु असा कीं, याच कारणामुळें मी पार्टी ऑफिसवर उतरत होतों. कुठल्या तरी स्थानिक यात्रेची तयारी करण्यांत सर्व लोक या वेळीं गुंतलेले होते. अनायासेंच ही यात्राहि मला पाहतां आली. शेंकडों स्त्रीपुरुष आसपासच्या खेड्यांतून

यात्रेसाठीं नुकतेच आले होते. ही यात्रा तीनचार दिवस सतत भरते. तेव्हां शेवटच्या दिवशींच यात्रा पाहावी, असें ठरवून दुसऱ्या दिवशीं सकाळींच मी ऑफिसबाहेर पडलों.

**गोल घुमट :** ही जगप्रसिद्ध भव्य इमारत गांवाबाहेर दोन मैल अंतरावर आहे. ही इमारत रेल्वे-स्टेशनच्या बाजूस असल्यानें टांग्यांची सारखी रहदारी या रस्त्यावरून चालू असते. शिवाय ही इमारत पाहण्यासाठीं रोज बाहेरून शेंकडों लोक येत असतात. यात्रेच्या निमित्तानें तर लोकांचे लोंढेच्या लोंढे या रस्त्यानें वाहात होते. त्यामुळें टांगा मिळणेंदेखील कठीण काम झालें होतें. शेवटीं एक टांगा कसा तरी मिळाला. टांग्यांतून बाहेर पडतांच समोर ही पर्वताप्रमाणें अजस्त्र इमारत दिसूं लागते. प्रेक्षक जों जों या इमारतीजवळ जातो तों तों ही अधिकाधिक उंच होत चालल्याचा भास प्रेक्षकास होतो. इमारतीच्या प्रवेशद्वारांत जातांच प्रेक्षक आश्चर्यानें थक्क होतो. एवढें मोठें प्रवेशद्वार परंतु तें दुरून असून नसल्यासारखेंच दिसतें. या अवाढव्य इमारतीस हें प्रवेशद्वार, एखाद्या लहान खिडकीप्रमाणें दिसत होतें. दरवाजापुढून वर पाहिलें तर डोक्यावरील टोपी खालीं पडावी एवढी अफाट ह्या इमारतीची उंची आहे. सुमारें बारा फूट उंचीच्या दोन चवुतऱ्यांवर ही इमारत बांधलेली आहे. इमारतीच्या नुसत्या भिंतीच शंभर फूट उंचीच्या व अकरा फूट जाडीच्या आहेत. त्यावर हा शंभर फूट उंचीचा अवाढव्य घुमट आहे. एकूण सव्वा-दोनशें फूट उंच व तेवढीच लांब-रुंद अशी ही इमारत आहे. इमारतीच्या चार कोपऱ्यांत चार मिनार आहेत. या मिनारमधून वर जाण्यासाठीं गोलाकृति जिना आहे. सुमारें दोनशेंसाठ पायऱ्यांनीं चढून गेल्यावर प्रेक्षक भिंतीवर जाऊं शकतो. येथून वर आणखी शंभर फूट उंचीवर घुमटाचें शिखर राहतें. खालीं पाहिलें तर डोळे गरगरा फिरतात. घुमटाला चोवीस झरोके ठेवलेले आहेत. आंत गेल्यावर एक गॅलरी लागते. ही सुमारें अकरा फूट रुंद आहे. गॅलरींतून दिसणारें दृश्य हृदयास धक्का देणारें आहे. एवढ्या अवाढव्य इमारतींत एकहि खोली नाहीं कीं तिला एकहि खांब नाहीं. खालीं शंभर फूट खोल व वर तेवढीच उंच. हें इमारतीचें विराट् स्वरूप पाहून मति गुंग होते. प्रेक्षकास एकापाठोपाठ एक आश्चर्याचे धक्के बसतात. दुसरी गोष्ट म्हणजे यांत कुठलाहि एक आवाज काढला कीं, तो लागोपाठ बरोबर

अकरा वेळेस स्पष्ट ऐकूं येतो. त्यामुळें तर माणूस जास्तच गोंधळांत पडतो. एका वेळीं इमारतींत अनेक प्रेक्षक असले व असा आवाज त्यांनीं दिला तर भुतावळ उठल्यासारखें वाटतें. कारण प्रत्येकाच्या प्रत्येक शब्दाचे अकरा प्रतिध्वनि निघतात. तेसुद्धां मोठ्या चमत्कारिक रितीनें ऐकूं येतात. आवाज लपकत लपकत ऐकूं येतो. म्हणजे निरनिराळ्या चढउतारावरून तो आदळत येत आहे असा भास होतो. प्रेक्षक आश्चर्याचा एक धक्का बसून शुद्धीवर येतो न येतो तोंच त्याला महदाश्चर्याचा दुसरा धक्का बसतो. तें आश्चर्य म्हणजे अत्यंत हळूच उच्चारलेला शब्ददेखील एकशेंपंचवीस फूट लांब स्पष्ट ऐकूं जातो. या गोष्टीची मीं स्वतः खूप चांगली खात्री करून घेतलेली आहे. त्यासाठीं निवांतपणें एक दिवस मुद्दाम मीं पुन्हा हा घुमट पाहिला होता. वाचकांनीं एक प्रयोग करून पाहावा. सुई किंवा टांचणी वरून खालीं जमिनीवर टाकावी, आणि तो आवाज किती लांब जातो याची आपल्या मित्राकरवीं खात्री करून घ्यावी. नंतर एक मोठी लोखंडी पहार घ्यावी व तिच्याहि आवाजाची अशा प्रकारें खात्री करून घ्यावी. मी प्रयोग केलेल्या अनुभवावरून सांगतों कीं, पहारीचा आवाजदेखील सव्वाशें फूट ऐकूं जात नाहीं. या इमारतींत टांचणीचा आवाज स्पष्ट सव्वाशें फूट लांबवर ऐकूं येतो. आश्चर्य म्हणजे सव्वाशें फूट लांबवर ऐकूं येणारा हा हळू आवाज मात्र एक शब्द फक्त एकच वेळेस ऐकूं येतो. घुमटावर चढण्यास मागच्या बाजूनें एक मोठा साखळदंड बांधलेला आहे. कांहीं हौशी व धाडसी लोक या गुळगुळीत घुमटावर पायऱ्या वगैरे कांहीं नसतांना केवळ ह्या लोखंडी साखळदंडास धरून घुमटाच्या थेट शिखरावर जातात व तेथून शहराची शोभा पाहतात. तसें पाहूं गेलें असतां या भिंतीवरूनहि शहराचा व दूरवरचा खूप लांबच लांब देखावा दिसतो. परंतु आणखी एवढ्याच उंचीवरून तो खात्रीनें अधिक प्रेक्षणीय दिसत असेल.

**स्वर्गाचा प्रवास** : मीं घुमटावर चढण्याचा प्रयत्न केला. सुमारें वीस-पंचवीस फूट गेलों असेन. सहज मागें लक्ष गेलें आणि डोळे आपोआप झाकले. हृदयाचे ठोके बंद पडतात कीं काय असें वाटूं लागलें व साखळदंडावरील हात ढिले पडले. आणखी वर जाण्याचा प्रयत्न करणें म्हणजे मरणाला कवटाळण्यासारखें होतें. त्यांत मला कांहीं अर्थ दिसेना. पुन्हा खालीं उतरलों.

भिंतीवर पाय ठेवतों न ठेवतों तोंच पायाच्या पोटऱ्यांना व हाताच्या बोटांना वांब आले. जर असा प्रसंग उतरलों तेथून अगर पन्नास फूट उंचीवर गेल्यानंतर आला असता तर? विनासायास आणि हमखास घुमटाच्या शिखरावरच काय, परंतु थेट आकाशांत—स्वर्गांत गेलों असतों. म्हणजे मृत्यु हा ठरलेलाच होता. ही अवाढव्य इमारत खरोखर पर्वताची बरोबरी करणारी आहे. जगांतील प्राचीन इमारतींत इतकी भव्य इमारत कोठेंच नाहीं असें म्हणतात (इजिप्तचे पिरॅमिड सोडून). ही इमारत अलि आदिलशाहाचें कबरस्थान आहे. त्याच्या मुलानें आपल्या बापाच्या थडग्यावर ही जागतिक कीर्तीची इमारत बांधलेली आहे. ह्या इमारतींत सध्यां पांचसात छोटीं थडगीं आहेत. हीं आदिलशाहा, त्याची बेगम व मुलेंमुली यांचीं आहेत. केवळ थडग्यांसाठीं ही नेत्रदीपक, अतिभव्य व गगनचुंबी इमारत बांधलेली आहे, हेंहि एक आश्चर्यच आहे. मला येथें कळलें कीं, नुकत्याच कांहीं दिवसांपूर्वीं या इमारतीच्या रंगरंगोटीसाठीं तीनचार लक्ष रुपये सरकारनें मंजूर केलेले आहेत. रंगरंगोटीसाठीं जर चार लक्ष रुपये तर मग ही बांधण्यासाठीं किती गडगंज पैसा लागला असेल? किती कामगारांचे श्रम हिनें घेतले असतील? विशेष गोष्ट म्हणजे संपूर्ण इमारत फक्त जुन्या काळच्या विशिष्ट रांध्याच्या मातीनें बांधलेली आहे. किंचित् पिवळ्या रंगाची ही माती आहे. असें असतांना सुद्धां आज कित्येक पिढ्या गुजरल्या तरी ती चांगल्या स्थितींत आहे.

**टेंभा विझला :** घुमटाच्या डाव्या बाजूस एक मोटी मशिद आहे. खरें म्हणजे ही मशिदच इतकी भव्य आहे कीं तीच पाहावी. परंतु शेजारीं घुमट असल्यानें तिचा भव्यपणा व महत्त्व कमी झालेलें आहे. उत्तमाखालीं चांगलेंहि झाकलें जातें. तद्वत् ही गोष्ट आहे. घुमटासमोर दुसरी एक इमारत आहे. हिच्यांत पुराणवस्तुसंग्रह ठेवलेला आहे. अनेक सुंदर जुन्या चित्रांचा संग्रह यांत आहे. हें सर्व पाहून झाल्यावर मला वाटलें इमारत संपूर्ण बघण्याचें काम झालें. परंतु या इमारतीखालीं म्हणजे गोल घुमटाखालीं एक रहस्यमय तळघर आहे. तें पाहण्याचें राहूनच गेलें होतें. या तळघरांत नेहमीं अंधार असतो. टेंभे लावून अथवा बॅटरीच्या उजेडांत हें पाहावें लागतें. अशी येथें सोय केलेली आहे. चार आठ आणे दिले कीं काम होतें. इमारतीचें सालीना उत्पन्न हजारों रुपये होतें. हें तळघर म्हणजे चक्रव्यूहच आहे. आंत शेंकडों कमानी

आहेत. प्रेक्षक एकदा आंत गेला कीं, बाहेर येण्याची पंचाईत. मी तर एक तासभर टेंभा घेऊन इकडून तिकडे आंत फिरत होतों, पण मार्गच कोठें दिसेना. शेवटीं टेंभाहि विझून गेला. अंधारांतच पांच मिनिटें बसून राहिलों. शेवटीं येथील गाईड आला व त्यानें मला बाहेर काढलें. अशा प्रकारें ही इमारत बघण्यास मला पांच ते सहा तास लागले. नंतर दुपारचें जेवण व विश्रांति घेऊन येथील दुसरी प्रसिद्ध इमारत जोडघुमट ही पाहण्यासाठीं गेलों. ही इमारत औरंगजेबाच्या दोन गुप्त हेरांच्या स्मरणार्थ औरंगजेबानें बांधलेली आहे. दोन घुमट किंवा जोडघुमट असें हिचें नांव आहे. या दोन्ही घुमटांच्या आकारांत व रंगरूपांत विलक्षण साम्य आहे. हे घुमट पाहात असतांना मला एक अभूतपूर्व अद्‌भुत असा प्रसंग पाहता आला.

**अंगांत आलें** : या घुमटामध्यें सुमारें पांचसहाशें तरुण स्त्रिया आलेल्या होत्या. या सर्व स्त्रिया कानडी होत्या. अंगावर उंची वस्त्रें होतीं. केस मोकळे सोडलेले असून त्या अत्यंत सौंदर्यवती होत्या. सर्वच कानडी स्त्री-पुरुष काळे असतात, असा निदान माझा तरी पूर्वी समज होता. परंतु कांहीं लोक गोऱ्याहि रंगाचे असतात. काळ्या रंगाच्या लोकांचें प्रमाण इकडे जास्त आहे हें मात्र खरें आहे. या स्त्रिया कांहीं सर्वच गोऱ्या रंगाच्या नव्हत्या, तरी देखील त्या सुंदर दिसत होत्या. त्या सर्व स्त्रिया येथें जमलेल्या पाहून मला वाटलें कीं, येथें महिला संघाचा एखादा कार्यक्रमच आहे. परंतु तसें कांहींच नव्हतें. मी तेथें जातांच सर्व स्त्रिया माझ्याकडे पाहूं लागल्या. मी ओशाळलों. परंतु तसाच धीर धरून पुढें गेलों. शेंकडों उदबत्त्यांचा व शेर दीड शेर उदाचा पांच मिनिटांत तेथें फडशा पडत होता. उदाचा उग्र दर्प सुटला होता. उदबत्त्यांचा सुगंध हवेंत दरवळत होता. त्यामुळें सर्व वातावरण एक प्रकारच्या विशिष्ट भावनेनें भारावलेलें होतें. आतां पुढें काय होतें म्हणून मी पाहूं लागलों. तोंच त्या सर्व स्त्रिया या घुमटांतील कबरीपुढें जाऊन घुमूं लागल्या. त्या सर्वांच्या अंगांत भूत संचारल्याप्रमाणें त्या जोर-जोरानें हुंदके देत हंअऽहंअऽहंअक असा चमत्कारिक आवाज करीत घुमत होत्या. त्यांचा तो आक्रोश व विचित्र अंगविक्षेप पाहून मी तर चाटच पडलों. औरंगजेबाचे दोन हेर, त्यांचें हें स्मारक! आणि त्यांच्या पुढील हा तमाशा, याची संगति मला कांहीं केल्या लावतां येईना. मी हैराण झालों. माझी मति

कुंठित झाली. भारतांत अद्याप असलेल्या भयानक अज्ञानाचें हें प्रदर्शन पाहून कोणाची मति कुंठित होणार नाहीं ! त्या स्त्रियांनीं पांचच मिनिटांत सारें वातावरण दणाणून टाकलें. त्यांचा तो घुमण्याचा ठेका कांहीं विचित्रच होता. तें पाहून आपल्याहि अंगांत भूत संचारतें कीं काय असें मला झालें. आणि खरोखर जर मी तेथेंच थांबलों असतों, तर निश्चित घुमायला लागलों असतों. परंतु मोठा मनोनिग्रह करून बाहेर पडलों. मीं रात्रीं या अभूतपूर्व प्रसंगाची नोंद माझ्या दैनंदिनींत करून ठेवली. त्या पांचशें स्त्रिया तेथें कशासाठीं जमल्या होत्या याची चौकशी केली असतां मला कळलें कीं, येथें दोन फकीर आहेत. ते अंगांत संचारलेलें भूत काढून टाकतात. अशा प्रकारें हा एकूण चमत्कार पाहून मला नवल वाटलें. रात्रीं झोपेंतसुद्धां माझ्या स्वप्नांत तें दृश्य दिसत होतें व जागा झाल्यावरहि तो आवाज माझ्या कानांत घुमत होता.

**इब्राहिम रोझा :** दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून आन्हिकें उरकून निघालों. येथील दुसरी प्रख्यात इमारत इब्राहिम रोझा ही बघण्यासाठीं गेलों. सुलतान इब्राहिम यानें आपल्या मुलीच्या हट्टासाठीं बांधलेली ही इमारत आहे. इब्राहिम याची ही कन्या मोठी रसिक असावी. परंतु बरें झालें कीं, तिनें इब्राहीम सुलतानासारख्या श्रीमंत बापाच्या पोटीं जन्म घेतला. नाहींतर एखाद्या बिचाऱ्या गरीब बापाला हजारों होन खर्चून अशी अद्वितीय सुंदर इमारत बांधून आपल्या लाडक्या कन्येचा हट्ट पुरवितां आला नसता. जगांतील उत्कृष्ट शिल्पकाम व कलाकुसरीचें आणि सोन्याचें पॉलिश केलेली ही इमारत जगांत अजोड मानली जाते. दुर्मीळ अशा हिरव्या रंगाच्या दगडानें ह्या इमारतीच्या भिंती बांधलेल्या आहेत. सर्वच इमारतीवर अप्रतिम सुंदर शिल्पकाम केलेलें आहे. परंतु भिंतीवरील कोरीव काम पाहून प्रेक्षक देहभान विसरून जातो. सबंध कुराण ग्रंथच या भिंतीवर सुंदर दुहेरी उर्दू लिपींत कोरलेला आहे. लिपि उर्दू आहे. माझ्या माहितीप्रमाणें लिहिलेली ही लिपि पर्शियन आहे. या सर्व अक्षरांत चमकदार सोन्याचें पॉलिश केलेलें आहे. त्यामुळें तर तें हिरव्या रंगाच्या दगडाच्या पार्श्वभूमीवर असें कांहीं उठून व सुरेख दिसतें कीं, सांगता सोय नाहीं. इमारतीच्या झरोक्यांत सुंदर नक्षी साधून उर्दू म्हणी व सुभाषितें आहेत. खरोखर अवर्णनीय व सुंदर अशी

ही इमारत आहे. प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज हिच्या सौंदर्याची रुपयांत एक नया पैसा देखील कल्पना वाचकास येईल कीं नाहीं कोण जाणे! इब्राहिम रोझा इमारतीभोंवतीं भव्य कोट आहे. या इमारतीसमोरच हुबेहुब हिची नक्कल केलेली दुसरी मशिदीची इमारत आहे, परंतु ती इतकी सुंदर वठलेली नाहीं. या इमारतीच्या दोन्ही बाजूंस मोठमोठाल्या दणकट दगडांचा साखळदंड पाहून तर प्रेक्षक थक्क होतो. अशा प्रकारची ही सुंदर इमारत पाहून मी मागें परतलों. येथें प्रवाश्यास नाशिक, पंढरपूर, काशी या क्षेत्रांप्रमाणें सतावणारे कांहीं लोक असतात. जसे तीर्थक्षेत्रीं पंड्ये लोक प्रवाश्याला जास्तींत जास्त कसें लुटतां येईल याचा प्रयत्न करतात, तसेच येथील गाईड प्रवाश्याला भोंदून त्याच्या खिशाला जास्तींत जास्त चाट देतात. मुंबईच्या चौपाटी-वरील भेळवाल्यांचीहि मला या वेळीं आठवण झाली. प्रेक्षक कोणत्याहि इमारतींत एकदा गेला रे गेला कीं, एकदम दहा-पंधरा तरी गाईड त्याच्याकडे धावत येतात, आणि लग्नांतील मंत्रविधि करणाऱ्या निष्णात भटजीप्रमाणें लबलब करून माहिती सांगण्यास सुरुवात करतात. आतां या पंधरा गाईड-मधून आपला गाईड म्हणून कोणाला निवडावें असा प्रवाश्यास पेंच पडतो. परंतु मोठ्यानें बडबड करून इतरांना जो हटवील तो आपला गाईड समजावा, असा येथील अलिखित नियमच आहे. ही त्यांची स्पर्धा चांगली चार-पांच मिनिटें चालते. शेवटीं बाकीचे लोक चुपचाप परत जातात. नंतर इतका वेळ पाठीमागें कुत्रें लागल्याप्रमाणें घाईनें बडबड करणारा हा गाईड शांतपणें सावकाश माहिती सांगावयास सुरुवात करतो व शेवटीं प्रेक्षक बाहेर निघाल्यावर हात पुढें करतो. त्याच्या हातावर कांहीं ना कांहीं तरी ठेवावेंच लागतें. वास्तविक कर्नाटक गॅझेटियरमध्यें मीं या इमारतीसंबंधीं पुष्कळ माहिती पूर्वींच मिळविलेली होती. परंतु हाणून मारून हें गाईड प्रवाश्याला मुसलमान करतात. येथील जोडे सांभाळणारीं सर्व पोरेंहि एकजात अशींच आहेत. हीं पोरें प्रवाश्यांभोंवतीं कडें करून उभीं राहतात व जोडे ठेवायला मागतात. शेवटीं अशी पाळी येते कीं, एक एक चप्पल दोन दोन मुलांना सांभाळण्यासाठीं द्यावी लागते. आपल्याला आश्चर्य वाटेल, परंतु एका आठ-वड्यांत मला या रीतीपायीं तीस रुपये खर्च करावे लागले, किंबहुना खर्च करणेंच भाग पडलें.

**अलि रोझा :** ही अपूर्ण राहिलेली इमारत आहे. येथून गोल घुमट उजव्या हाताकडे दिसतो. या इमारतीस बारा कमानी असेंहि दुसरें नांव आहे. उभ्या-आडव्या मिळून एकशें-चव्वेचाळीस कमानी या इमारतीस आहेत. एक एक कमान गांवाच्या वेशीच्या दरवाजांतील कमानीप्रमाणें भव्य आहे. जर ही इमारत पूर्ण बांधून झाली असती तर ती गोल घुमटाच्या इमारतीपेक्षां सवाई झाली असती, असें या कमानीवरून अनुमान काढलें जातें.

**आसरमहाल :** हा राजवाडा आहे. यांत एका खोलींत एक पेटी ठेवलेली आहे. असें म्हणतात कीं, इस्लाम धर्म-संस्थापक महंमद पैगंबर यांच्या डोक्याचे केस या पेटींत ठेवलेले आहेत. दर्शनासाठीं ही पेटी फक्त वर्षातून एकदाच उघडली जाते. या राजवाड्यांतील दिवाणखान्याच्या सर्व भिंतींवर सोन्याचें पॉलिश केलेलें आहे. ठिकठिकाणीं तें उडालेलें असलें तरी अद्यापहि पुष्कळ चांगलें दिसतें.

**मुल्कमैदान तोफ :** नगरची राजकन्या सुलताना चांदबिबी ही विजापूरच्या आदिलशहास दिलेली होती. तिच्या लग्नप्रसंगीं भेट म्हणून नगरच्या राजानें ही तोफ आदिलशहास नजर केली आहे, असा तोफेवर पितळी अक्षरांत मजकूर लिहिलेला आहे. तोफ अत्यंत अजस्र आहे. एक माणूस तिच्या तोंडांत सहज बसूं शकतो.

**दारूकाम :** मेहतर महाल, आनंद महाल ( भवन ), उपली बुरूज अशा किती तरी प्रेक्षणीय इमारती येथें आहेत. अशा प्रकारें येथलि बहुतेक सर्व प्रेक्षणीय इमारती पाहिल्यानंतर मीं येथील यात्रा पाहून पुढें जाण्याचें ठरविलें. या यात्रेचें वैशिष्ट्य म्हणजे यात्रेनिमित्तानें रात्रीं उडविली जाणारी शोभेची दारू. ही शोभेची दारू पाहण्यासाठीं रात्रीं मी विजापूर शहराबाहेरच्या एका मोठ्या थोरल्या मैदानावर गेलों. सुमारें एक लाखावर जनसमुदाय हें दारूकाम पाहण्यासाठीं जमलेला होता. सुमारें दहा हजार रुपये किंमतीची दारू एका रात्रींच्या तीन तासांत उडविली जाते. खालीं जमिनीवर सतत शेंकडों नळहवाचे गोळे रंगीबेरंगी फुलें उधळीत असतांच आकाशांत एकाच वेळीं लागोपाठ चार सहा तोफगोळे सोडले जात. ते उंच आकाशांत गेल्यानंतर वरचेवर फुटत व त्यांतून निळ्या रंगाचीं हजारों तेजस्वी फुलें हवेंत फेकलीं जात. त्यामुळें अपूर्व, सुंदर व नयनमनोहर देखावा दिसे. हजारों

लाखोंचा जनसमुदाय हेलावून जाई, त्यांत दंग होई. इतकें शोभायमान दारूकाम मीं माझ्या पूर्वायुष्यांत कधींच पाहिलें नव्हतें. या वेळच्या प्रसंगाचें वर्णन करणें माझ्या लेखणीच्या आवाक्याबाहेरचें काम आहे. विजापूर-नंतर मी रेल्वेनें बदामीस आलों.

• • ❁

# बदामीचीं नैसर्गिक रंगीत लेणीं : ७

हीं लेणीं दक्षिण भारतांत फार प्रसिद्ध आहेत. बदामी स्टेशनपासून सुमारें तीन मैल अंतरावर बदामी हें इतिहासप्रसिद्ध गांव आहे. बदामीचा इतिहास मोठा प्राचीन आणि वैभवशाली असा आहे. इसवी सनापूर्वी सहाव्या शतकांतील प्रसिद्ध सम्राट् पुलकेशी याच्या कारकीर्दींत मंगलेशा नांवाच्या गृहस्थानें येथील डोंगरांत हीं प्रसिद्ध लेणीं कोरून घेतलेलीं आहेत. बदामी अत्यंत सुंदर गांव आहे. त्याच्या सौंदर्यात या लेण्यांनीं अमोल भर घातलेली आहे. गांवांतील सर्व रस्ते चिरेबंदी दगडांनीं बांधलेले आहेत. हे सर्व दगड तांबड्यालाल किंवा बदामी रंगाचे आहेत. घरें व मातीहि याच बदामी रंगाची आहे. इतकेंच काय, परंतु येथील सर्व डोंगरहि बदामी रंगाचेच आहेत. डोंगरावर झाडें नाहींच म्हटलें तरी चालेल. सर्वत्र बदामी रंगाचीं मोठमोठीं चट्टानें दिसतात. त्यामुळें या स्थळास दिलेलें बदामी हें नांव सार्थ आहे. पूर्वी हे गांव कालडगी जिल्हयांत होतें. परंतु कांहीं दिवसांपूर्वी याचा विजापूर जिल्हयांत समावेश केलेला आहे. येथून विजापूर पुष्कळ दूर आहे. मी येथें एका शाळेंत उतरलों होतों. शाळेच्या वाढदिवसानिमित्त रात्रीं येथें एक कानडी नाटक होणार होतें. इकडे शाळेचा वाढदिवस फार थाटामाटानें साजरा करतात. म्हणून सर्वच लोक गडबडींत होते. त्यामुळें

**अलि रोझा :** ही अपूर्ण राहिलेली इमारत आहे. येथून गोल घुमट उजव्या हाताकडे दिसतो. या इमारतीस बारा कमानी असेंहि दुसरें नांव आहे. उभ्या-आडव्या मिळून एकशें-चव्वेचाळीस कमानी या इमारतीस आहेत. एक एक कमान गांवाच्या वेशीच्या दरवाजांतील कमानीप्रमाणें भव्य आहे. जर ही इमारत पूर्ण बांधून झाली असती तर ती गोल घुमटाच्या इमारतीपेक्षां सवाई झाली असती, असें या कमानीवरून अनुमान काढलें जातें.

**आसरमहाल :** हा राजवाडा आहे. यांत एका खोलींत एक पेटी ठेवलेली आहे. असें म्हणतात कीं, इस्लाम धर्म-संस्थापक महंमद पैगंबर यांच्या डोक्याचे केस या पेटींत ठेवलेले आहेत. दर्शनासाठीं ही पेटी फक्त वर्षातून एकदाच उघडली जाते. या राजवाड्यांतील दिवाणखान्याच्या सर्व भिंतींवर सोन्याचें पॉलिश केलेलें आहे. ठिकठिकाणीं तें उडालेलें असलें तरी अद्यापहि पुष्कळ चांगलें दिसतें.

**मुलकमैदान तोफ :** नगरची राजकन्या सुलताना चांदबिबी ही विजापूरच्या आदिलशहास दिलेली होती. तिच्या लग्नप्रसंगीं भेट म्हणून नगरच्या राजानें ही तोफ आदिलशहास नजर केली आहे, असा तोफेवर पितळी अक्षरांत मजकूर लिहिलेला आहे. तोफ अत्यंत अजस्र आहे. एक माणूस तिच्या तोंडांत सहज बसूं शकतो.

**दारूकाम :** मेहतर महाल, आनंद महाल ( भवन ), उपली बुरूज अशा किती तरी प्रेक्षणीय इमारती येथें आहेत. अशा प्रकारें येथील बहुतेक सर्व प्रेक्षणीय इमारती पाहिल्यानंतर मीं येथील यात्रा पाहून पुढें जाण्याचें ठरविलें. या यात्रेचें वैशिष्ट्य म्हणजे यात्रेनिमित्तानें रात्रीं उडविली जाणारी शोभेची दारू. ही शोभेची दारू पाहण्यासाठीं रात्रीं मी विजापूर शहराबाहेरच्या एका मोठ्या थोरल्या मैदानावर गेलों. सुमारें एक लाखावर जनसमुदाय हें दारूकाम पाहण्यासाठीं जमलेला होता. सुमारें दहा हजार रुपये किंमतीची दारू एका रात्रींच्या तीन तासांत उडविली जाते. खालीं जमिनीवर सतत शेंकडों नळहवाचे गोळे रंगीबेरंगी फुलें उधळीत असतांच आकाशांत एकाच वेळीं लागोपाठ चार सहा तोफगोळे सोडले जात. ते उंच आकाशांत गेल्यानंतर वरचेवर फुटत व त्यांतून निळया रंगाचीं हजारों तेजस्वी फुलें हवेंत फेकलीं जात. त्यामुळें अपूर्व, सुंदर व नयनमनोहर देखावा दिसे. हजारों

लाखोंचा जनसमुदाय हेलावून जाई, त्यांत दंग होई. इतकें शोभायमान दारूकाम मीं माझ्या पूर्वायुष्यांत कधींच पाहिलें नव्हतें. या वेळच्या प्रसंगाचें वर्णन करणें माझ्या लेखणीच्या आवांक्याबाहेरचें काम आहे. विजापूर-नंतर मी रेल्वेनें बदामीस आलों.

• • •

## बदामीचीं नैसर्गिक रंगीत लेणीं : ७

हीं लेणीं दाक्षिण भारतांत फार प्रसिद्ध आहेत. बदामी स्टेशनपासून सुमारें तीन मैल अंतरावर बदामी हें इतिहासप्रसिद्ध गांव आहे. बदामीचा इतिहास मोठा प्राचीन आणि वैभवशाली असा आहे. इसवी सनापूर्वी सहाव्या शतकांतील प्रसिद्ध सम्राट् पुलकेशी याच्या कारकीर्दींत मंगलेशा नांवाच्या गृहस्थानें येथील डोंगरांत हीं प्रसिद्ध लेणीं कोरून घेतलेलीं आहेत. बदामी अत्यंत सुंदर गांव आहे. त्याच्या सौंदर्यांत या लेण्यांनीं अमोल भर घातलेली आहे. गांवांतील सर्व रस्ते चिरेबंदी दगडांनीं बांधलेले आहेत. हे सर्व दगड तांबड्यालाल किंवा बदामी रंगाचे आहेत. घरें व मातीहि याच बदामी रंगाची आहे. इतकेंच काय, परंतु येथील सर्व डोंगरहि बदामी रंगाचेच आहेत. डोंगरावर झाडें नाहींच म्हटलें तरी चालेल. सर्वत्र बदामी रंगाचीं मोठमोठीं चट्टानें दिसतात. त्यामुळें या स्थळास दिलेलें बदामी हें नांव सार्थ आहे. पूर्वी हें गांव कालडगी जिल्ह्यांत होतें. परंतु कांहीं दिवसांपूर्वीं याचा विजापूर जिल्ह्यांत समावेश केलेला आहे. येथून विजापूर पुष्कळ दूर आहे. मी येथें एका शाळेंत उतरलों होतों. शाळेच्या वाढदिवसानिमित्त रात्रीं येथें एक कानडी नाटक होणार होतें. इकडे शाळेचा वाढदिवस फार थाटामाटानें साजरा करतात. म्हणून सर्वच लोक गडबडींत होते. त्यामुळें

मीं प्रथम कार्यक्रम न घेतां येथील लेणीं पाहण्याचें ठरविलें. बरोबर मार्गदर्शक म्हणून एक हुशार विद्यार्थी घेतलेला होता. डोंगरावरील एकूण वातावरणांत एक प्रकारची उदात्तता व प्रसन्नता दिसत होती. येथून बदामी गांव अत्यंत शान्त व रमणीय असें दिसतें. खरोखर या लेण्याच्या परिसरांतील सर्वच कांहीं चैतन्यमय असें आहे. बदामी गांवाच्या तीन दिशांना उंचउंच डोंगरांनीं नैसर्गिक कोट तयार केलेला आहे. या डोंगरांनीं तयार झालेल्या अर्धवर्तुळाकार जागेंत एक मोठें विस्तीर्ण तळें आहे. तळ्यांत भरपूर पाणी असतें. तळ्याच्या उत्तरेस बदामी गांव आहे. तळ्यास बऱ्याच पायऱ्या असलेले ठिकठिकाणीं घाट बांधलेले आहेत. तळ्याच्या दक्षिणपूर्व बाजूस अनेक मंदिरांचा समूह आहे. हें सर्व दृश्य पाहून प्रेक्षकास श्रमपरिहार झाल्यासारखें वाटतें. प्रवासाचें सार्थक झाल्याचा आनंद होतो. येथील लेण्यांतील मूर्ति अत्यंत रेखीव व सजीव अशा दिसतात. मूर्तींच्या चेहऱ्यावरील भाव सहज समजतात. कांहीं हिंदु लेणीं असून कांहीं जैन लेणीं आहेत. हिंदु आणि जैन धर्मास कालान्तरानें राजाश्रय मिळालेला असावा. त्यामुळेंच दोन्ही धर्मांचीं लेणीं खोदलीं गेलेलीं आहेत.

**तांडव नृत्य :** सर्वच लेणीं उत्तम असलीं तरीदेखील शंकराचें तांडव नृत्य, त्रिविक्रम, द्वारपाल या मूर्ति जास्त सरस आणि म्हणूनच प्रसिद्ध आहेत. मी ह्या मूर्ति पाहात असतांना एक युरोपियन जोडपें तांडवनृत्य ही मूर्ति पाहण्यांत गर्क झालेलें होतें. दोन मुली व ती वृद्ध युरोपीय बाई पाहून मला मोठेंच कौतुक वाटलें. त्यांची ज्ञानपिपासू वृत्ति पाहून मला त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला. भारतीय लोकांत ही वृत्ति असली तरी प्रवासाची प्रवृत्ति नाहीं. त्यामुळेंच भारतांतील कांहीं विद्वान् ठरीव मार्गानें घाण्याच्या बैलाप्रमाणें जातात. कारण देशपर्यटन करून नवें ज्ञान नवी संस्कृति या कशाचाहि अभ्यास न करतां भारताची पूर्वी होती ती उज्ज्वल परंपरा कशी टिकणार ? त्यांत कालमानाप्रमाणें नवी नवी भर ही टाकलीच पाहिजे. हजारों वर्षांनंतरसुद्धां गीता व रामायणाचेंच पारायण करायला विनोबा सांगतात. असें वाटतें कीं, ज्ञानोबानें तें शेंकडों वर्षांपूर्वींच सांगितलेलें आहे. पुन्हा आतां हे विनोबा तेंच कशासाठीं सांगतात ? विनोबांनीं नवें कांहीं तरी सांगावें, असें लोकांना वाटतें. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास

"हा एक विचार आहे." याचाहि विनोबांनीं विचार करावा. चिंतन करावें, मनन करावें, पसंत झाला, योग्य वाटला, तर यास अनुसरून चालावें. विनोबासारख्या संतश्रेष्ठांना माझ्यासारख्या एका अजाण तरुणानें हें सांगणें म्हणजे धाडसाचें काम आहे. लोकांनीं तें त्यांना सांगितलें पाहिजे, बोललें पाहिजे. त्याशिवाय काम होणार नाहीं, असें मला वाटतें. हा एक विचार आहे.

**कन्नड हुडगी** : हा विचार करीत मी डोंगरावर चढलों. तेथें एक किल्ला आहे. तो पाहून खालीं उतरलों. शाळेंत रात्रीं नाटकाचा कार्यक्रम होता. नाटक कानडी भाषेंत होतें. मला कानडी भाषा येत नव्हती. परंतु पात्रांच्या भाषणावरून, हावभावावरून, प्रसंगावरून आणि कांहीं कानडी शब्दांवरून मला नाटकाचा मथितार्थ समजला. माझ्या आठवणीप्रमाणें—कन्नड हुडगी—कानडी मुलगी, असें त्या नाटकाचें नांव होतें. नाटकांतील नृत्यें व गाणीं मला फार आवडलीं. शाळेंतील मुलांमुलींनींच हें नाटक बसविलें होतें. त्यासाठीं त्यांनीं बरेंच परिश्रम घेतलेले असावे. कारण नाटक फारच उत्कृष्ट वठलें. दुसऱ्या दिवशीं माझा नित्याचा व्ह्यू मास्टर प्रोग्रॅम झाला. पैसे मिळाले आणि बदामी गांवाचा निरोप घेतला.

**हुबळी येथें विनोबांची भेट** : बदामीनंतर मी हुबळी येथें गेलों. येथें पुष्कळ शाळा आहेत. हें मोठें शहर असल्यानें थोडे जास्त दिवस येथें थांबण्याचा विचार होता. परंतु मला गिरसप्पा धबधबा पाहण्यासाठीं जाण्याची नुसती घाई झालेली होती. त्यामुळें येथें मी विशेष थांबलों नाहीं. विनोबा भावे यांचें येथें दुसऱ्या दिवशीं आगमन होणार असल्यानें मुक्काम करावा लागला. त्यांच्या पदयात्रेंत तास दोन तास घालवून ताबडतोब मोटारनें गिरसप्पाकडे रवाना झालों.

# गिरसप्पाचें जगविख्यात दृश्य : ८

**गिरसप्पा धबधबा :** हुबळीनंतर तेराचौदा मैल चांगला रस्ता आहे. नंतर तडस या गांवापासून मोटार घनदाट अरण्यांतून धावूं लागते. हा रस्तासुद्धां चांगल्या प्रकारचा आहे. परंतु विशेष रुंद नाहीं. मोटारनें येथून पुढच्या प्रवासांत खूप मौज येते. जंगलांत शेंकडों प्रकारचीं झाडें आहेत. अनेक हिंस्र पशुपक्षी आहेत. मोटारमधून चालतांनासुद्धां शेंकडों वानरांच्या झुंडीच्या झुंडी जंगलांतून उड्या मारतांना दृष्टीस पडत होत्या. बदामी डोंगरावरदेखील मीं पुष्कळ माकडें पाहिलेलीं होतीं. परंतु तीं लाल तोंडाचीं व लहान म्हणजे साधारण मांजराएवढालीं दिसत होतीं. परंतु या जंगलांतील वानरसेना सर्व काळ्या तोंडाची असून ते चांगले धष्टपुष्ट व मोठाल्या कुत्र्याएवढाले दिसत. सर्व प्रवासांत असे कितीतरी प्राणी आमच्या दृष्टीस पडत होते ! मोटार बघून ते दूर जंगलांत हां हां म्हणतां पसार होत असत. सुमारें शंभर मैल मोटार अशाच घनदाट जंगलांतून जाते. हा प्रवास अविस्मरणीय आहे. प्रवासांत खूप खूप मजा येते. सुमारें शंभर मैल अशा प्रकारचा प्रवास केल्यानंतर गिरसप्पा धबधब्यापासून तीन एक मैल अंतरावर मोटारमधून आडवाटेंत उतरावें लागतें. तेथून पायानें चालत दोन-अडीच मैल गेल्यानंतर शरावती नदी आडवी लागते. येथें म्हैसूर सरकारनें होडीची व्यवस्था केलेली आहे. ह्या होडीनें प्रवास करतांना खूप गंमत वाटते. डोंगरावरील वनश्री व स्वच्छ पाण्याची वाहणारी नदी, असें अत्यंत नयनमनोहर दृश्य दिसतें. शांत व गंभीर वातावरणांतून होडी चालत असते. येथून थोडें खालीं गेल्यावर डोंगराचा एक कडा एकदम सुमारें आठ-नऊशें फूट खोल तुटलेला-आहे. शरावती तेथून खालीं उडी घेते. एक शंका विजेप्रमाणें मनाला चाटून गेली. जर होडी अशीच प्रवाहाबरोबर खालीं वाहात गेली तर ? जलसमाधि ठेवलेलीच ! ! परंतु तसें कांहीं होत नाहीं. नावाडी मोठा तरबेज असतो. नदीपार होऊन आम्ही पुन्हा एका रमणीय पाऊलवाटेनें धबधब्याकडे निघालों.

**शरावतीची उडी :** पिवळट पांढुरकी माती रस्त्यावर पसरलेली होती. उंच उंच वृक्ष दुतर्फा वाढलेली होते. जणू त्यांची कोण अधिक उंच जातो अशी शर्यतच लागलेली होती. असें सृष्टिसौंदर्य पाहात पाहात आम्ही थेट धब-धब्यापाशीं आलों. अहाहा ! काय तें सुंदर दृश्य होतें ! सायंकाळच्या समयीं मी या जगविख्यात धबधब्यापुढें उभा होतों. शरावती नदी हजार फूट खोल दरींत उंचावरून उडी घेते. नदी प्रत्यक्ष फक्त साडेआठशें फूटच खोल पडते. परंतु नदीप्रवाहापेक्षां दोन्ही बाजूच्या टेकड्या उंच आहेत. नदीचें पात्र ज्या कड्यावरून खालीं पडतें तो सुमारें तीन हजार फूट रुंद आहे. परंतु प्रत्यक्ष नदी एवढ्या सर्व कड्यावरून पसरून पडत नाहीं. तर अलग अलग असे तिचे चार प्रवाह होऊन पडतात. हे चारहि प्रवाह खालीं एवढ्या भयंकर उंचीवरून पडत असतांना खूप सुंदर दिसतात. रुपेरी प्रवाह खालीं पडावा तद्वत् ह्यांचें तेज दिसतें. नदीच्या दोन्ही तीरांवर दोन बंगले आहेत. त्यांपैकीं एकास म्हैसूर बंगला व एकास ब्रिटिश बंगला असें म्हणतात. म्हैसूर बंगल्याहून धबधब्याचें सौंदर्य जास्त सुंदर दिसतें. ब्रिटिश बंगल्याकडून इतकें सुंदर दिसत नाहीं. धबधब्याचे जे चार प्रवाह आहेत त्या चारांचीं स्वतंत्र नांवें आहेत. पाहिल्याचें नांव राजा फॉल. तो नांवाप्रमाणेंच मुख्य आहे. तो पडतो तो थेट तळ गांठतो. दुसरा रोअर म्हणजे ओरडणारा. तो पांचसात फुटांनंतर मध्येंच कड्यावर आदळतो व त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन खालीं पडतात. त्यामुळें त्याचा मोठा आवाज होतो. तिसरा रॉकेट म्हणजे बाण. हा बाणाप्रमाणें सूं सूं करीत खालीं पडतो. चवथा व शेवटचा लेडी फॉल. हा सौंदर्यानुरूप असा विनयशील व सुंदर आहे. तो विशेष गाजावाजा न करतां आपल्या सौंदर्याचा प्रभाव पाडतो. याचा आकार वर बारीक असून तो खालीं लेडीच्या झग्याप्रमाणें पसरतो. या अर्थानें त्याचें नांव सार्थ आहे. अशा प्रकारचा हा धबधबा म्हणजे निसर्गाचा एक महान् चमत्कारच आहे. तीन तास धबधबा पाहूनहि मनाची तृप्ति होत नाहीं. परतु अंधार पडल्यामुळें नाइलजानें तेथून जवळच असलेल्या जोग गांवीं गेलों. या जोग गांवाजवळच हा धबधबा असल्यानें याला इकडे जोगचा धबधबा किंवा जोग फॉल्स म्हणतात. येथील एका शाळेंत मुक्कामाची सोय झाली.

**ट्रॉली :** दुसऱ्या दिवशीं येथील गांधी हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर स्टेशन पाहिलें.

तें पाहण्यासाठीं एक हजार फूट खोल दरींत उतरावें लागतें. स्टेशन बघण्यासाठीं परवानगी व एक तिकीट घ्यावें लागतें. नांव, गांव व पत्ता द्यावा लागतो. सही करावी लागते. हें सर्व झाल्यावर थोडें खालीं उतरून गेल्यानंतर भयंकर अक्राळविक्राळ अशी हजार फूट खोल दरी आहे. ह्या दरींतील हें स्टेशन वरून पाहिलें असतां एखाद्या सूटकेसएवढें दिसतें व माणूस बाहुलीसारखा दिसतो. खालीं येण्या-जाण्यासाठीं एक ट्रॉली ठेवली आहे. ही ट्रॉली विजेवर चालते. एका जबरदस्त लोखंडी नाड्यानें ती खालींवर ओढली जाते. ट्रॉलींत वीस-पंचवीस माणसें एका वेळीं बसूं शकतात. ट्रॉली धरणाच्या उंच भिंतीसारख्या रुळावरून खालीं घसरत जाते. पॉवर स्टेशनमध्यें चार सहा जनरेटर आहेत. पैकीं दोन अत्यंत प्रचंड असून प्रत्येकीं पन्नास हजार अश्वशक्तीचे आहेत व दुसरे चार प्रत्येकीं वीस हजार अश्वशक्तीचे आहेत. मिळून दोन लक्ष अश्वशक्तीवर हें इलेक्ट्रिक स्टेशन चालतें. माझ्या आठवणीप्रमाणें वीस लक्ष किलोवॅटस् वीज निर्माण करण्याची पात्रता ह्या हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर स्टेशनची आहे. परंतु तेथें फक्त दोन लक्ष किलोवॅटस् वीजच निर्माण केली जाते असें कळलें. भारतांतील प्रचंड अशा हैड्रो-इलेक्ट्रिक पॉवर स्टेशनांत याची प्रामुख्यानें गणना होते. पाण्याचे चार-सहा अगडबंब पाइप वरून खालीं आणलेले आहेत. त्यांतून पाणी घेऊन त्यावर ही शक्ति व वीज निर्माण केली जाते. या भागांत फोटो वगैरे घेण्याची सक्त मनाई आहे. मजजवळील व्ह्यू मास्टर कॅमेरा समजून वरच काढून घेण्यांत आला होता. असें हें पॉवर स्टेशन पाहून पुन्हा वर आलों व धबधब्याकडे गेलों. येथून तो एक मैल अंतरावर आहे. सुमारें तीन तास तहान-भूक विसरून मी टक लावून धबधबा पाहात होतों. धबधब्याच्या तळाशीं जाण्यासाठीं म्हैसूर बंगल्याकडून एक रस्ता ठेवलेला आहे. तो पायऱ्यांनीं बांधून काढलेला आहे. आजूबाजूस जंगली प्राण्यांची भीति असतांनासुद्धां मी सर्व पायऱ्या उतरून धबधब्याच्या तळाशीं गेलों होतों. सर्व लहानमोठ्या पायऱ्यांची मिळून संख्या बाराशेंच्या वर आहे. एवढ्या पायऱ्या उतरून पुन्हा चढणें हें दोन दिवस आजार वाढवून घेण्याचें काम होतें. परंतु तरीहि मी उतरलों व चढलोंच! खालीं उतरल्यावर दिसणारें सौंदर्य निराळेंच दिसतें. शरावती आकाशांतूनच उडी घेत आहे असें वाटतें. याच्या ऐन बघण्याच्या मोसममध्यें मी तेथें गेलों होतों.

त्यामुळें संपूर्ण सौंदर्याचा आस्वाद घेतां आला. तेथें स्नानहि करून घेतलें. पहाटेच्या वेळेस येथें खूप धुकें पडतें. त्यामुळें एकहि प्रवाह दिसत नाहीं. उन्हानें हळूहळू धुकें कमी होत जातें. त्यामुळें त्याचें होणारें दर्शन विशेष आकर्षक वाटतें. रात्रीच्या वेळीं बघण्यासाठीं म्हणून येथें एक सर्चलाईट ठेवलेला आहे. त्याचा हजारों कॅण्डल्स पॉवरचा ओघ धबधब्यावर टाकतांच इंद्रधनुष्याप्रमाणें सप्तरंगी प्रवाह दिसतो असें म्हणतात. मला ह्या सुवर्णसंधीचा फायदा वेळेच्या अभावीं घेतां न आल्यानें अजूनहि रुखरुख वाटते. त्याचप्रमाणें पावसाळ्यांतील याचें विराट्, अक्राळ-विक्राळ स्वरूपहि मीं पाहिलें नाहीं, याचा राहून राहून खेद वाटतो. निसर्गसौंदर्याचा व चमत्कृतीचा हा धबधबा म्हणजे एक अजब नमुना आहे. दोन-तीन दिवस मी येथें होतों. असा हा जगविख्यात धबधबा पाहून मी जोग येथें व पुन्हा एका मोठ्या घाटानें माल-मोटारीनें प्रवास करून गिरसप्पा गांवीं गेलों. जोगपासून गिरसप्पा हें गांव अठरा मैल अंतरावर आहे. हा अठरा मैल लांबीचा संपूर्ण रस्ता घाटाचा व शेंकडों वळणा-वळणांचा आहे.

**गिरसप्पा गांव :** जोगला गिरसप्पाचे एक डॉक्टर श्री. आहिरराव यांची व माझी ओळख झालेली होती. आहिरराव दांपत्य धबधबा बघण्याच्या निमित्तानें तेथें आलें होतें. योगायोगानें त्यांचा मुक्कामहि शाळेंत होता. कितीतरी दिवसांनंतर महाराष्ट्रीय माणूस भेटला व मराठींतून बोलण्याची संधि मिळाली. मला खूप आनंद झाला. डॉक्टर हे माझ्या जिल्ह्यांतलेच आहेत. नोकरीनिमित्तानें ते कर्नाटकांत गेले. ते उत्तम कानडी बोलूं शकतात. डॉक्टरांच्या पत्नीहि फार सालस आहेत. नुकताच त्यांचा डॉक्टरांशीं विवाह झालेला होता. उभयतांनीं मला खूप प्रेमानें व आस्थेनें वागविलें. माझी प्रकृति प्रवासाच्या दगदगीनें जरा नादुरुस्त झाली होती. डॉक्टरांनीं औषध-पाणी देऊन मला पुन्हा तरतरीत केलें. गिरसप्पास दोन दिवस डॉक्टरांकडे पाहुणचार घेतला, आणि तोहि महाराष्ट्रीय पद्धतीचा पाहुणचार असल्यानें खूपच आनंद झाला. तिसऱ्या दिवशीं तेथील बाजार पाहून व तेथून जवळच जंगलांत असलेलीं कांहीं जैनमंदिरें पाहून पुढें निघण्याचा बेत ठरवला.

२६४०८ मू-प्रवास

**आश्चर्यकारक मूर्ति :** चतुरमुख बस्ती येथील जंगलांत असलेल्या कांहीं प्राचीन जैन मंदिरांपैकीं हें एक आहे. चतुरमुख बस्ती म्हणजे चार दिशांना तोंड करून असलेल्या मूर्ति या जैन मंदिरांत आहेत. त्यावरून वरील नांव पडलें ! शाळिग्रामच्या अत्यंत रेखीव नि घोटीव अशा ह्या मूर्ति आहेत. चारीहि मूर्तींत कमालीचें आश्चर्यकारक साम्य आहे. हें या मूर्तींचें वैशिष्ट्य आहे. रुपयाच्या चार आण्यांतील जेवढें साम्य असावें तेवढें या चार मूर्तींत आहे. परंतु ह्या सजीव माणसाप्रमाणें दिसतात व त्यांच्यावर एक प्रकारचें विलक्षण तेज आहे. या मूर्ति येथें जंगलांत पडून ठेवण्यापेक्षां मुंबई वगैरे शहरांतून त्या जर म्युझियममध्यें ठेवल्या तर लाखों लोकांना पाहतां येतील; परंतु सध्यां तरी त्या उपेक्षितांप्रमाणें येथें आडवळणांतील जंगलांत पडून आहेत. मूर्ति पाहून परत येतांना हा विचार मनांत आला. येथील बाजार मोठा गमतीचा वाटला. रात्रीं बाजार भरतो व दिवस उगवण्याच्या आंत तो संपतो. नदीकिनारीं भरणारा हा बाजार काळा बाजार नव्हे; गॅसबत्त्या लावून भरतो. मोठीच मौज येते. नारळ, सुपारी, काथ्या, मिरची वगैरे इकडे होणारा माल या बाजारांत विक्रीस येत असतो. हा पाहून रात्रीं एक होडीनें प्रवास करून होनावर येथें गेलों. हा अठरा मैलांचा प्रवास शरावती नदींतून करावा लागतो व या अठरा मैल प्रवासासाठीं आठ-दहा तास म्हणजे सर्व रात्र खर्च करावी लागते. रात्रीं होडीनें प्रवास करण्यांतहि आनंद वाटतो.


**होनावर :** हें बंदर असून तालुक्याचें गांव आहे. येथें डॉ. अँथनी गोम्स यांच्याकडे उतरलों होतों. गोम्स ह्यांचा परिचय येथें आल्यानंतर झाला. परंतु ते अत्यंत सज्जन व ज्ञानपिपासू गृहस्थ आहेत. माझ्या प्रवासासंबधीं त्यांनीं मला खूप खूप प्रश्न विचारले. त्यांनीं स्वतः सायकलवर प्रवास करून मला येथील व जवळपासचीं सर्व प्रेक्षणीय स्थळें दाखविलीं. येथून दोन तीन मैल अंतरावर 'रामतीर्थ' हें प्रेक्षणीय ठिकाण आहे. सुमारें सात-आठ फूट उंचीवरून एका टेकडींतून एक पाण्याचा प्रवाह निघालेला

आहे. तेंच हें रामतीर्थ. प्रवाह दोन-तीन फूट रुंदीचा असून पाणी स्फटिकवत् स्वच्छ असून पिण्यास अमृततुल्य रुचकर लागतें. जेथें हें पाणी पडतें, तेथें सुमारें वीस चौरस फूट व सुमारें आठ फूट खोलीचा एक सिमेंट कॉंक्रीटचा हौद आहे. या हौदांत पाणी फक्त नेहमीं दोन फूट असतें. येथें स्नान केलें असतां वेडे लोक बरे होतात असा समज आहे. यावर या भागांतील हजारों लोकांचा विश्वास आहे. त्यामुळें आसपासच्या शेंकडों खेड्यांतून कित्येक स्त्री-पुरुष येथील पाण्यानें स्नान करण्यासाठीं रोज येतात. डॉ. अँथनी गोम्ससारख्या माणसाचीहि या गोष्टीवर श्रद्धा आहे. ते म्हणाले, "आठ फूट उंचीवरून पडणारा हा प्रवाह तास दोन तास वेड्या माणसाच्या डोक्यावर पडला कीं, सौम्य इलेक्ट्रिक शॉक बसावा तद्वत् तो मेंदूला आपल्या वजनानें हलकेंच हलवतो व त्यामुळें वेड नाहींसें होतें." आम्ही दोघांनीं ह्या तीर्थावर स्नान केलें मी तर एक तास प्रवाहाखालीं उभा राहून डोक्यावर प्रवाहाचें पाणी घेत होतों. डोक्यास व सर्वांगास सुखद गुदगुल्या होतात. मोठी बहार येते. रामतीर्थावर स्नान करून डॉ. अँथनी गोम्स यांच्याकडे फलाहार करून आम्ही शहरांत फिरण्यास निघालों. येथें चंदनाच्या आणि यलो वूडच्या लाकडावर सुंदर नक्षीकाम करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. गिरसप्पाच्या जंगलांत चंदन, निलगिरी, यलो वूड वगैरे मौल्यवान् झाडें पुष्कळ आहेत. एक कारागीर नटराजाची मूर्ति बनविण्यांत गर्क झालेला मीं पाहिला. "ही मूर्ति किती दिवसांत पूर्ण होईल?" असें विचारतां "आठ दिवस" असें त्याचें उत्तर आलें. "किंमत काय पडेल?" या प्रश्नास उत्तर देतांना "वीस रुपये" आणि "याशिवाय मूर्तीच्या कौशल्यावर व आवडीनिवडीवरहि किंमत कमी-जास्त होऊं शकते" असेंहि प्रत्युत्तर मला मिळालें. होनावर येथील दुसरी प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे 'कर्नल हिल'.

**कर्नल हिल :** 'टायगर ऑफ म्हैसूर' (म्हैसूरचा वाघ) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टिपू सुलतानानें ज्या ब्रिटिशांच्या कर्नल साहेबास येथें ठार केलें, त्या कर्नलसाहेबाच्या स्मरणार्थ वरील हिलवर (टेकडी) एक सुमारें शंभर फूट उंचीचा स्तंभ उभारलेला आहे. या टेकडीवरून होनावर गांव व समुद्राचें दृश्य अत्यंत नयनरम्य दिसतें. रामतीर्थावरूनहि दिसणारा समुद्राचा देखावा अविस्मरणीय असा आहे. परंतु होनावर गांवांतील घनदाट

नारळी-पोफळी ( सुपारी )चीं झाडें व त्यांतून डोकावणारीं घरें हें दृश्य तेथून दिसत नाहीं. त्यामुळें कर्नल हिलवरून दिसणारा देखावा मला फारच आवडला. होनावर येथें दोनतीन दिवस थांबून तें गांव सोडलें. डॉक्टरांचा निरोप घेतांना त्यांना पुन्हा भेटण्याचें आश्वासन दिलें.

**भुतांच्या विहिरींत :** होनावरहून मी पायीं प्रवास करीत चाललों होतों. ऊन भयंकर होतें; स्नानाची इच्छा झाली. वाटेंत एक पडकी ओसाड विहीर लागली. पाणी मात्र स्वच्छ नि थंडगार होतें. मागचापुढचा विचार न करतां सरळ कपडे काढले आणि उतरलों विहिरींत. विहिरीस चांगल्या पायऱ्या बांधलेल्या होत्या. कांहीं वेळ तर स्नानांत दंग होतों. स्नान आटोपलें अन् बाहेर येण्यासाठीं पायरीवर पाय ठेवतों तों काय ! एक मोठे सर्पराज वाट अडवून बसले होते माझी ! जीभ चुट चुट करीत जणूं ते माझीच प्रतीक्षा करीत थांबले होते. माझी तर गाळणच उडाली. पांचावर धारण बसली. काय करावें नि काय नाहीं ! कांहींच सुचेना. परंतु घाबरून येथें कांहींच उपयोग नव्हता. धैर्यानेंच वागणें प्राप्त होतें. थोडा वेळ तर तसाच उभा राहिलों. ‘महाशय’ माझी चाहूल लागून हलतात कीं काय याची थोडी प्रतीक्षा केली. परंतु छे! ते कसले वस्ताद ! हालेनात कीं चालेनात. शेवटीं मलाच कांहीं हालचाल करावयास पाहिजे होती, म्हणून मार्ग शोधूं लागलों. सुदैवानें तो सांपडला. विहिरीच्या कडेवर एक मोठें वडाचें झाड होतें. त्याच्या कांहीं पारंब्या या विहिरीवर लोंबकळत होत्या. त्यांतली एक चांगली भक्कम



होती, तीच पकडली अन् आलों वर चढून सरसर. झाडावर गेलों खरा. परंतु दुसरा धोका विकत घेतला मीं. या झाडाच्या ढोलींतच तर त्या सर्पराजाचें घर होतें. ते निघाले अन् खोडाजवळच असलेल्या आपल्या ढोलींत येऊन बसले. बाप रे ऽऽ ! आतां काय करावें ? उतरावें कसें ? वडाची एक फांदी बरीच लांब गेलेली होती. त्या फांदीवरून सरकत पुढें गेलों. परंतु संकटा-मागून संकटें येत होतीं. खालीं उतरण्यासाठीं एकहि पारंबी नव्हती तेथें. मग काय ? टाकली उडी खालीं. उजव्या पायाला असा मार लागला म्हणतां ! परंतु तरीहि मला आनंदच झाला. जिवावर आलें तें पायावर गेलें. हें काय थोडें झालें ! एका शेतकऱ्याच्या मदतीनें विहिरीजवळील कपडे घेऊन आलों. तो शेतकरी पुष्कळ दूर कपडे घेऊन आल्यावर मला म्हणाला, " अहो प्रवाशी, कशाला गेला होता त्या विहिरींत ! अहो, ती भुतांची विहीर आहे भुतांची ! भुतं राहतात तिथं ! भुतं ? " अंगावर शहारेच आले माझ्या तें ऐकून. अशा प्रकारें या संकटांतून पार पडून मी एका पवित्र तीर्थाच्या गांवीं गेलों.

**जैन काशी** : मुडबिद्री हें फार इतिहासप्रसिद्ध गांव आहे. 'जैन काशी' नांवानेंच तें ओळखलें जातें. येथील प्राचीन अशीं अठरा जैन मंदिरें व चौरट पॅलेस—राजवाडा—हीं ठिकाणें प्रेक्षणीय आहेत. हजार खांबांचें मंदिर—यास चतुरंग चुडामणी बस्ती असेंहि म्हणतात. या भव्य दगडी मंदिरास लहानमोठे एक हजार दगडी खांब आहेत. या मंदिराचें बांधकाम निराळ्या प्रकारचें आहे. यास असलेल्या हजार खांबांवरील हजार प्रकारची नक्षी पाहून प्रवासी थक्क होतो. मंदिरांत सुमारें अकरा फूट उंचीची भव्य अशी पंच धातूची वर्धमानाची मूर्ति आहे. मंदिराच्या बाहेरच्या बाजूनें चबुतऱ्यावर शेंकडों प्रकारचीं सुंदर चित्रें कोरलेलीं असून, त्यांत चायनीज ड्रगून, जिराफ वगैरे चित्रें उल्लेखनीय आहेत. मंदिरापुढें सुमारें पन्नास फूट उंचीचा दगडी मान-स्तंभ आहे. सकाळ—संध्याकाळ हजारों दिवे लावून प्रार्थना केली जाते. येथील जैन मंदिरांत जैन धर्माव्यतिरिक्त इतर धर्माच्या माणसास फक्त सभा-मंडपापर्यंत जातां येतें. मूर्तीजवळ त्यांना जातां येत नाहीं. असें हें मंदिर पाहून येथील दुसरें प्रसिद्ध मंदिर ' गुरुबस्ती ' पाहण्यास गेलों.

**सात कोट रुपये** : गुरुबस्ती मंदिर पाहून व त्याच्या समोरील भव्य सभामंडप पाहून प्रेक्षक थक्क होतो. इतकें मजबूत व सुरेख मंदिर विरळाच

दृष्टीस पडतें. या मंदिरांत वर्धमान महावीराची तेरा फूट उंचीची भव्य शाळिग्रामाची मूर्ति आहे. ही मूर्ति दोन हजार वर्षांपूर्वींहून अधिक प्राचीन आहे असें म्हणतात. या मंदिराविषयीं विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्यांत अकरा नवरत्नांच्या मूर्ति आहेत. सुमारें नऊ इंच उंचीच्या या मूर्ति असून त्या पांचू, लाल, वगैरे नवरत्नांच्या बनविलेल्या आहेत. ह्यांची किंमत सात कोटी रुपये आहे, असें सांगण्यांत येतें. या मूर्ति एका मजबूत कोठीमध्यें ठेवलेल्या आहेत. त्यांना पाहण्यासाठीं शंभर दीडशें रुपये खर्चून पूजा करावी लागते.

जैन धर्माच्या माणसाखेरीज इतरांस त्या पाहतां येत नाहींत. या नवरत्नांच्या मौल्यवान् मूर्तींचा इतिहास मोठा मनोरंजक आणि उद्बोधक आहे. पूर्वी मुडबिद्री हें मोठें व्यापारी शहर होतें. येथील व्यापारी परदेशांत जाऊन मोठा व्यापार करीत असत. या व्यापाऱ्यांत कांहीं जैन व्यापारी होते. प्रवासांत पूजा करतां यावी, म्हणून ह्या व्यापाऱ्यांनीं या नवरत्नांच्या मूर्ति बनवून घेतलेल्या होत्या. पुढें ही गोष्ट उघड होऊन सर्वांस माहीत झाली; तेव्हां अशा प्रकारच्या मौल्यवान् मूर्ति जवळ ठेवणें हें संरक्षणाच्या दृष्टीनें बरोबर नाहीं. ही गोष्ट व्यापाऱ्यांच्या लक्षांत आली. त्या सर्वांनीं मिळून या मूर्ति येथील मंदिरांत ठेवून दिल्या. येथून अगदीं जवळ पोलीसस्टेशन आहे. त्यामुळें त्यांच्या संरक्षणाचा प्रश्नच उरला नाहीं.

**चौरट पॅलेस :** चौरट घराण्यांतील राजेलोकांच्या कारकीर्दींत बांधलेला हा प्राचीन राजवाडा आहे; परंतु राजवाड्याचें बांधकाम इतकें भक्कम आहे कीं, अद्यापहि त्याचा पुष्कळ भाग एकदम चांगल्या स्थितींत आहे. मीं हा राजवाडा बघण्यासाठीं गेलों तेव्हां तो बंद होता. त्याची किल्ली या घराण्यांतील वंशज शेजारींच राहतात, त्यांच्या जवळ होती. मीं राजवाडा बघण्याची इच्छा त्यांच्या जवळ प्रदर्शित केली. तेव्हां ते किल्ली घेऊन निघाले. निघतांना बरोबर त्यांनीं कांहीं सुंदर चित्रें घेतलीं होतीं. राजवाड्यांतील सभागृह पाहून मी आश्चर्यचकित झालों. पांच-सातशें वर्षांपूर्वीचा राजवाडा, परंतु त्याचे खांब व सभागृहाच्या छतावरील लाकूड अद्याप जसेंच्या तसें दिसतें. विजापूर येथील असर महालप्रमाणेंच हें आश्चर्य आहे. विजापूरच्या असर महालाच्या भिंतींना व छताला सोन्याचें पॉलिश केलेलें होतें, परंतु या महालाचें महत्त्व

त्यावरील कलाकुसरीच्या कामाला आहे. छतावरील नक्षी व त्यांच्या डिझाईन्स् अतीव सुंदर व नावीन्यपूर्ण आहेत. खांबांवर अनेक सुशोभित चित्रें कोरलेलीं आहेत. त्यांतील पंचनारी तुरग व नवनारी कुंजर हीं चित्रें तर सर्वोत्कृष्ट दर्जाचीं आहेत.

**पंचनारी तुरग :** हें चित्र पांच स्त्रियांच्या आकृतीनें साधलेलें एका सुंदर व डौलदार घोड्याचें, तर नवनारी कुंजर हें नऊ स्त्रियांच्या सुंदर आकृतीनें साधलेलें मस्त हत्तीचें चित्र आहे. या दोन आकर्षक चित्रांचे रंगीत फोटो मला राजवाडा दाखविणाऱ्या गृहस्थानें दिले. त्यांचे आभार मानून मीं त्यांचा निरोप घेतला.

येथील सर्व मंदिरांपुढें दगडाचा उंच व सुंदर नक्षीकाम केलेला मान-स्तंभ असलाच पाहिजे असा जणू कांहीं दंडकच आहे. अशा या सुंदर मंदिरांनीं गजबजलेलें हें गांव व त्याला अनुपमेय सृष्टिसौंदर्याची मिळालेली जोड यामुळें येथील एकूण सौंदर्य व रमणीयता अवर्णनीय व सुंदर आहे. मुडाबिद्रीनंतर येथून जवळच असलेल्या ‘ कार्कल ’ गांवीं गेलों.

**कार्कल येथील गोमटेश्वर :** हा गोमटेश्वर या भागांतच नव्हे तर भारतांत प्रसिद्ध आहे. येथील एका हिंदी प्रचारकाकडे मी उतरलों होतों. दुसऱ्या दिवशीं गोमटेश्वराचा पुतळा पाहण्यासाठीं निघालों. गांवाबाहेर एका उंच टेकडीवर हा पुतळा उभा आहे. एका अखंड दगडाचा आणि ४१॥ फूट उंचीचा असा अवाढव्य पुतळा पाहून प्रवासी थक्क होतो. विशेष म्हणजे एवढा अजस्त्र असा हा पुतळा असला तरी त्याचें नाक, तोंड, भुंवया, केस, कपाळ सर्व कांहीं अत्यंत प्रमाणबद्ध आणि रेखीव आहे. पुतळा दिगंबर अवस्थेंत आहे. नकनाचारी नांवाच्या शिल्पकारानें सुमारें चारपांचशें वर्षां-पूर्वीं हा पुतळा तयार केलेला आहे. आज पांचशें वर्षें तो ऊन, वारा, थंडी, पाऊस यांना न जुमानतां जसाच्या तसा ताठ उभा आहे. पुतळ्याचा भव्य-पणा व सुंदरपणा यांचा बेमालूमपणें मेळ घातलेला आहे. हा पुतळा पाहून मी परतलों. पूर्वीच्या राजेलोकांचें वैभव व लहर यांतून अशा कितीतरी अद्‌भुत गोष्टींचा जन्म झालेला आहे, हेंच खरें ! दुसऱ्या दिवशीं येथें अनेक ठिकाणीं व्ह्यू मास्टर प्रोग्रॅम झाले. नंतर पुन्हा मुडबिद्रीहून मोटारनें वेणूरला गेलों.

**वेणूरचा गोमटेश्वर :** मुडबिद्री ते वेणूर हें सुमारें दहा अकरा मैल

अंतर आहे. कार्कलप्रमाणेंच वेणूर येथेंहि मोठा भव्य पुतळा आहे. गोमटेश्वराचे असे प्राचीन भव्य पुतळे सर्व भारतांत फक्त तीनच आहेत. पैकीं मीं दोनच पाहिलेले आहेतै. हे तीनहि पुतळे दक्षिण भारतांतच आहेत. सर्वांत मोठा पुतळा श्रवणबेळगोळा येथील आहे; दुसऱ्या प्रतीचा कार्कलचा आणि तिसऱ्या प्रतीचा वेणूर येथील आहे. श्रवणबेळगोळाचा साठ फूट उंचीचा, कार्कलचा सुमारें बेचाळीस फूट उंचीचा व वेणूरचा सुमारें सदतीस फूट उंचीचा आहे. परंतु असें म्हणतात कीं, या सर्वांत सुंदर पुतळा वेणूर येथील आहे. मीं श्रवणबेळगोळाचा पुतळा पाहिलेला नाहीं. तेव्हां त्याची तुलना करूं शकत नाहीं. परंतु वरील समज चुकीचा आहे, असें मला वाटतें.

ज्यांनीं शिल्पकलेचा अभ्यास केलेला आहे, त्यांना हें विधान पटेल ! शिल्पकलेच्या दृष्टीनें पाहतां विरक्त माणसाच्या चेहऱ्यावरील भाव कार्कलच्या पुतळ्यावर जे आहेत, ते वेणूरच्या पुतळ्यावर नाहींत. मात्र वेणूरचा पुतळा आनंदी चेहऱ्याचा आहे. त्यामुळें कांहीं लोकांस आवडत असावा, एवढेंच. वेणूर येथील पोस्टमास्तर यांच्याकडे माझी जेवणाची व विश्रांतीची सोय झाली इडलीसांबार, उपमा, उपींड, भात, दहीं, ताक, भरपूर खोबऱ्याची पातळ चटणी एवढे पदार्थ कर्नाटकचे खास कानडी पदार्थ आहेत. ते मला एका वेळीं त्यांच्याकडे खावयास मिळाले. त्यामुळें भरपूर जेवण झालें. वर पानाचा विडा ठेवलेलाच. कोकण, कर्नाटक व केरळचें वैशिष्ट्य हें आहे. पान, तंबाखू व ओली सुपारी इकडे फार होते; त्यामुळें वरोबर मिळते.

मात्र सुरुवातीला बिनकाताचें आळणी पान खाणें आपल्याकडील लोकांना आवडत नाहीं. पुढें सवईनें कांहीं वाटत नाहीं. इकडे विशेषतः कर्नाटक व केरळकडे तर कात अजिबात खात नाहींत. अशा प्रकारें येथील पाहुणचार घेऊन मी पुढील प्रवासास सज्ज झालों.

**प्रवाश्यांचें आश्रयस्थान :** धर्मस्थळ हें या भागांत मोठें पवित्र क्षेत्र समजलें जातें. येथील मंजुनाथाचें मंदिर प्रसिद्ध आहे. सकाळ-संध्याकाळ येथें मोठ्या प्रमाणावर पूजाअर्चा वगैरे सोहळा चालतो. दक्षिण भारतांत आपल्यापेक्षां धार्मिक दृष्टीचे लोक फार आहेत. तेहि अत्यंत कर्मठ आहेत. उडपी येथें मीं एक कृष्णमंदिर पाहिलें होतें. त्या मंदिरांत इतके सोवळेंओवळें वगैरे प्रकार होते कीं, मला स्नान करून ओल्या कपड्यानिशीं तें सर्व मंदिर पाहावें लागलें. त्याशिवाय

दर्शनच अशक्य ! एक हजार माणसें एका वेळीं भोजन करूं शकतील एवढें मोठें भोजनगृह, स्वयंपाकगृह, स्नानगृह वगैरे स्वतंत्र विभाग मंदिरांत असतात. अजस्र लाकडी रथ व त्याचा साजशृंगार पाहून अचंबा वाटतो. एका रथाला तर चांदीच्या पत्र्यानें मढविलें होतें व त्यावर सुंदर वेलबुट्टी काढलेली होती. धार्मिक अंधश्रद्धा फार. त्यापायीं ते मोठा खर्च अनाठायीं करतात. एक दृश्य पाहून तर मला येथें खूप हसूं आलें. पुरुषांनीं आपल्या डोक्यावर एवढ्या मोठ्या शेंड्या राखलेल्या होत्या कीं, त्या स्त्रियांच्या केसांची बरोबरी करूं शकतील व अनेक स्त्रियांनीं धार्मिक विधि म्हणून आपले सर्व केसच साफ काढून डोकें गुळगुळीत व तकतकीत करून घेतलें होतें. हा विरोधाभास पाहून हसल्याशिवाय राहवत नाहीं. सुंदर स्त्रियाहि केसाविना कशा तरी मुंड्या व बेढप दिसतात. आणि असें असूनहि मंदिरांत यांचीच लुडबुड फार. पूजाअर्चा तर ह्यांच्याशिवाय जणू होणार नाहीं, अशीच त्यांची समजूत असावी.

अशीच स्त्रियांची गर्दी धर्मस्थळ येथें होती. परंतु केशवपन केलेल्या स्त्रिया येथें कमी दिसल्या. उंची वस्त्रें धारण करून स्त्रीपुरुष अत्यंत मोठ्या संख्येनें येथें अहोरात्र येत जात असतात. रात्रीं तर येथील वातावरण अत्यंत आनंद-दायक व सुखकारक वाटतें. सर्वत्र विजेचे रंगीबेरंगी दिवे लावले जातात. मंदिरावर दिव्यांची खूपच सजावट केलेली असते. मंदिरहि अत्यंत भव्य आहे. पुढील व्हरांड्यांत असलेले सर्व खांब चांदीच्या पत्र्यानें मढविलेले आहेत. त्यावर सुंदर नक्षी काढलेली आहे. रात्रीं बत्तीच्या प्रकाशांत ते खूप चमकतात. त्यामुळें जिकडे तिकडे लखलखाट दिसतो. मंदिराजवळ एक प्रशस्त धर्मशाळा आहे. यात्रेकरू येथें उतरतात. मीसुद्धां येथेंच उतरलों होतों. येथील विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे येथें यात्रेसाठीं येणाऱ्या लोकांना रोज सकाळ-संध्याकाळ दोन वेळचें जेवण मोफत दिलें जातें. जेवणहि अत्यंत चांगल्या प्रकारचें, स्वच्छ जागेंत व टापटिपीचें असतें. अनेक सुशिक्षित व श्रीमंत लोक येथें येऊन देवदर्शन घेऊन जातात. कोणाहि प्रवाश्याची तीन दिवस मोफत राहण्याची व्यवस्था येथें केली जाते. मी स्वतः येथें दोन दिवस मुक्कामास राहिलों होतों. ते दोन दिवस कसे निघून गेले, हें समजलेंदेखील नाहीं. मंदिरांत दोन फूट उंचीची ठोस सोन्याची श्रीमंजुनाथाची मूर्ति आहे. शेजारीं कन्याकुमारीची मूर्ति असून ती देखील पूर्ण सोन्याची आहे. एक

चांदीचें रत्नजडित सिंहासन आंत असून तें अत्यंत सुंदर आहे. त्यावर सुंदर कलाकुसरीचें कोरीव काम केलेलें आहे.

येथील दुसरी प्रेक्षणीय वस्तु म्हणजे दोन चांदीचे रत्नजडीत रथ ही होय. रथ लाकडाचे असले तरी त्यांवर जाड चांदीच्या पत्र्याचें आच्छादन आहे. चांदींत मढविलेले हे रथ, त्यांवर सोन्याचीं फुलें, त्यांत रंगीबेरंगी रत्नें यांमुळें त्यांचें सौंदर्य अवर्णनीय झालेलें आहे. जवळच एक नदी वाहात आहे. या नदींत स्नान केलें असतां सर्व प्रकारचे रोग बरे होतात, असा येथील लोकांचा समज आहे. मींसुद्धां नदींत दोन वेळां स्नान केलें. मंदिरासमोर एक हिरवागार व सुंदर बगीचा आहे. सर्वच गोष्टी आल्हाददायक अशा आहेत. मीं पाहिलेल्या धार्मिक क्षेत्रांत इतकें नितांत रमणीय ठिकाण जवळ जवळ नाहींच ( वेरूळ व अजंठा हीं ठिकाणें सोडून ). येथील एक जैन मंदिरहि प्रेक्षणीय आहे. धर्मस्थळंनतर आसपास व्ह्यू मास्टरंचा प्रोग्राम करून थेट मंगलोर येथें गेलों. होनावरपासून माझा सर्व प्रवास हा समुद्रकिनाऱ्यानें झालेला असल्यानें अनेक खाड्यांवरील सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेतां आला. या सर्व सृष्टिसौंदर्याच्या वर्णनांत पुष्कळच साम्य असल्यानें मी त्याचें पुन्हा चर्वितचर्वण करीत नाहीं.

**मंगलोर–केरळचें प्रवेशद्वार :** मंगलोरच्या आसपास जेवढीं म्हणून छोटीं-मोठीं गांवें आहेत त्यांचें एक वैशिष्ट्य आहे. लहान झोपडें असो कीं मोठी बिल्डिंग असो, अथवा कारखाना असो, त्यावर मंगलोरी कौलें असलींच पाहिजेत. मंगलोर येथेंहि कौलें बनविण्याचे मोठे कारखाने आहेत. परंतु मला केरळकडे जाण्याची नुसती घाई होती. त्यामुळें मीं येथें विशेष न भटकतां सरळ केरळकडे कूच करण्याचें ठरविलें. येथील लाईट हाऊस, चर्च वगैरे प्रेक्षणीय ठिकाणें पाहून मी सरळ रेल्वे-स्टेशन गांठलें.

● ● ●

# केरळची पदयात्रा : १०

**केरळचें सौंदर्य** : येथून सुमारें वीस-पंचवीस मैल अंतरावर 'कासरगोड' हें केरळच्या सरहद्दीवरील पहिलेंच मोठें गांव आहे. म्हणून मंगलोरहून रेल्वेनें कासरगोडचें तिकीट घेतलें. मंगलोर शहर सोडतांच गाडी एका मोठ्या भव्य लोखंडी पुलावरून घरघर करीत चालते. नेत्रावती नदीवरील हा भव्य लोखंडी पूल पाहून मला गुजरात प्रांतांतील साबरमती, तापी वगैरे नद्यांवरील भव्य पुलांची आठवण झाली. पूल सोडून थोडें पुढें जातांच रेल्वे-लाईनच्या दुतर्फा हिरवींगार शेतें आणि बागबगीचे दृष्टीस पडतात. सुंदर वृक्षांच्या राई व नारळी, पोफळी, काजूंच्या बागा वगैरे दृश्य पाहून केरळच्या सृष्टिसौंदर्याचा हा प्रारंभ मोठा बहारदार वाटला. शेतांत मोठमोठे मांडव तयार केलेले दिसत होते. त्यांवर कसल्यातरी पिकांचे दाट वेल पसरले होते. त्यामुळें दिसणारें सृष्टिसौंदर्य नावीन्यपूर्ण व नयनरम्य होतें. कासरगोड स्टेशनपर्यंत गाडी केव्हां आली, तें लक्षांतहि आलें नाहीं.

**कासरगोड** : स्टेशनवर उतरून गांवांत गेलों. स्टेशनपासून गांव फार जवळ आहे. येथें एका दुकानांत थोडा थंडा सोडा घेतला. नंतर जेवण वगैरे आटोपून गांवांत थोडा फेरफटका मारून आलों. येथील एका शाळेचा स्कूल-डे असल्यानें तेथें रात्रीं नाटकाचा कार्यक्रम होता. कानडी नाटकें मला आतां खूप आवडूं लागलीं होतीं. नाटक शाळेंतील मुलांनींच बसविलेलें होतें. परंतु अत्यंत व्यवस्थित व अभिनयपूर्ण कामें सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं केलीं. कर्णाच्या उदारपणावर आधारलेलें नाटकाचें कथानक अत्यंत चटकदार व बहारीचें वाटलें. नाटकानंतर त्यांत काम करणाऱ्या मुलामुलींना प्रेक्षकांनीं कितीतरी बक्षिसें दिलीं! रात्रीं येथील एका मंदिरांत यात्रेनिमित्त बरेच कार्यक्रम होते. रात्रभर मंदिरांत बसून हे सर्व कार्यक्रम पाहिले. मंदिरांत वाजविलीं जाणारीं वाद्यें व संगीत नावीन्यपूर्ण आणि कर्णमधुर वाटलें. दक्षिण भारतांतील, विशेषतः केरळमधील संगीत हें कानांना अत्यंत गोड लागतें. सकाळसंध्याकाळ इकडील मंदिरांतून

चांदीचें रत्नजडित सिंहासन आंत असून तें अत्यंत सुंदर आहे. त्यावर सुंदर कलाकुसरीचें कोरीव काम केलेलें आहे.

येथील दुसरी प्रेक्षणीय वस्तु म्हणजे दोन चांदीचे रत्नजडीत रथ ही होय. रथ लाकडाचे असले तरी त्यांवर जाड चांदीच्या पत्र्याचें आच्छादन आहे. चांदींत मढविलेले हे रथ, त्यांवर सोन्याचीं फुलें, त्यांत रंगीबेरंगी रत्नें यांमुळें त्यांचें सौंदर्य अवर्णनीय झालेलें आहे. जवळच एक नदी वाहात आहे. या नदींत स्नान केलें असतां सर्व प्रकारचे रोग बरे होतात, असा येथील लोकांचा समज आहे. मींसुद्धां नदींत दोन वेळां स्नान केलें. मंदिरासमोर एक हिरवागार व सुंदर बगीचा आहे. सर्वच गोष्टी आल्हाददायक अशा आहेत. मीं पाहिलेल्या धार्मिक क्षेत्रांत इतकें नितांत रमणीय ठिकाण जवळ जवळ नाहींच ( वेरूळ व अजंठा हीं ठिकाणें सोडून ). येथील एक जैन मंदिरहि प्रेक्षणीय आहे. धर्मस्थळनंतर आसपास व्ह्यू मास्टरचा प्रोग्राम करून थेट मंगलोर येथें गेलों. होनावरपासून माझा सर्व प्रवास हा समुद्रकिनाऱ्यानें झालेला असल्यानें अनेक खाड्यांवरील सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेतां आला. या सर्व सृष्टिसौंदर्याच्या वर्णनांत पुष्कळच साम्य असल्यानें मी त्याचें पुन्हा चर्वितचर्वण करीत नाहीं.

**मंगलोर–केरळचें प्रवेशद्वार :** मंगलोरच्या आसपास जेवढीं म्हणून छोटीं-मोठीं गांवें आहेत त्यांचें एक वैशिष्ट्य आहे. लहान झोपडें असो कीं मोठी बिल्डिंग असो, अथवा कारखाना असो, त्यावर मंगलोरी कौलें असलींच पाहिजेत. मंगलोर येथेंहि कौलें बनविण्याचे मोठे कारखाने आहेत. परंतु मला केरळकडे जाण्याची नुसती घाई होती. त्यामुळें मीं येथें विशेष न भटकतां सरळ केरळकडे कूच करण्याचें ठरविलें. येथील लाईट हाउस, चर्च वगैरे प्रेक्षणीय ठिकाणें पाहून मी सरळ रेल्वे-स्टेशन गांठलें.

● ● ●

## केरळची पदयात्रा : १०

**केरळचें सौंदर्य** : येथून सुमारें वीस-पंचवीस मैल अंतरावर ' कासरगोड ' हें केरळच्या सरहद्दीवरील पहिलेंच मोठें गांव आहे. म्हणून मंगलोरहून रेल्वेनें कासरगोडचें तिकीट घेतलें. मंगलोर शहर सोडतांच गाडी एका मोठ्या भव्य लोखंडी पुलावरून धरधर करीत चालते. नेत्रावती नदीवरील हा भव्य लोखंडी पूल पाहून मला गुजरात प्रांतांतील साबरमती, तापी वगैरे नद्यांवरील भव्य पुलांची आठवण झाली. पूल सोडून थोडें पुढें जातांच रेल्वे-लाईनच्या दुतर्फा हिरवींगार शेतें आणि बागबगीचे दृष्टीस पडतात. सुंदर वृक्षांच्या राई व नारळी, पोफळी, काजूच्या बागा वगैरे दृश्य पाहून केरळच्या सृष्टिसौंदर्याचा हा प्रारंभ मोठा बहारदार वाटला. शेतांत मोठमोठे मांडव तयार केलेले दिसत होते. त्यांवर कसल्यातरी पिकांचे दाट वेल पसरले होते. त्यामुळें दिसणारें सृष्टिसौंदर्य नावीन्यपूर्ण व नयनरम्य होतें. कासरगोड स्टेशनपर्यंत गाडी केव्हां आली, तें लक्षांतहि आलें नाहीं.

**कासरगोड** : स्टेशनवर उतरून गांवांत गेलों. स्टेशनपासून गांव फार जवळ आहे. येथें एका दुकानांत थोडा थंडा सोडा घेतला. नंतर जेवण वगैरे आटोपून गांवांत थोडा फेरफटका मारून आलों. येथील एका शाळेचा स्कूल-डे असल्यानें तेथें रात्रीं नाटकाचा कार्यक्रम होता. कानडी नाटकें मला आतां खूप आवडूं लागलीं होतीं. नाटक शाळेंतील मुलांनींच बसविलेलें होतें. परंतु अत्यंत व्यवस्थित व अभिनयपूर्ण कामें सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं केलीं. कर्णाच्या उदारपणावर आधारलेलें नाटकाचें कथानक अत्यंत चटकदार व बहारीचें वाटलें. नाटकानंतर त्यांत काम करणाऱ्या मुलामुलींना प्रेक्षकांनीं कितीतरी बक्षिसें दिलीं ! रात्रीं येथील एका मंदिरांत यात्रेनिमित्त बरेच कार्यक्रम होते. रात्रभर मंदिरांत बसून हे सर्व कार्यक्रम पाहिले. मंदिरांत वाजविलीं जाणारीं वाद्यें व संगीत नावीन्यपूर्ण आणि कर्णमधुर वाटलें. दक्षिण भारतांतील, विशेषतः केरळमधील संगीत हें कानांना अत्यंत गोड लागतें. सकाळसंध्याकाळ इकडील मंदिरांतून

प्रार्थना करावयाचा रिवाज आहे. त्या वेळीं हें संगीत वाजविलें जातें. मंदिरांत अनेक स्त्री-पुरुष येतात. कधींहि देवळाकडे ढुंकूनहि न पाहणारा मी, परंतु या संगीतांतील माधुर्यामुळें मी कोठेंहि मुक्कामास असलों, तरी मंदिरांत संध्याकाळीं गेल्याशिवाय कधींच राहिलों नाहीं. संगीतांत एक ताकद आहे. थकल्या-भागल्या जिवास तो एक विरंगुळा आहे. कासरगोड पूर्वी कर्नाटकांत होतें. त्यामुळें येथें कानडी बोलणारे पुष्कळ लोक आहेत. परंतु राज्यपुनर्रचनेनंतर तें आतां केरळ प्रांतांत समाविष्ट झालेलें आहे. केरळ प्रांतांत अखेर मी सुखरूप पोहोंचल्यानें खूप समाधान वाटत होतें. आतांपर्यंत घर सोडून चारसाडे-चार महिने झालेले होते. केरळमध्यें मी आणखी दीड महिना राहणार होतों व नंतर गांवीं जाणार होतों. मंदिरांतील कार्यक्रम पाहिल्यानंतर दुसऱ्या दिवशीं येथें व्ह्यू मास्टर प्रोग्राम करून पुढें निघालों. कासरगोड नंतर पुन्हा रेल्वेच्या दुतर्फा सुंदर शेतें दिसूं लागतात. इकडे तंबाखू फार पिकते व ती आपल्या-कडील तंबाखूपेक्षां उंच वाढते. तिचीं पानेंहि बरींच मोठीं व रुंद असतात. इकडे मातींत एक प्रकारची भुरकट व पांढुरकी बारीक रेती असते. त्यामुळें तंबाखू खातांना ती नेहेमीं चांगली झटकून खावी लागते. विशेषतः मी तंबाखू खाणारा असल्यामुळें माझ्या ही गोष्ट चटकन् लक्षांत आली. वाटेंत कुठलें तरी लहान स्टेशन लागलें. माझ्या आठवणीप्रमाणें त्याचें नांव कोटीकुलम् हें असावें. तेथें माझ्यावर मोठा प्राणघातक प्रसंग आला.

**मवाल्यांच्या जाळ्यांत सांपडलों !**: संध्याकाळच्या वेळीं मी समुद्र-किनाऱ्यावर फिरायला जात असें. त्याप्रमाणें येथेंहि फिरत फिरत बराच दूर गेलों. एका छप्परांत एक लहानसें हॉटेल होतें. चहा पिण्याची इच्छा झाली म्हणून तेथें गेलों. मळकट कपबशा व त्यांतील तो कळकट चहा पाहून वांती व्हावी; परंतु आंत गेल्यावर तसेंच बाहेर कसें यावें म्हणून थोडा चहा डोळे मिटून पिऊन टाकला. हाटेलांत मळके व फाटके कपडे घातलेले पांच-सहा इसम भयंकर दारू पिऊन तर्रर झालेले होते. मीं पैसे देण्यासाठीं पाकीट काढलें. एकानें माझा छातीवर सदरा धरला व टर्कन फाडून टाकला. मला मनस्वी संताप आला. एकेकाचा जीव घेऊं कीं काय असें वाटलें ! परंतु ते सहा-सात लोक आणि मी पडलों एकटा ! शरीरानें सर्वच दुबळे होते. किडकिडीत हातपाय, मोठें पोट, खोल गेलेले डोळे, सुरकुतलेले गाल. त्यांपैकीं

कुणाहि एकट्यास मीं एका थापडींत पाणी पाजलें असतें. दुसरीचें कारणच



नव्हतें, परंतु त्यांचें संख्याबल जास्त होतें. त्यामुळें माझा उपाय खुंटला. त्यांतील कांहीं कानडी व मल्याळी भाषा बोलणारे होते. मराठी, हिंदी किंवा इंग्रजी मात्र एकासहि माहीत नव्हतें. त्यांतला फक्त एकच असा होता कीं, तो मुंबईस कांहीं दिवस राहिलेला असल्यानें पांचपन्नास इंग्रजी शब्द त्यास येत होते. परंतु ते इंग्रजी शब्द म्हणजे फक्त दहावीस घाणेरड्या व गलिच्छ शिव्या होत्या. त्यानें त्या इंग्रजीचा उपयोग मला शिव्या देण्यांत भरपूर करून घेतला. त्याच्या हातांत एक मोठा बटनाचा तीक्ष्ण चाकू होता. वाटलें घ्यावा हिसकून व एक चपराक अशी लगवावी थोबाडांत कीं, डोळ्यांपुढें काजवे चमकून उजेड पाडावा. परंतु येथें शक्तीचें काम उपयोगी नव्हतें; युक्तिच हवी होती. ते मला सी. आय्. डी. पोलीस समजत होते व दारूचा स्टॉक तेथें भरपूर पडलेला होता. मीं त्यांना माझ्या मोडक्यातोडक्या कानडी भाषेंत, सांगितलें " नानू बब्ब प्रवाशी उद्येनू, उत्तर भारत प्रवास माडे नानू बब्ब दक्षिण भारतमू प्रवास माडीयते, नानू कन्नड बरुत इल्ले. " वगैरे सांगितलें. परंतु नंतर त्यांनीं दुसरा हट्ट धरला, " आम्हांला सट्ट्याचा आंकडा सांगा." छान झालें ! मी त्यांना म्हणालों, " सट्ट्याच्या गणिताचें एक पुस्तक मजजवळ आहे; परंतु तें पुस्तक मीं स्टेशनवर ठेवलेलें आहे. त्यांत पाहिलें असतां सर्व आंकडे बिनचूक कसे पडतात, हें कळतें. पण तें पुस्तक स्टेशनवर असल्यानें तेथपर्यंत चला. तें तुम्हांस मी फुकट देतों. " पिऊन धुंद झालेल्या या मंडळीस हें खरें वाटलें व त्यांतील दोन मवाली-त्यांत तो चाकूधारिहि होताच—माझ्याबरोबर आले. रेल्वेस्टेशन जवळ येतांच मी पळत स्टेशनांत गेलों व पोलिसला फोन करण्यास सांगितलें. ते मवाली जवळचा

चाकू फेकून देऊन पळून गेले. तो चाकू मीं बरोबर आणलेला आहे. अशा प्रकारें या मवाल्यांच्या जाळ्यांतून माझी सुटका झाली. कोटीकुलम्‌नंतर जवळच एक लहानसें स्टेशन आहे. तेथें एक जुना प्रेक्षणीय किल्ला आहे, असें कळतांच मी तो पाहण्यासाठीं गेलों.

**वेकल फोर्ट** : हा किल्ला समुद्रकिनाऱ्यावर आहे. किल्ल्याच्या अर्ध्या भागाचें रक्षण नैसर्गिक रीत्या समुद्रामुळें होतें व अर्ध्या भागावर मजबूत कोट बांधलेला आहे. तसा कोट किल्ल्याच्या चोहों बाजूनें असला तरी प्रवेशद्वाराकडे तो जास्त मजबूत आहे. हा किल्ला इकडील तांबड्यालाल दगडानें बांधलेला आहे, परंतु दिल्लीच्या लाल किल्ल्यास वापरलेल्या दगडाप्रमाणें हा दिसण्यांत लाल असला तरी तितका मजबूत नाहीं. किल्ल्यांत कांहीं प्राचीन विहिरी आहेत व एक बुरूज आहे; बाकी सर्व भाग पडलेला आहे. भारत सरकारच्या पुराण वस्तु-संशोधन खात्यातर्फे तो संरक्षित क्षेत्र म्हणून मानलेला आहे. किल्ल्यावरून सृष्टिसौंदर्य—विशेषतः समुद्राचा देखावा—मनोहर दिसतो. वेकल फोर्टजवळच एक शाळा आहे. तेथें व्ह्यू मास्टरचा प्रोग्राम मोठ्या प्रमाणावर व चांगला झाला. येथून पुढें 'वेस्ट हिल' या छोट्या स्टेशनावर उतरलों. येथें एका टेकडी-वर लष्कराची छावणी आहे. स्टेशन लहान असलें, तरी स्वच्छ व नीटनेटकें आहे. येथें विशेष न थांबतां मी सरळ 'टेलीरची' येथें गेलों.

**अस्पृश्यांसाठीं मंदिरें** : येथील एका सुंदर मंदिरामध्यें मी उतरलों होतों. हें मंदिर श्री. गुरुनारायण यांनीं बांधलेलें आहे. सर्व जातींच्या लोकांना हें मंदिर खुलें आहे. मंदिरांतील स्वच्छता व टापटीप उल्लेखनीय होती. येथें माझी दोन दिवस जेवणाची व विश्रांतीची सोय झाली. केरळमध्यें पूर्वी अस्पृश्यता फार मोठ्या प्रमाणावर पाळली जात असे. त्यामुळें अस्पृश्यांसाठीं येथें एकहि मंदिर नव्हतें व त्यांना इतर स्पृश्य हिंदूंच्या मंदिरांत प्रवेश नव्हता. हल्लीं जीं केरळमध्यें पन्नासपाऊणशें मंदिरें अस्पृश्यांसाठीं खुलीं आहेत त्यांचा इतिहास मोठा मनोरंजक व उद्बोधक आहे.

**स्वामी विवेकानंदांची भेट** : एकदा स्वामी विवेकानंद हे केरळच्या दौऱ्यावर असतांना इकडील अस्पृश्य पद्धति ( अनटचेबल पॉलिसी ) ही फार भयंकर स्वरूपांत आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें. श्री. गुरुनारायण हे त्या वेळचे वेदविद्या जाणणारे मोठे विद्वान् गृहस्थ होते. ते साधु होते. जंगलांत

एकान्तांत मनन करीत ते कुठें तरी बसलेले असत. विवेकानंदांना हें माहीत झालें. त्यांनीं त्यांची भेट घेतली व त्यांना उपदेश करून केरळमध्यें सर्व जातींच्या लोकांना खुलीं अशीं मंदिरें बांधण्याची आवश्यकता पटवून दिली. त्याप्रमाणें गुरुनारायण ह्यांनीं आपल्या उभ्या हयातींत सुमारें पन्नास मंदिरें केरळांत बांधलीं. त्यासाठीं लाखों रुपये खर्च आला. हें मंदिर त्यांनींच बांधलें असून त्यांचा एक ब्राँझ धातूचा सुंदर पुतळा या मंदिरापुढें आहे. येथें दोन दिवस राहून मी शहरांत पुष्कळ भटकलों. हें मलबारमधील उद्योगधंद्यांचें मोठें भरभराटीचें शहर आहे.

**कॅनन्नूर :** मंगलोरपासून १२-१३ मैलांवर कॅनन्नूर हें प्रसिद्ध शहर आहे. समुद्रकांठावरील सृष्टिसौंदर्यानें नटलेलें असें हें बंदरहि आहे. मी सर्व शहरभर फिरलों. येथें गांवाच्या एका बाजूस अत्यंत मोठें विस्तीर्ण असें मैदान लागतें. त्याच्या कडेनें फिरत समुद्र गांठला. समुद्रावरील देखावा व तेथील मुंबईप्रमाणें आलिशान हॉटेल्स् पाहून मलबार हिलची आठवण झाली. येथील सृष्टिसौंदर्य पाहून प्रेक्षक गुंग होतो. मोपला नांवाच्या समाजाची येथें पुष्कळ वस्ती आहे. कॅनन्नूरहून रेल्वेनें त्रिचूरला गेलों.

**त्रिचूरचे रिक्षावाले :** त्रिचूर हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. स्टेशनवरून गांवांत जाण्यासाठीं एक चांगलाच चढ असलेला रस्ता आहे. तेथें माणसानें ओढण्याच्या रिक्षा फार आहेत. केरळच्या आणखीहि दोन-चार मोठ्या शहरांतून या रिक्षा मीं पूर्वी पाहिलेल्या होत्या. परंतु येथील एक दृश्य पाहून माझें हृदय पिळवटून आलें. स्टेशनबाहेर पडतांच पन्नास एक रिक्षावाले आपापल्या रिक्षा घेऊन प्रवाश्यांना त्यांत बसण्याची विनंती करीत होते. मला रिक्षांत बसणें महापाप वाटतें. धट्टाकट्टा मी माणूस ! माणसानें माणसाला जनावराप्रमाणें धावत, तोंडाला फेस येईपर्यंत पळवीत न्यायचें, हें मला कसेंतरी वाटलें. एका रिक्षांत बसून या चढावावरून एक गलेलठ्ठ स्त्री चालली होती. अडीचशें पौंड वजन असेल तिचें. तो लुंगी नेसलेला व अंगांत कांहीं नसलेला काळा कुली घामाघुम झालेला होता. त्याच्या डोक्यावर एक रंगीत फडकें होतें. रिक्षा ओढीत जोरजोरानें तें अजस्र धूड घेऊन तो चढ चढत होता. माझ्या डोळ्यांतून पाणीच आलें.

**जोरसे चलाव :** अरेरे ! कम्युनिस्ट राजवट म्हणूनच भारतांत प्रथम येथें

आली. त्या रिक्षेंत बसणाऱ्या स्त्रीला थोडीहि याची खंत नव्हती. तिचे ते काश्मिरी सफरचंदाप्रमाणें गुलाबी तांबडे गाल, हरणाप्रमाणें टपोरे डोळे, गजवत् शरीर! ती निर्विकार चेहऱ्यानें पाहात होती. चढाला रिक्षावाला थोडा हळूहळू पळत होता. प्रथम घामट वास, नंतर रिक्षा जवळून गेल्यावर अत्तराची सुगंधी अशीच हवेची झुळूक माझ्या पुढून गेली. त्या रिक्षावाल्यावर खेकसून ती म्हणाली, " जोरसे चलाव ! " तिचे ते हिंदींतील शब्द ऐकून तो रिक्षावाला जोर-जोरानें धावूं लागला. कारण ते शब्द अपरिचित होते. इकडे ते कधीं तरी ऐकूं येतात. तो बिचारा हें नवखें गिऱ्हाईक पाहून बावरला. पोटासाठीं पाय धावत होते. भूक ! !

**कम्युनिस्ट पार्टी** : " जबतक दुनियामें एकही भूखा है। तबतक इन्-किलाब होताही रहेगा। " हेंच खरें ! क्रांतीशिवाय शांति फुकाची आहे. ही भुकेची आग विझविण्यासाठीं माणसाला वाटेल तें काम करावें लागतें. माणूस माणसांतील मनुष्यत्व विसरत चालला आहे. बसणारा आणि ओढणारा हे दोघेहि विसरले आहेत. या गोष्टीची मला रुखरुख लागली. मी येथील किसान सभेच्या जिल्हा कमिटीच्या ऑफिसवर उतरलों होतों. या प्रसंगाची चर्चा मीं तेथें केली. केरळ हा शैक्षणिक दृष्टया भारतांत सर्वांत पुढारलेला प्रांत आहे. तो समृद्धहि आहे. परंतु दाट लोकसंख्येमुळें व विषमतेमुळें हे दिवस आलेले आहेत. कम्युनिस्ट पार्टी अहोरात्र झटून या परिस्थितींतून समाजाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहे. अनेक निष्ठावान् कम्युनिस्ट कार्य-कर्त्यांची व माझी येथें ओळख झाली. खास महाराष्ट्रीय पदार्थ मागवून मला त्यांनीं भोजन दिलें व झोपण्याची एका खास ( निवान्त ) ठिकाणीं सोय केली.

**सर्कसच्या तंबूंत** : दुसऱ्या दिवशीं शहर पाहण्यासाठीं मी निघालों. शहरांतील म्युनीसिपालिटीची इमारत प्रेक्षणीय आहे. बाजूस मोटर-स्टँड असून येथून पालाघाट वगैरे ठिकाणीं मोटारी सुटतात. म्युनीसिपालिटीपुढील रस्त्यावर माधववर्मा नांवाच्या जुन्या राजाचा किंवा दिवाणाचा सुंदर पुतळा उभारलेला आहे. या रस्त्यानें पुढें भटकत गेलों. येथें एक मोठा भव्य तंबू पाहून किंचित् थांबलों. जगप्रसिद्ध कमान श्रीरिंग सर्कसचा तो तंबू होता. कुणातरी महाराष्ट्रीय गृहस्थाची चौकशी करावी, म्हणून मी तंबूत गेलों. एक मालवणचे व एक नगर जिल्ह्यांतील असे महाराष्ट्रीयन सर्कशींत रिंग

मास्तरच्या हुद्द्यावर होते. पैकीं नगरचे श्री. थोरात माझ्याच आडनांवाचे व भाऊबंदच निघाले. त्यांनीं मला एक दिवस सर्कशींत ठेवून घेतलें. दुसऱ्या दिवशीं येथून निघून अर्नाक्युलम्ला गेलों.

**अर्नाक्युम्** : हें गांव त्रिचूरहून सुमारें चाळीस पंचेचाळीस मैल दूर आहे. पूर्वीच्या कोचीन संस्थानची राजधानी येथें होती. त्रिचूर ते अॅर्नाक्यूलमला जातांना बाजूचें सृष्टिसौंदर्य पाहण्यासारखें आहे. केरळ प्रांत सर्वच प्रेक्षणीय आहे. केरळला दाक्षिणेकडील काश्मीर—हिंदुस्थानचा बगीचा असेंहि म्हणतात. खरोखरच भारतांतील हा अवाढव्य नि सुंदर बगीचाच आहे. अनेक तलाव, कालवे, नद्या नि बागा सर्व कांहीं चित्ताकर्षक व मनाला भुरळ पाडणारें आहे. अॅर्नाक्युलम् मोठें शहर व बंदर आहे. शहरांतील रस्ते मोठे, रुंद, सुंदर आणि स्वच्छ आहेत. अॅर्नाक्युलम् शहरांत फिरण्यास मला जास्त वेळ नसल्यानें मीं सरळ बंदराचा रस्ता धरला. स्टेशनपासून बंदर बरेंच दूर अंतरावर आहे. परंतु शहर बघतां यावें म्हणून मीं हा प्रवास पायींच केला. अॅर्नाक्युलम् बंदरास कोचीन बंदर असेंहि म्हणतात. हें फार प्रेक्षणीय, तसेंच अत्यंत भव्य व उपयुक्त असें बंदर आहे. समुद्रांत शेंकडों लहानमोठ्या बोटी नांगरून पडलेल्या होत्या. त्यांतील कांहीं तर फारच अजस्त्र होत्या. सत्तांतर होणें म्हणजे या असल्या करोडों रुपये किंमतीच्या व संरक्षणाच्या बाबीस मुकणें असाहि अर्थ होतो. सत्ता ही केवढी बलवान् चीज आहे, याचें प्रत्यंतर प्रवासाशिवाय येत नाहीं. बंदराकडील भागांत समुद्रकिनाऱ्यावर मोठा व सुंदर बगीचा आहे. येथून पुढचा माझा प्रवास बोटीनें होणार होता. त्यामुळें घरीं कांहींतरी टपाल द्यावें असें मनांत आलें. कारण यापूर्वी मीं बोटीनें कधींच प्रवास केलेला नव्हता. फार तर मुंबईस मजेखातर होडीनें मैल दीड मैल समुद्रांतून फिरून आलों असेन एवढेंच. यामुळें बोटीचा प्रवास करण्यास मी थोडा भीतच होतों. परंतु मला समुद्रकिनाऱ्यावरील शोभा पाहावयाची होती. त्यामुळें हा धोका पत्करण्याचें धाडस मीं केलें. तसें दहापांच दिवसांनीं मी घरीं पत्र लिहीत होतोंच. परंतु या वेळीं जास्त खुलासेवार पत्र पाठविण्याचें ठरविलें. येथील बागेंत एका झाडाखालीं बसून मीं पत्र लिहिलें. त्यांत माझ्या झालेल्या व पुढील प्रवासासंबंधानें थोडक्यांत हकीकत लिहिली. नंतर रात्रीच्या

बोटीनें जलपर्यटनास निघालों आणि आलेप्पी ह्या केरळमधील दुसऱ्या प्रसिद्ध बंदराला पोहोंचलों.

**आलेप्पी** : रात्रीमुळें समुद्रकडेनें विशेष शोभा पाहतां आली नाहीं. ॲर्नाक्युलम् ते ऑलेप्पी हें चाळीस–बेचाळीस मैल अंतर आहे. परंतु बोटीचें थर्ड-क्लासचें भाडें अवघें सात-आठ आणेच पडतें. केरळमध्यें प्रवासाचीहि फार मोठी सोय आहे. वेळेचें बंधन नसेल तर अत्यंत स्वस्तांत ह्या बोटीनें प्रवास होतो. प्रवासांत चार-सहा आण्यांत जेवणहि मिळतें. मात्र भात व सांभारें एवढेच पदार्थ सहा आण्यांत मिळतात. सकाळीं साडेपांचला आलेप्पी येथें आलों. एक दोन तास दिवस उगवेपर्यंत एका हॉटेलांत बसून राहिलों. नंतर शहरांत पायींच चालत गेलों.

**गुजराथी शाळा** : येथें एक गुजराथी शाळा आहे. गुजराथी शाळा आणि केरळमध्यें ! मला जरा नावीन्यच वाटलें, तसेंच चमत्कारिकहि वाटलें. चौकशीअन्तीं असें कळलें कीं, येथें खोबरेल तेलाच्या गिरण्या आहेत. त्यांचे मालक गुजराथी आहेत. त्यांच्या मुलामुलींसाठीं ही खास खाजगी शाळा असून एक गुजराथी पंड्या या शाळेचे शिक्षक आहेत. मीं त्या शिक्षकांचा तपास केला व माझ्या प्रवासासंबंधीं त्यांना माहिती सांगितली. त्यांनीं मला तेथेंच दोन दिवस ठेवून घेतलें. त्यांच्या शाळेंत व्ह्यू मास्टरचा प्रोग्राम झाला. ह्या कार्यक्रमास कांहीं गुजराथी स्त्रियाहि आल्या होत्या. दिल्ली येथील बिर्ला मंदिर (यास लक्ष्मीनारायण मंदिर असेंहि नांव आहे.) वगैरे चित्रें त्यांना फार आवडलीं. दिल्ली बिर्ला मंदिरासंबंधीं मीं त्यांना हिंदींतून कांहीं माहितीहि सांगितली. या कार्यक्रमाचें मला एकूण उत्पन्न सुमारें पन्नास रुपये एवढें झालें. एका कार्यक्रमाचे एवढे पैसे मला पूर्वी कधींच मिळाले नव्हते. एवढे पैसे मिळाले तरी मीं येथील महॉमेडन्स हायस्कूल वगैरे ठिकाणींहि तीन-चार कार्यक्रम केले व निवांतपणें शहर पाहण्याचें ठरविलें.

**दक्षिणेकडील श्रीनगर** : केरळला जर आपण दक्षिण काश्मीर मानलें, तर आलेप्पी हें श्रीनगर आहे. शहरांत कालव्यांचें जाळें पसरलेलें आहे. त्यांतून शेंकडों लहान लहान होड्या सारखी ये-जा करीत असतात. रात्रंदिवस त्यांची रहदारी कालव्यांतून चालू असते. शहरांतून दोन मोठाले कालवे गेले असून त्यांना जोडण्यासाठीं बरेच आडवे कालवे काढलेले आहेत. होड्यांतून

मासे, नारळ, काथ्या वगैरे मालाची सारखी ने-आण पाहून मला खूपच मौज वाटली. मी तासनूतास ह्या कालव्यानें होड्यांतून भटकलों. कधीं कधीं तर मधें पूल दूर असला, तर एका घरांतून समोरच्या दुसऱ्या घरांत जाण्यासहि होडीचा उपयोग करावा लागतो. कालवे व त्यांच्या कडेला सुंदर झाडी, दुकानें वगैरे दृश्य अत्यंत नयनरम्य आहे. आलेप्पी शहरांतून कोठें बाहेर जाऊंच नये असें वाटतें. परंतु प्रवासी म्हटला कीं, त्याला खूप गोष्टी पाहावयाच्या असतात. एके ठिकाणीं राहून त्याचें भागणार नाहीं. येथील एका मंदिरांत रात्रीं मल्ळयाळी भाषेंतील कीर्तन ऐकून दुसऱ्या दिवशीं बोटीनें क्विलॉनकडे कूच केलें.

**क्विलॉन :** रस्त्यानें बोट एका कृत्रिम बांधून काढलेल्या कालव्यांतून जाते. सडकेपेक्षां इकडे वहातुकीसाठीं कालवे काढले जातात व तेंच जास्त सोईचें पडतें. आलेप्पी ते क्विलॉन हा होडीचा रस्ता आठदहा तासांहून जास्त आहे. या प्रवासांत मीं पाहिलेलें सृष्टिसौंदर्य अविस्मरणीय आहे. घरकोंबडे लोक उंबराला जग मानतात. त्यामुळें त्यांना निसर्गातील नाना, चमत्कारिक व विविध स्वरूपाचें सौंदर्य कधींच पाहतां येत नाहीं. त्यांच्यासारखे अभागी तेच! आपण आज स्पुटनिकच्या युगांत आहोंत. लाखों, करोडों मैल अंतरावरील ग्रहगोलावर जाण्याची माणसाची मनीषा आहे, परंतु आपण निदान पृथ्वीवरील तरी कांहीं भाग पाहण्याची मनीषा ठेवली तरी पुष्कळ! कालव्याच्या कडेनें दुतर्फा नारळ, पोफळी व काजू वगैरे झाडांची नुसती रीघ लागलेली होती. कांहीं झाडें तर कडेला वांकून पाण्यांत आपलें प्रतिबिंब मोठ्या डौलानें पाहात होतीं. मध्येंच एखाददुसरें झोपडें, त्यांतील शेतकरी व त्याचीं मुलें आमच्याकडे पाहात होतीं. लुंगी नेसलेले, अंगांत कांहीं कपडा नसलेले शेतकरी पाहून मजा वाटते. इकडे स्त्रियाहि सर्वत्र लुंगीच नेसतात व एखादें तलम कापडाचें ब्लाऊज अंगांत घालतात. कारण हवा उष्ण व अतिशय दमट आहे ना! एका लहानशा बोट-स्टॉपवर आमची बोट थांबली होती. मोटारीप्रमाणें ही बोट ठराविक स्टॉपवरील प्रवाशी घेण्यासाठीं थोडा वेळ थांबत असते.

**एल्फंटा–विचित्र रोग :** थोडा वेळ स्टॉपवर थांबून चहा घ्यावा म्हणून मी उतरलों. सहज तेथें जमलेल्या कांहीं रहिवाश्यांच्या पायांकडे लक्ष गेलें आणि माझे डोळेच झाकले. त्यांचे गुडघ्यापासून खालीं पाय इतके जाड

आणि विद्रूप होते कीं, सांगतां सोय नाहीं. जीवाभारी झालेले ते जाडजूड पाय पाहिले कीं मेंदु बधीर होतो आणि चक्कर यायला सुरुवात होते. पाय नुसतेच जाड नाहींत, तर त्यांवर कसले तरी पिवळे फोड, सुरकुत्या दिसतात. आपल्याला जर असा रोग झाला तर! ही कल्पना असह्य होते. मीं चौकशी केली कीं, हा भयंकर रोग कशामुळें होतो? कांहीं लोक म्हणाले कीं, विषारी पाणी प्याल्यानें हा रोग होतो. माझी मति गुंग झाली. मी येथें भरपूर पाणी प्यालों होतों व हॉटेलांत मला चिक्कार डांस चावले होते. माझी पांचावर धारण बसली. काय करावें हेंच सुचेना. पुन्हा पुन्हा माझ्या डोक्यांत कल्पना यायची कीं जर, मला हा रोग झाला तर! परंतु सुदैवानें मला तसें कांहीं झालेंच नाहीं. माझें तकदीर शिकंदर! मी सरळ होडींत बसलों व पुढचा मार्ग धरला. पुढें पुन्हा तेंच सृष्टिसौंदर्य. सबंध दिवस मी होडींतच बसलों होतों. होडी यंत्रावर चालणारी होती. होडींतून पाणी सहज हातानें घेतां येईल इतकें जवळ होतें. होडीला अंगचेंच बाक काढलेले होते. बाकावर बसून मागच्या फळीला टेकून मी गुणगुणत होतों.

" सैर कर दुनियाकी गाफील जिंदगानी फिर कहाँ !
जिंदगी अगर रही तो नवजवानी फिर कहाँ ? ! "

पंडित राहुलजींच्याहि गुरूचा वरील मंत्र आहे. पंडित राहुलजी माझे गुरु आहेत. आपण ज्यांना पाहिलेंहि नाहीं त्यांना आपले गुरु करूं शकतों कीं नाहीं, हें मात्र माहीत नाहीं. परंतु ज्यांच्यापासून मी भ्रमणविद्या शिकलों तेच आपले गुरु, अशी भारतीय संस्कृतींतील थोर शिकवण; म्हणून मी त्यांना माझे गुरुच मानतों. तसेच माझे मित्र दौलतराव घुमरे. नांवाप्रमाणेंच ते माझे धन आणि दौलत सर्व कांहीं आहेत. त्यांची मला शिकवण आहे, "अखंड वाचन करा; प्रगतीचा प्रयत्न सारखा चालूं ठेवा; कुणाच्या दयेवर आपला विकास होणार नाहीं; आपण आपल्या प्रयत्नांनीं आपली लायकी सिद्ध केली पाहिजे. आपण अत्यंत ज्ञानपिपासू आणि प्रामाणिक आहांत, परंतु कष्टाशिवाय व भांडवलाशिवाय शेती नाहीं, तद्वत्च वाचनाशिवाय ज्ञान नाहीं." कष्टा-शिवाय ज्ञान नाहीं, ही माझ्या मित्राची शिकवण आहे. ते माझे मित्रहि आहेत, गुरुहि आहेत. आत्मप्रौढीचा दोष न येईल तर सागतों, मीं या माझ्या मित्राची शिकवण तंतोतंत अमलांत आणली आहे. माणसाचा श्रेष्ठ

गुरु त्याची आई. माझ्या आईनें मला फक्त एकच शिकवण दिली. चारित्र्य व प्रामाणिकपणा ही तिची महान् शिकवण आहे. यापेक्षां जास्त कांहीं तिला माहीत नाहीं. माझें शिक्षण फक्त इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंत झालेलें आहे. तें सुद्धां माझ्या मामांनीं केलें. यापेक्षां जास्त शिक्षणच नाहीं, असा माझ्या आईचा समज होता, " मराठी सात बुकं, इंग्रजी चार बुकं, पुढं लेहणंच नाहीं," असें ती म्हणे.

अशा प्रकारें होडींत बसून माझे गुरु, मित्र, आई यांच्या शिकवणुकीची व प्रेमाची आठवण करीत होतों. आज मी धन्य झालों होतों ! सृष्टिसौंदर्यानें ओतप्रोत भरलेल्या केरळच्या भूमींत मी संचार करीत होतों. क्विलॉनला मी आलों. परंतु शहरांत विशेष फिरलों नाहीं. घर सोडून बरेच दिवस झालेले होते. आतां फक्त केरळची राजधानी ' त्रिवेंद्रम् ' शहर पाहून मी परत फिरणार होतों. त्यामुळें येथून जलद प्रवास व्हावा, या हेतूनें मीं त्रिवेंद्रम् येथें रल्वेनें जाण्याचें ठरविलें. शिवाय असेंब्लीची बैठक चालू होती. मला केरळची असेंब्लीहि पाहावयाची होती. म्हणून मीं सरळ रेल्वे-स्टेशन पकडलें व त्रिवेंद्रमूला आलों.

**त्रिवेंद्रम्** : मी त्रिवेंद्रम् सेंट्रल स्टेशनवर उतरलों. मध्यरात्र झाली होती त्यामुळें बाहेर न जातां स्टेशन-मास्तरच्या परवानगीनें स्टेशनांतच झोपलों. दुसरे दिवशीं येथील कम्युनिस्ट प्रांतिक कचेरींत जाऊन केरळची असेंब्ली बघण्याची माझी इच्छा त्यांना सांगितली. त्यांनीं असेंब्लीसाठीं पास देण्याचें कबूल केलें; परंतु कुठल्या तरी बिलाचा अभ्यास करण्यासाठीं तीन दिवस असेंब्लीची बैठक बंद होती. त्यामुळें माझी तीन दिवस राहण्याची व्यवस्था पार्टीच्या जिल्हा कमिटीच्या ऑफिसांत करण्यांत आली. त्यामुळें अनायासेंच तीन दिवस मला येथें भटकण्यास वेळ मिळाला. मी प्रथम येथें कांहीं ठिकाणीं माझे नेहमींचे प्रोग्रॅम केले. नंतर येथील प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. मला मार्ग-दर्शक म्हणून येथील पार्टी-ऑफिसमधील कांहीं कार्यकर्ते मिळाले होते. प्रथम शहरांतील प्रसिद्ध इमारती, असेंब्ली हॉल, ५७ च्या हुतात्म्यांचें सुंदर व भव्य स्मारक, स्टेडियम, टाऊन हॉल वगैरे स्थळें पाहिलीं. नंतर दुसऱ्या दिवशीं घरीं टपाल लिहिलें आणि पुन्हा शहर बघण्यासाठीं निघालों.

**इकडची फॅशन :** त्रिवेंद्रम् हें सुमारें लाख दीड लाख लोकसंख्या असलेलें मोठें शहर आहे. शहरांतील रचना, टापटीप, स्वच्छता, त्यांत डोकावणारीं झाडें यांमुळें हें शहर मला फार आवडलें. शहरांत मधून मधून उंच टेकड्या आहेत. त्यांवर सुंदर इमारती व नारळीचीं झाडें दिसतात. उंचीमुळें हें दृश्य अत्यंत सुंदर व उठावदार दिसतें. सबंध दिवसभर मी व माझे मार्गदर्शक सहकारी शहरांत फिरत होतों. उन्हामुळें आमच्या अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या. परंतु आमचें तिकडे मुळींच लक्ष नव्हतें. रस्त्यानें सर्वत्र पांढऱ्या स्वच्छ लुंग्या नेसलेले व अंगांत साधा सदरा अगर बुशशर्ट घातलेले पुरुष दिसत होते. स्त्रियांचा पोशाखहि पांढरें शुभ्र तलम पातळ व तसलाच ब्लाऊज असा होता. इकडे कांहीं स्त्रिया लुंगी नेसतात. परंतु त्या विशेषतः खेडें विभागांत जास्त आढळतात. दळणवळणानें व प्रामुख्यानें आपल्याकडील हिंदी सिनेमानें सर्व फॅशन्स झपाट्यानें बदलत आहेत. स्त्रिया नट्यांप्रमाणें गोल पातळच जास्त पसंत करतात. लुंगी मात्र बदलण्याची शक्यता फार कमी दिसते. कारण इकडील हवामान ! पायजमा घातलेला माझ्यासारखा मनुष्य विरळाच दृष्टीस पडायचा. मला कांहीं लोक तत्काळ मुंबईकर म्हणून ओळखायचे. कारण माझा पायजमा ! इकडे हिंदी सिनेमा व त्यांतील गाणीं फार लोकप्रिय आहेत. एखादा मल्याळी सिनेमा पाहावा, असा माझा विचार होता. परंतु येथील माझ्याबरोबरीच्या कॉम्रेडस्‌ना हिंदी सिनेमाच फार आवडत असे. ते मला विचारीत, " तुम्ही नर्गिस, मधुबाला, राजकपूर, दिलीपकुमार यांना पाहिलें आहे का हो ? " अर्थातच मुंबईस वर्ष दीड वर्ष वास्तव्य केलें असल्यानें यांपैकीं बऱ्याचजणांना मीं पाहिलेलें होतें. त्यांना हें सांगतांच खूप मौज वाटली. त्यांनीं मला एखादें हिंदी गाणें म्हणण्याचा खूप आग्रह केला. मोबदल्यांत एखादें मल्याळी क्रांतिगीत ऐकविण्याचें त्यांनीं कबूल केलें. गाणें म्हणणें म्हणजे मला नवीनच गोष्ट होती. तसें गाणीं व संगीत मला आवडतें. परंतु मला स्वतःला मात्र यांपैकीं कांहींच कला साधली नाहीं. त्यांचा आग्रह वाढतच आहे, असें पाहून मी विनोदानें त्यांना म्हणालों, " हें पाहा मी गाणें गातों, परंतु प्लेबॅक तुम्ही द्या. "

**प्राणिसंग्रहालय :** मीं अनेक प्राणिसंग्रहालयें पाहिलीं होतीं. परंतु हें प्राणिसंग्रहालय मला विशेष नावीन्यपूर्ण व रमणीय वाटलें. पूर्वीं न पाहिलेले

अनेक प्राणी येथें मीं पाहिले. तसेंच त्यांची राहण्याची नैसर्गिक सोय पाहून तर मी थक्कच झालों. पशुपक्ष्यांची निरनिराळी स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. सिंह, वाघ, वगैरेंची खास नैसर्गिक सोय केलेली आहे. एका मोठ्या पटाईत वाघासाठीं मोठी उंच भिंत बांधून गवत वगैरेची नैसर्गिक सोय केलेली आहे. येथें मीं नव्यानेंच पाहिलेला प्राणी म्हणजे गवा ( बायझन ). हा प्राणी अत्यंत मोठा आहे, मोठ्या गेंड्यासारखा आहे. मात्र गेंड्यांत व यांत भरपूर फरक आहे. येथें एक मोठा गेंडाहि आहे. नाना जातींचे व चित्रविचित्र रंगांचे प्राणी येथें आहेत. एक दृश्य तर अतीव मनोहर वाटलें. मीं मोर पुष्कळ पाहिले होते. इतकेंच काय उत्तर भारतांत शेंकडों मोर स्वैर संचार करतांना मीं पाहिलेले होते. परंतु मोरांचें नृत्य कधींच पाहिलेलें नव्हतें. या प्राणिसंग्रहालयांत मात्र हें दृश्य मला पाहावयास मिळालें. आमच्याप्रमाणेंच या मोरालाहि आनंद झाला होता. तो आपला पिसारा उभारून नृत्य करूं लागला. अत्यंत आनंदानें तो नाचत बागडत होता. गिरक्या घेत घेत तो आपलें सर्वांग आम्हांला दाखवीत होता. प्राणिसंग्रहालयांतील तलावांत हंस पक्षी विहार करीत होते. सर्वच दृश्य नयनरम्य होतें. येथून जवळच एक सर्पघर व एक म्यूझियम आहे. मीं शेंकडों प्रकारचे सर्प प्रत्यक्षच रानावनांत पाहिलेले होते. त्यामुळें ते पाहण्यांत वेळ गमविण्यांत मला कांहींच स्वारस्य वाटेना. म्यूझियमस्हि मीं फार पाहिलेलीं होतीं; परंतु येथील कांहीं नवीन वस्तु पाहण्यासारख्या आहेत, असें कळल्यावर मी तें पाहण्यासाठीं गेलों.

**पदार्थसंग्रहालय :** येथील पदार्थसंग्रहालयांतील वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे कथ्थक नृत्याचें मॉडेल ! सुमारें एक फूट उंचीच्या पांच पंचवीस बाहुल्या आहेत. कथ्थक नृत्यांतील पात्रें व त्यांचा पोशाख यांचें हुबेहुब चित्र त्या बाहुल्यांद्वारें प्रेक्षकांसमोर उभें करण्याचा कलावन्तानें अत्यंत कसोशीनें प्रयत्न केलेला आहे. त्याचप्रमाणें येथील दुसरी वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे केरळ प्रांतांतील हजारों वर्षांपूर्वीचे अत्यंत प्राचीन दागदागिने ! त्यांचा सुंदर आकार व कलापूर्ण घडण पाहून आश्चर्य वाटतें. इतरहि अनेक गोष्टी यांत पाहण्यासारख्या आहेत. नायर किंवा नंबियार निश्चित आठवत नाहीं, परंतु वरीलपैकीं एका घराण्यांत पूर्वीं अशी रीत होती कीं, कुटुंबां-तून विभिन्न व्हावयाचें नाहीं. इतकेंच काय, दोन तीन पिढ्यांपर्यंत हे लोक.

अनुक्रम २५४०८ ... वि: भू-प्रवास...
९७५ ... नों दि: ...२३।३।५०

वेगळे निघत नसत. शेवटीं त्यांना राहतें घर अपुरें होऊन जाई. परंतु त्यांचें घर साधें नसे. त्यांत त्यांचें प्रार्थनाघर, देवघर, यज्ञघर, सर्व कांहीं वेगळें व स्वच्छ असें. हें सर्व बांधून काढावयाचें म्हणजे भलें मोठें घर लागायचें. कधीं कधीं तर यांचें एक घर म्हणजे मोठें गांवच होऊन बसायचें. अशाच त्यांच्या एका मोठ्या थोरल्या गांवासारख्या घराचें मॉडेल येथें मीं पाहिलें. मला खूप मौज वाटली.

**असेंब्लीचें कामकाज** : दुसऱ्या दिवशीं असेंब्लीचें कामकाज सुरू झालें. मला प्रा. नंबियार नांवाच्या असेंब्ली मेंबरचा पास पार्टी-ऑफिसांतूनच मिळाला. त्यामुळें असेंब्ली पाहावयास गेलों. असेंब्लीची इमारत खूप भव्य व सुंदर आहे. मुंबईप्रमाणें एअरकंडिशन्डची व्यवस्था येथें नसली तरी भव्यपण व सर्वच कांहीं आकर्षक आहे. मीं सुमारें तीन तास असेंब्लीचें कामकाज पाहिलें. सर्व कामकाज मल्याळी भाषेंत चाललें होतें. त्यामुळें मला कांहींच समजलें नाहीं. फक्त कम्युनिस्ट पक्षाचें मंत्रिमंडळ बघतां आलें, एवढेंच समाधान त्यांत मिळालें. महत्त्वाचा फरक जो स्पीकराच्या कम्युनिस्टांना उजव्या बाजूस बसण्याचा मान इतर कोणत्याच असेंब्लींत दिसला नाहीं, तो येथें दिसला. असेंब्ली पाहून मीं येथून मागें परतण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशीं येथील कॉम्रेड्सचा निरोप घेऊन परत फिरलों. असेंब्लीहून नदीमार्गानें मोटार-बोटीनें प्रवास करून सृष्टिसौंदर्य बघत, कोट्यमूसारखीं इकडून जातांना न पाहिलेलीं ठिकाणें पाहात मागें येत होतों.

**कोट्यम्‌चा रुपेरी मानस्तंभ** : कोट्यम् हें जिल्ह्याचें गांव आहे. येथें मी दोन-तीन दिवस होतों. येथील एका मंदिरांत मी उतरलों होतों. येथील मंदिराचें व दाक्षिण भारतांतील जवळ जवळ सर्वच मंदिरांचें एक वैशिष्ट्य आहे. तें म्हणजे मंदिरापुढील चांदीचा मानस्तंभ ! हा मानस्तंभ पंचवीस ते पन्नास फूट उंचीपर्यंत असू शकतो. आंतून हा लाकडाचा अगर दगडाचा असतो. परंतु त्यावर सुंदर चांदीचें अर्धा इंच जाडीचें कव्हर केलेलें असतें. त्यामुळें तो खूप सुंदर दिसतो. अशाच एका मंदिरांत मी उतरलों होतों. मंदिरांतील या संपत्तीमुळें येथें उतरण्याची परवानगी घेणें हें कार्य कठीण होऊन बसलें. मात्र परवानगी मिळाल्यावर जेवण, खाणेंपिणें सर्व कांहीं विनबोलतां व्यवस्थित मिळतें. मंदिरांत जेवण वगैरे आटोपून मी व्हू

मास्टर प्रोग्रॅमसाठीं एका शाळेंत गेलों. कार्यक्रम चांगला झाला. तेथील कांहीं शिक्षकशिक्षिकांकडून मला कळलें कीं, नवीन शिक्षण बिलाप्रमाणें पुढील पंच-वार्षिक योजनेंत आमच्या राज्यांतील सर्व शाळांना असले व्ह्यू मास्टर सरकारकडून मोफत मिळणार आहेत. मी म्हणालों, ठीक झालें. माझा प्रवास तर पूर्ण होऊन गेला. आतां कांहींच हरकत नाहीं, परंतु माझ्याप्रमाणें प्रवास करूं इच्छिणाऱ्या माझ्या कांहीं मित्रांचें एक चांगलें व सोपें प्रवाससाधन नाहींसें झालें. इतर प्रांतांत तरी ही सोय कोठें झाल्याचें ऐकिवांत नाहीं. याप्रमाणें कार्यक्रम आटोपल्यावर मी मंदिराकडे आलों.

मंदिरांत आल्यावर माझे धाकटे बंधु चि. कारभारी यांना पत्र लिहिलें. त्यांत माझी खुशाली व मी परत घरीं येण्यास निघाल्याविषयींचा मजकूर लिहिला. माझ्या पत्नीस ही खबर देण्यास सांगितलें. माझा छोटा मुलगा— त्याला सोडून मी आलों तेव्हां चालतांहि येत नव्हतें इतका तो लहान होता. आतां त्याला चालतां येत असेल असा मी अंदाज करीत होतों. माझें टपाल नेहमीं घरीं जात असें. परंतु माझ्या अनियमित पत्त्यामुळें मला घरचें टपाल कधींच मिळत नसे. त्यामुळें एक प्रकारची हुरहुर वाटली होती. घरच्या लोकांची खंत वाटली होती. त्यामुळें कोट्यम् जिल्ह्यांतील प्रसिद्ध चहाचे मळे पाहण्याचा विचारहि मीं तहकूब केला. केरळ प्रांतांत जितका चहा पिकतो तो बहुतेक सर्व कोट्यम् जिल्ह्यांतच पिकतो. परंतु तेथें अनेक जंगली प्राण्यांची, विशेषतः सर्पांची फारच भीति असते, असें मीं ऐकलें होतें. त्यामुळें मी तिकडे जाण्याचें टाळलें.

**येथील कांहीं विचित्र रिवाज :** ऊन भयंकर झालें होतें. त्यामुळें स्नान करण्याची इच्छा झाली. इकडे लोक दिवसांतून दोन वेळां स्नान करतात. मलाहि आज दोनदां स्नान करण्याची इच्छा झाली. त्यामुळें मी कपडे घेऊन येथील मंदिरासमोरील एका सार्वजनिक बारवेवर गेलों. बारव अत्यंत भव्य होती. स्त्री-पुरुषांची स्नानाची व्यवस्था केलेली होती. कपडे धुण्यास मनाई असतांहि कांहीं लोक कपडे धूत होते ! मीसुद्धां स्नान करण्यापूर्वीं एखादा कपडा धुण्याच्या विचारांत होतों. परंतु तोंच सात-आठ लोकांचें एक टोळकें खांद्यावर टॉवेल घेऊन आलें. ते लोक तरुण असून त्यांचे कपडेहि अत्यंत स्वच्छ व नीटनेटके होते. त्यांनीं पाण्याजवळ येतांच

आपल्या अंगावरील कपडे काढून टाकले व आंघोळ करण्याच्या तयारीनें उभे राहिले. त्यांच्या सर्व अंगावर बोटभरसुद्धां कपडा नव्हता. उघडे नागडे ते सात-आठ जलपट्टु पाहून मी क्षणभर गुदमरून गेलों. हे लोक चांगले शिकलेसवरलेले दिसत होते. निदान त्यांना वेडे म्हणण्याचें धाडस कुणीं केलें नसतें. मी त्यांना इंग्रजींत विचारलें कीं, " आपण नग्न स्नान कां करतां ? " त्यावर त्यांनीं उत्तर दिलें, " ही आमची पूर्वपरंपरागत रूढि आहे. यांत नवीन कांहींच नाहीं." मला या लोकविलक्षण व चमत्कारिक चालीचें आश्चर्य वाटलें. मी स्नान करून घरीं आलों व माझ्या दैनंदिनींत ही गोष्ट लिहून ठेवली. इतरहि पुष्कळच विलक्षण चालीरीति या प्रांतांत आहेत. त्यांची मीं येथील पुजाऱ्याकडून माहिती घेतली व रात्रीं तिची माझ्या रोजनिशींत नोंद केली. कांहीं चमत्कारिक वाटणाऱ्या चालीरीति पुढीलप्रमाणें सांगतां येतील. प्रेत घराच्या मागच्या अंगणांत पुरणें किंवा जाळणें. वडील मुलानेंच फक्त धार्मिक लग्न करणें. इतर लहान किंवा धाकट्या मुलांनीं परजातींतील मुलीशीं संबंध ठेवून व त्या मुलीला आपल्या घरीं न आणतां आपणच तिच्या घरीं जाणें. तिच्यापासून होणाऱ्या मुलांच्या पालन-पोषणाची जबाबदारी तिच्यावर टाकणें वगैरे. अशा अनेक चालीरीति सांगतां येतील. इकडे कांहीं जातींतून मातृसत्ताक कुटुंबपद्धति आहे. इस्टेटीचा वारसा मुलांऐवजीं मुलींस मिळतो. हें मुलींचें भाग्यच समजलें पाहिजे ! आणि त्यामुळेंच केरळ प्रांतांत मुलांपेक्षांहि मुली जास्त संख्येनें सुशिक्षित सांपडतात. तसेंच इकडे बहुपतित्वाची चाल आहे. अलीकडे या चालीरीति मोडत चालल्या आहेत. परंतु तरीहि खेडें विभागांतून व शहरांतील मागसलेल्या लोकांतून ह्या रूढि मोठ्या प्रमाणावर चालू आहेत, असें कळलें. केरळ हा विविध प्रकारें, विविध सौंदर्यानें, रीतिरिवाजांनीं नटलेला थटलेला असा प्रांत आहे. मी तेथें दीड महिना राहिलों. त्या अवधींत मला शेंकडों प्रकारचे मजेदार अनुभव आले. परंतु केरळवर मी स्वतंत्रच पुस्तक लिहिणार असल्यानें आपण केरळचें प्रवासवर्णन येथेंच संपवूं.

कोच्यिमूनंतर मी माझा प्रवास खूप तेज गतीनें केला. होनावर येथें व गिरसप्पा येथें डॉक्टरांना आश्वासन दिल्याप्रमाणें भेटून थेट बेळगांव गांठलें. तेथून कऱ्हाड, मिरज मार्गानें पुणें व पुण्याहून मुंबईस आलों. मुंबईहून जो

निघालों तो थेट माझ्या घरीं, कासारवाडी येथेंच विश्रांतीसाठीं गेलों. माझी आई, भाऊ, बहीण व पत्नी यांना कोण आनंद झाला म्हणून सांगूं ! त्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला ! !

●●●

# उत्तरेकडील पदयात्रा : ११

**थोडेंसें पूर्वी :** सांचीची माहिती वाचकांस सांगण्यापूर्वी प्रथम एक गोष्ट सांगितली पाहिजे; आणि ती गोष्ट म्हणजे मीं उत्तर भारताचा प्रवास दक्षिण भारताच्या प्रवासापूर्वी केलेला होता; व तोहि तीन वेळेस मिळून केलेला होता. हा सुरुवातीचाच प्रवास असल्यानें आणि मजजवळ प्रवासी साहित्य व पैसा यांचा नेहमींच अभाव असल्यानें या तीनहि वेळेस मला फारसें फिरतां आलें नाहीं. मी फक्त तीन महिने फिरलों असेन. वेळेच्या आणि पैश्याच्या बरोबरच मला तिसऱ्या एका गोष्टीची उणीव होती व ती गोष्ट म्हणजे प्रवासाचा अनुभव. पूर्वानुभवाशिवाय फुकटांत प्रवास करूं म्हटलें तर ती फार कठीण गोष्ट असते. प्रवासासाठीं कमालीचे कष्ट सहन करण्याची कुवत व दांडगा मनोनिग्रह लागतो. अशा या प्रवासांत कित्येक वेळीं असे कांहीं बिकट प्रसंग येतात कीं, सांगतां सोय नाहीं. अशा वेळीं आपण जर कणखरपणें वागून, येणाऱ्या संकटास तोंड दिलें नाहीं, तर पुढील प्रवास तर राहोच, परंतु प्राणाचीहि अशा सोडावी लागते. नेपोलियन म्हणत असे, " माणसाला अशक्य असें कांहींच नाहीं. " अशक्य शब्द नेपोलियनच्या शब्दकोशांतच नव्हता. ही गोष्ट सतत समोर ठेवून व चिकाटी आणि साहस यांची कांस धरून जर माणूस वागला, तर खरोखरच त्याला जगांत अशक्य असें कांहींच वाटावयाचें नाहीं. याच एका भांडवलावर मीं माझा सर्व प्रवास

केला आणि पुढेंहि पुष्कळ मोठा प्रवास करण्याची मला उमेद आहे. उत्तर भारतांत वेळेच्या अभावीं मी जास्त फिरलों नाहीं व त्यामुळें मी फक्त इकडचीं कांहीं प्रेक्षणीय स्थळेंच तेवढीं पाहूं शकलों, एवढेंच वाचकांना मला सांगावयाचें होतें. त्यामुळें दक्षिण भारताप्रमाणें मला इतर मजेदार नि चित्रविचित्र चालीरीतींचा अनुभव पाहिजे तसा घेतां आला नाहीं. उत्तर भारतांतील हीं सर्वच प्रेक्षणीय स्थळें जगविख्यात आहेत. कांहीं स्थळांना जगांत तोड नाहीं. न भूतो न भाविष्यति—अशा कांहीं सुंदर नि आकर्षक इमारती उत्तर भारतांत आहेत. त्यांचें वर्णन वाचकांस हमखास आवडेल.

**सांची** : मुंबईपासून सुमारें साडेपांचशें मैलांवर सांची हें एक लहानसें रेल्वे-स्टेशन आहे. मध्य-रेल्वेवरील हें लहान स्टेशन येथील बुद्ध स्तूपामुळें जग-प्रसिद्ध झालेलें आहे.

सांची स्टेशनपासून सुमारें पंधरा मिनिटांच्या रस्त्यावर हा जगविख्यात प्राचीन स्तूप आहे. तो एका मोठ्या टेकडीवर असून पाऊलवाटेनें चालत प्रवाश्यांना या टेकडीपर्यंत जातां येतें. सुमारें पंधरा मिनिटांनंतर समोर सांची गांव व उजव्या हातास टेकडीच्या पायथ्याला एक तलाव लागतो. येथून टेकडीवर जाण्यासाठीं तांबड्यालाल सुरेख दगडांच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. कांहीं पायऱ्या खडकांनाच कोरलेल्या आहेत. टेकडीवर जातांच नवा स्तूप, जुने स्तूप, अनेक प्राचीन इमारतींचे भग्नावशेष एकसमयावच्छेदें-करून दृष्टीस पडतात. महात्मा बुद्धाच्या अस्थीनें पवित्र झालेलें हें स्थळ पाहतांना प्रेक्षकांस जीवित सफल झाल्याचा आनंद होतो. जो प्राचीन नि भव्य आहे, तोच मुख्य स्तूप होय. त्यांतच बुद्धाच्या अस्थि ठेवलेल्या आहेत. त्या स्तूपाच्या चार दिशांस चार उंच नि सुंदर अशीं चार तोरणें उभारलेलीं आहेत. हीं तोरणें म्हणजे सांचीच्या शिल्पकलेचा कळस आहे. त्याचप्रमाणें हीं तोरणें नि स्तूप यांच्या दरम्यान असलेला एक दगडी कठडा हासुद्धां सौंदर्याचा एक अप्रतिम नमुना आहे.

हा कठडा व तोरणें पांढरट भुरक्या रंगाचीं असून लाल रंगाच्या स्तूपाच्या पार्श्वभूमीवर तीं अधिकच सौंदर्यवान् दिसतात. उपड्या वाटीच्या आकाराचा हा स्तूप आज तेवीसशें वर्षें ऊन, वारा, पाणी, पाऊस, थंडी या कशालाहि न जुमानतां उभा आहे. हें पाहून प्राचीन स्थापत्यशास्त्राचें

कौतुक वाटतें. कठडा निव्वळ दगडांचा आहे. एकांत एक दगड खोवणी करून बसवून याचें जोडाईचें काम केलेलें आहे. त्यामुळें त्याचें सौंदर्य साधें, परंतु मनाला भुरळ पाडणारें झालेलें आहे. येथील तोरणें हीं खऱ्या अर्थानें भारतीय शिल्पकलचें तोरण आहे. भारतांतील सर्व प्रवेशद्वारांत इतकें शिल्पकाम केलेलीं सुंदर प्रवेशद्वारें अन्यत्र कोठेंच नाहींत असें म्हणतात. असल्या सौंदर्यपूर्ण प्रवेशद्वारांतून कठड्यांत जातां येतें. स्तूपाभोंवतीं सुमारें चार-पांच फूट जागा सोडून हा कठडा बांधलेला आहे. यास प्रदक्षिणामार्ग असें म्हणतात. यांत चार दिशांस चार सुंदर शालिग्रामाच्या बुद्धमूर्तींसारख्या मूर्ति आहेत. मूर्ति अत्यंत शांत, रमणीय नि भावपूर्ण आहेत. येथून स्तूपाच्या चबुतऱ्यावर चढण्यासाठीं एक मोठा जिना ठेवलेला आहे. या जिन्यानें चढून स्तूपाच्या घुमटापर्यंत जातां येतें. स्तूपांत एका दगडाच्या पेटींत बुद्धाच्या पवित्र अस्थि आहेत. स्तूपांत प्रवेश होतांच एका महामानवाच्या सान्निध्यांत आपण उभे आहोंत, असा एक अनोखा आनंद प्रेक्षकांस अनुभवतां येतो.

माझ्या स्मरणाप्रमाणें स्तूपाच्या दक्षिण बाजूस प्रवाश्यांस थक्क करून टाकणारी एक वस्तु आहे. ही वस्तु म्हणजे अशोकस्तंभ. बेचाळीस फूट उंचीचा, तकतकीत पिवळ्या रंगाचा, अखंड दगडाचा हा स्तंभ होता. आतां तो फुटलेल्या अथवा फोडलेल्या स्थितींत आहे. तरीहि मुळच्याच जागेवर त्याचा सुमारें आठ-दहा फुटांचा अवशेष उभा आहे.

यावरील खांबाचे दोन तुकडे जवळजवळ ठेवलेले आहेत. दगडाचा असूनदेखील हा स्तूप सोनेरी धातूप्रमाणें दिसतो. इतका तो गुळगुळीत आहे. या स्तंभावरील चार सिंह येथील वस्तुसंग्रहालयांत ठेवले आहेत. जिवंत सिंहांची बरोबरी करूं शकतील इतके हुबेहुब नि सतेज ते दिसतात. त्यांची शिल्पकामांतील प्रमाणबद्धता तर माणसाला आश्चर्यानें चकित करून सोडणारी आहे.

सांची स्तूपाचें नि इतर इमारतींचेंच केवळ वर्णन कोणीहि लेखक आपल्या लेखणीच्या सामर्थ्यावर करूं शकेल. परंतु तेथील वातावरणांत एक प्रकारचा मनोहर उल्हासित भास, एक प्रकारें वैराग्याच्या परमानंदाची लागणारी समाधि, त्यामुळें अन्यत्र दुर्मिळ असा मिळणारा विशुद्ध नि सात्त्विक आनंद याचें वर्णन जगांतील क्वचित्‌च लेखकास करतां येणार आहे.

येथें एक नवा स्तूप आहे, याचा इतिहास मनोरंजक आणि उद्बोधक आहे. सांचीच्या या पवित्र स्तूपांतील बुद्धाच्या अस्थि ब्रिटिशांनीं इंग्लंडला नेल्या होत्या. त्या त्यांनीं पुराणवस्तुसंग्रहालयांत ठेवलेल्या होत्या. पुढें येथील बुद्ध भिक्षूंना ही गोष्ट रुचेना. त्यांनीं कोर्टांत दावा लावला आणि त्या अस्थि पुन्हा मिळविल्या. नुकतीच त्या अस्थींची या नव्या स्तूपांत विधिपूर्वक स्थापना करण्यांत आलेली आहे. या नव्या स्तूपाचें उद्घाटन भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं केलें.

अशा प्रकारें येथील या स्तूपाच्या सहवासांत एक दिवस घालवला. मला तो दिवस परम भाग्याचा वाटला. प्रवासाशिवाय असे भाग्यक्षण इतरांना दुर्लभ किंबहुना अलभ्यच आहेत. रात्रीं येथील बुद्ध भिक्षु स्वामी श्री संघ लिस्त यांच्या बरोबर धर्मशाळेंत मुक्काम केला. बौद्ध धर्माविषयीं त्यांच्याकडून खूप खूप माहिती मिळविली. सुमारें आठ तास आम्ही बोलत होतों. रात्रीचे बारा वाजल्यानंतर झोपलों. दुसऱ्या दिवशीं सांची हें पवित्र स्थान सोडून मी इतिहासप्रसिद्ध आग्रा या शहराच्या दिशेनें हिचहायकिंगच्या पद्धतीनें प्रयाण केलें.

**आग्रा :** हें शहर ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें तसेंच तें ताजमहालमुळेंहि जागतिक कीर्तीचें झालेलें आहे. ताजमहाल हा आग्र्याचाच नाहीं तर सर्व भारताला सरताज आहे. हिमधवल रंगाची येथील ही नयनरम्य कलाकृति आणि तिच्यावरील शिल्पकाम पाहतांना प्रेक्षकाचें मनच गुंग होतें. ताजमहालसंबंधीं जगांतील अनेक नामवंत लेखकांनीं लिहिलेलें आहे. भारताच्या कानाकोपऱ्यांत याची कीर्ति आहे. तरीहि यावर दोन शब्द लिहिण्याचा मोह उत्पन्न होत आहे.

कुणीं तरी म्हटलें आहे कीं, एखाद्या यक्षानें जादूची कांडी फिरवून आपल्यासमोर ही अद्भुत अशी इमारत उभी केलेली आहे, असा प्रेक्षकास भास होतो. परंतु मला तर वाटलें, आपण स्वप्नसृष्टींतच वावरत आहोंत. ताजमहाल पाहून आग्रा स्टेशनवर आल्यावर स्वप्नभंग झाल्याप्रमाणें वाटतें. अवर्णनीय, मनोहर आणि चित्ताकर्षक अशी ही इमारत आहे. खरोखर प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज ताजचें सौंदर्य कळणार नाहीं.

ताजची उंची, त्याचा आकार, त्याच्या भोंवतालचे मिनार, त्याच्या पुढील कारंजें, त्यांत दिसणारें प्रतिबिंब, त्याचें प्रवेशद्वार, त्यांतील नक्ष विभाग किंवा हॉल्स, मधल्या हॉलमधील कबरी, तळघर, त्यांतील मुमताजची आणि शहाजहानची कबर, वरील कबरीभोंवतालचा कठडा हें सर्व कांहीं इतकें अद्भुत आणि नवलपूर्ण आहे कीं, त्याचें काय वर्णन करावें हेंच सुचत नाहीं. लेखणी भांबावून जाते. वाचकांनीं आल्या जन्मीं ताजचें एक वेळेस तरी दर्शन घ्यावें, म्हणजे त्यास आपल्या जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटेल. जणू लोलकांच्या थंडगार गोळ्यांची कुशल कारागिरानें बनविलेली ही इमारत आहे असें वाटतें. हिच्या दर्शनानें डोळ्यांचें पारणें फिटतें. येथील लाल किल्लाहि प्रेक्षणीय आहे. मीं तो बाहेरूनच पाहिला. कारण आंत जाऊन पाहण्यास मला वेळच मिळाला नाहीं. मी दोन वेळेस ताजमहाल व हा किल्ला पाहिला. परंतु मी किल्ला पाहण्यासाठीं जाण्याची वेळ नि तो बंद होण्याची वेळ एकच व्हायची. त्यामुळें नाइलाजानें मीं दिल्लीकडे कूच केलें.

**आयुष्यांतील तो दिवस** : हिच हायकिंगच्या पद्धतीनें दिल्ली शहर पाहण्याला मला संपूर्ण चार दिवस लागले. वाचकांस आश्चर्य वाटेल, मी या चार दिवसांत फक्त एकच वेळ जेवण केलें होतें. फार झालें तर एखादा चहा. हवा आणि पाण्यावर अक्षरशः मीं हे तीन-चार दिवस काढले. भारताच्या या प्राचीन आणि अर्वाचीन राजधानींत येईपर्यंत मी अर्धमेला झालेलों होतों. गांधीजी आणि इतर कॉंग्रेस पुढारी वीस वीस दिवस नि तीस तीस दिवस कसा काय उपवास करीत असतील, हें त्यांचें त्यांनाच माहीत. मी राजीखुषीनें माझ्या सर्व आयुष्यांत फक्त एकच उपवास केलेला आहे, आणि तो म्हणजे गांधी-वधानंतर दुसऱ्या दिवशीं. माझी लहानपणीं महात्माजींवर मोठी भक्ति होती. शाळेची परीक्षा पास झाल्यावर इतर माझे सहाध्यायी मारुतीस, गणपतीस अगर विठोबास पेढे वांटतात. मी गांधीजींना नारळ फोडीत असें. या चार दिवसांच्या माझ्या सक्तीच्या उपवासानें माझी खात्री होऊन चुकली कीं, बरेच कॉंग्रेसवाले हे उपवासांत खात्रीनें चोरून फराळ करीत असतील. नाहीं तर मला सांगा ! हे जरासुद्धां न कोमेजतां पंधरा दिवसांच्या उपवासानंतर देखील कसे काय टवटवीत राहतात? छे ! शक्य नाहीं. मी चार दिवसांत भीक मागण्याच्या बेतांत आलों होतों; आणि खरोखरच जर मला पांचव्या

दिवशीं जेवण मिळालें नसतें, तर मीं एक तर भिक्षा मागितली असती, नाहीं तर चोरी तरी केली असती.

**मी गुन्हेगार बनलों** : भुकेच्या पोटांतून जगांत गुन्हे निर्माण होतात, असें म्हणतात तें सार्थ आहे. शंभर नव्हे एकशें एक टक्के खरें आहे. पांचव्या दिवशीं जेवण कसें मिळालें हें सांगणें कदाचित् बरोबर ठरणार नाहीं. कारण वाचक मला असभ्य आणि लबाड म्हणतील. परंतु सत्य झाकून राहात नाहीं व तें तसें झाकणें उचितहि नाहीं. एक मोठें पुठ्याचें खोकें होतें. तें मला रस्त्यावर एका बुकडेपोसमोर सांपडलें. तें कोरें करकरीत व सुरेख रंगाचें होतें. मीं त्यांत रेल्वेलाइनवरील बरीच खडी भरली, तें पक्क्या दोरीनें बांधून टाकलें आणि मोठ्या हॉटेलांत गेलों. जेवण, चहा, पाणी सर्व कांहीं बकासुराप्रमाणें खाल्लें. उपवासानंतर अधाशासारखें फार खाऊं नये, असा एक नियम आहे. तोसुद्धां मीं गुंडाळून ठेवला. सहा रुपये बिल केलें आणि मी सिगारेट आणतों असें सांगून तें वजनदार रंगीत खोकें बाकावर ठेवून बाहेर आलों व थेट पार्लमेंट हाऊस गांठलें. एका ओळखीच्या इसमाची तेथें अचानक गांठ पडली. त्याच्याकडून कांहीं पैसे मिळाले. दुसऱ्या दिवशीं एका नोकरामार्फत मीं त्या हॉटेलचें बिल भागवलें. मालकाला भेटण्याची मात्र हिंमत कांहीं झाली नाहीं.

**कुतुबमिनार** : दुसऱ्या दिवशीं तेथील प्रेक्षणीय इमारती व स्थळें पाहिलीं. यांतील प्रमुख म्हणजे कुतुबमिनार. हा मिनार दिल्लीच्या प्रेक्षणीय स्थळांच्या भांडारांतील एक अमोल रत्न आहे. याचें सौंदर्य कमालीचें बहारदार तसेंच अवर्णनीयहि आहे. त्याची अंधुकशी कल्पना वाचकांस यावी म्हणूनच केवळ चार शब्द लिहीत आहें. दिल्ली शहराच्या बाहेर सुमारें नऊ मैलांवर हा मिनार आहे. दिल्लींतून रोज मोटार बसेस दिल्ली ते मिनार रस्त्यावरून धावत असतात. ते थंडीचे दिवस असल्यानें खूपच कडाक्याची थंडी पडली होती. मी सकाळींच हा मिनार बघण्यासाठीं निघालों होतों. कांहीं युरोपियन प्रवासी याच वेळीं मिनार बघण्यासाठीं निघालेले होते. त्यामुळें आम्हीं एकाच बसमधून प्रवास केला. माझ्या उत्तर भारताच्या व दक्षिण भारताच्या सर्वच प्रवासांत अनेक ठिकाणीं मला युरोपियन प्रवासी भेटले. त्यांचें वर्णन मीं जरूर तेथें केलेंच आहे. दिल्ली शहर मागें टाकतांच मोटार

भरधाव वेगानें धावूं लागते. बाहेर पाहिलें असतां चौफेर शेंकडों प्राचीन इमारतींचे पडझड झालेले अवशेष दृष्टीस पडतात. मोठमोठे दगडांचे ढिगारे, पांढऱ्या मातीचे कोट व ढीग यांचीच सारखी रीघ लागलेली दिसते पूर्वी ही जागा आबाद होती, याची चुकूनसुद्धां कल्पना प्रेक्षकांस येऊं शकणार नाहीं. परंतु दिल्लींचा इतिहास फार प्राचीन आहे, ही गोष्ट लक्षांत घेतां ज्याचा इतिहासाचा व्यासंग मोठा आहे, अशा प्रेक्षकास ही जागा पूर्वी नंदनवन असेल याची कल्पना होते. माझ्या आठवणीप्रमाणें आणि माहितीप्रमाणें इंद्रप्रस्थ व हस्तिनापूर हें या शहराचें प्राचीन नांव होतें नंतर वेळोवळीं दिल्ली शहर जरुरीप्रमाणें सुमारें आठ नऊ ठिकाणीं वसवलें गेलें. एक गोल चक्कर घेऊन आतांचें नवें दिल्ली शहर ठीक पूर्वींच्या इंद्रप्रस्थच्या अगदीं समोर वसलें आहे, असें म्हणतात. आणि त्याचमुळें शहराबाहेर अतोनात दगडांचे ढिगारे दिसतात. आमची बस मिनारसमोर येऊन थांबली, तेव्हां सूर्य चांगला कासराभर वर आलेला होता. अद्याप थंडी होतीच. परंतु हवेंत थोडी ऊब आली होती. आकाश निरभ्र होतें. त्यामुळें सूर्याच्या सोनेरी किरणांत कुतुबमिनारचें सौंदर्य विलक्षण देदिप्यमान होत होतें. मूळचाच हा मिनार रंगीत दगडांचा बांधलेला आहे. त्यामुळें तर विलक्षण सौंदर्य निर्माण झालें आहे. या मिनाराच्या खऱ्याखुऱ्या सौंदर्याची कल्पना येण्यासाठीं खरोखरच तो पुन्हा एकदा तरी पाहावा लागेल, असें सांगावेसें वाटतें. त्याचें स्थूल मानानें पुढीलप्रमाणें वर्णन करतां येईल.

सुमारें दोनशेंचाळीस फूट उंचीचा हा मिनार पांच मजल्यांचा मिळून बनलेला आहे. तळच्या मजल्याचा परीघ सत्तावन फूट आहे. तो वर वर कमी कमी होत जाऊन पांचव्या मजल्यापर्यंत फक्त नऊ फूट होतो. सर्व मिनार तीन प्रकारच्या तांबड्या लाल दगडांचा आणि पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडांचा मिळून बांधलेला आहे. पहिला मजला हा सुमारें शंभर फूट उंच असून तो एक अर्धवर्तुळाकार त्रिकोणी असा सुमारें चोवीस पैलूंचा बांधलेला आहे. याचा रंग अगदीं गर्द तांबडा आहे. दुसरा मजला सुमारें पन्नास फूट उंचीचा असून तो सर्व अर्धगोलाकार पैलूंचा आहे. त्यांत गर्द लाल आणि फिकट तांबडा अशा दोन रंगी छटा भासतात. तिसरा मजला हा सुमारें चाळीस फूट उंचीचा आहे. त्याचे सर्व पैलू त्रिकोणी आहेत.

गर्द लाल आणि फिकट अशा दोन्ही रंगांच्या छटा त्यांत भासमान होतात. चौथा मजला सुमारें पंचवीस फूट उंच आहे. हा मजला मात्र साधा म्हणजे बिनपैलूंचा आहे. तरी देखील हा संगमरवरी दगडांचा असल्यानें अधिकच खुलून दिसतो. पांचवा मजला सुमारें वीस फूट उंचीचा आहे. तो सर्व अर्धगोलाकार पैलूंचा आहे. मात्र हे पैलू फार थोडे आहेत. त्यामुळें इतर मजल्यांपेक्षां याचें हें वैशिष्टयच वाटतें. मिनार चढून जाण्यासाठीं आंतून एक गोलाकार जिना ठेवलेला आहे. त्याला सुबक व चढण्यास सुलभ अशा ३७९ पायऱ्या बांधलेल्या आहेत. वीज पडूं नये म्हणून एक मोठी थोरली तांब्याची पट्टी वरपासून खालपर्यंत आणून तळांत नेऊन सोडलेली आहे.

मिनारवर एकदोघांस चढण्यास सक्त मनाई आहे. याचीं दोन कारणें असावीं. एकदा माणूस मिनारच्या छोटेखानी प्रवेशद्वारांत घुसला नि वर चढूं लागला कीं, चक्रव्यूहांत सांपडल्यासारखेंच होतें. तो सारखा चालतच राहतो. परंतु तेंच तें दृश्य एकाच वर्तुळांत पुनःपुन्हा दृष्टोत्पत्तीस आल्यानें चक्कर आल्यासारखें वाटतें. वास्तविक दरेक फेऱ्यागणिक तो वरवर चाललेला असतो. परंतु त्याच्या लक्षांत ही गोष्ट येतच नाहीं. त्यामुळें माणूस भांबावण्याची शक्यता असते. दुसरा धोका याच्या अफाट उंचीवरून माणूस एकदा निसटला कीं तो खालीं येण्याऐवजीं वर स्वर्गातच जायचा. याच दोन्ही धोक्यांमुळें एकदोघांस वर जाण्याची परवानगी मिळत नाहीं. दारावर एक पोलीस सतत उभा असतो. तो एकदोघांस वर जाऊंच देत नाहीं. मला अर्थातच तीन-चार सोबती मिळालेले होते. त्यांच्या समवेत मी मिनारवर चढलों. हवा येण्यासाठीं दोन पैलूंच्या मध्यें बारीक झरोके ठेवलेले आहेत व दरेक मजल्यावर विश्रांतीसाठीं एक एक चिमुकला सज्जा ठेवलेला आहे वर एकदम टोकावर गेल्यावर दिसणारें सभोंवरचें दृश्य अभूतपूर्व, भव्य नि दिव्य असें दिसतें. अगोदरच दिल्लीचा प्रदेश सपाट, तशांत या अफाट उंचीवरून तर चांगला सुमारें दहा चौरस मैलांचा सपाट नि विस्तीर्ण प्रदेश दृष्टीस पडतो. हें दृश्य पाहून माणूस थक्क होतो. खालीं मिनारच्या तळाशीं तर बघण्याची छातीच होत नाहीं. उंच माणूस देखील लहान माकडाच्या पिल्लासारखा दिसतो. कांहीं लोकांना इतक्या उंचीवरून खालीं बघून भोंवळ येऊन ते पडल्याचींहि उदाहरणें सांगतात. हा मिनार कुतुबुद्दीन ऐबक,

अल्तमश किंवा पृथ्वीराज चव्हाण यांच्यापैकीं चव्हाणानें बांधला कीं पहिल्या दोघांनीं बांधला हा एक अद्याप वादाचा मुद्दा आहे. कांहींहि असो, पण इतका उंच नि सुरेख मिनार बांधण्याची मूळ कल्पनाच मुळीं अचाट आणि रसिकपणाची आहे. हा मिनार म्हणजे भारतांतील एक अमोल वास्तु-रत्न आहे. तें पाहून मी धन्य झालों व खालीं उतरलों आणि दिल्ली शहरा-कडे निघण्याची तयारी करूं लागलों, परंतु लागलीच माझें लक्ष येथील आणखी एका अद्‌भुत गोष्टीकडे वळलें. ही अद्‌भुत गोष्ट म्हणजे येथील भरीव प्रचंड लोहस्तंभ.

**लोहस्तंभ :** हा स्तंभ सुमारें चाळीस फूट उंचीचा आणि दीड-दोन फूट जाडीचा आहे. तो भरीव लोखंडाचा आहे हें याचें वैशिष्ट्य आहे. दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्याचें सुमारें चारपांचशें मणांचें आसपास तरी वजन असावें. एवढा अजस्त्र खांब येथें कसा उभारला गेला हाहि कांहीं लोकांना आचंबा वाटणारा प्रश्न आहे. माझ्या मतें तो कांहीं कठीण प्रश्न नसावा. लोखंड गाळण्याची कला मानवाला बऱ्याच प्राचीन कालापासून अवगत आहे. मग प्रश्न राहतो एवढें अजस्त्र वजन कसें उचललें गेलें ? आणि हाच प्रश्न कांहीं लोक त्रिकट मानतात. मी तो सोपा मानतों. खांब दुसरीकडे तयार करून उचलून येथें आणून उभा करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. तो द्राविडी प्राणायमच ठरला असता. प्रथम पाया खोदून त्यावर पोकळसा सांचा तयार केला असेल, आणि नंतर त्यांत लोखंडाचा रस ओतला असेल. तो थंड झाल्यावर बाहेरील पोकळ सांचा काढून टाकला असेल व लोखंडी स्तंभ उभा राहिला असेल. याच पद्धतीनें तो सुलभ उभा राहूं शकेल. अर्थात् याव्यतिरिक्त जर दुसरा कांहीं खात्रीचा पुरावा असेल तर तो मला माहीत नाहीं. परतु तो निश्चित द्राविडी प्राणायामच म्हणावा लागेल. असा हा अजस्त्र खांब पाहून मीं या जगप्रसिद्ध स्थळाचा निरोप घेतला आणि दिल्ली-कडे कूच केलें.

दिल्ली शहरांत इतक्या प्राचीन आणि सुंदर इमारती आहेत कीं, विजापूर-प्रमाणेंच त्या सर्वांचें वर्णन करूं म्हटलें तर तें अशक्य होईल. म्हणून येथील फक्त प्रमुख स्थळांचेंच वर्णन मी आपल्यापुढें ठेवतों.

**लाल किल्ला :** प्रत्येक स्वातंत्र्य-दिनाच्या दिवशीं या किल्ल्यावरून भारताचे पंतप्रधान जाहीर भाषण करतात, असा गेल्या आठ-दहा वर्षांचा रिवाज आहे. या किल्ल्याचें ऐतिहासिक महत्त्व फार मोठें आहे. आग्र्याचा लाल किल्ला व हा लाल किल्ला यांत सुमारें सव्वाशें मैलांचें अंतर आहे. तरीहि हा किल्ला बघतांच आग्रा रोड किल्ल्याची आठवण होते. या दोन्हींत साम्य असलें तरी फरकहि बराच आहे. हा किल्ला मोठमोठ्या प्रचंड लाल दगडांच्या चिऱ्यांनीं बांधलेला आहे. याचें वैशिष्ट्य व यांतील महत्त्वाचा फरक म्हणजे याचें बांधकाम वरील दगडांनीं उभ्या चिऱ्यांचें केलेलें आहे. त्यामुळें यास सौंदर्य व पक्केपणा आलेला आहे. किल्ल्याचा तट अत्यंत उंच आहे. सुमारें पाऊणशें ते ऐंशी फूट ही उंची असावी. तटाचा परीघ दीड मैलाच्या आसपास असून त्याच्या सभोंवतीं मोठा प्रचंड खंदक आहे. या किल्ल्याचा प्रमुख दरवाजा लाहोरगेट हा आहे. याचें तोंड दिल्ली शहराकडे आहे. या किल्ल्यांत जाण्यासाठीं तीन आणे भरून एक तिकीट घ्यावें लागतें. हें तिकीट घेऊन प्रेक्षक या प्रवेशद्वारांतून आंत जाऊं शकतो. दरवाजा मोठा भव्य आणि शोभायमान आहे. सुमारें चाळीस फूट तरी त्याची उंची असावी व चांगल्या मोठाल्या मोटारी आंत येऊं–जाऊं शकतील इतका तो रुंद आहे. तांबड्या लाल दगडांच्या बुरुजामधून हा रस्ता असून दरवाज्यावर छत्रीप्रमाणें दिसणारे पांढरे शुभ्र घुमट आहेत. त्यामुळें त्याचें सौंदर्य द्विगुणित झालें आहे. या प्रवेशद्वारांतून आंत प्रवेश केला कीं पुन्हा डाव्या बाजूस वळून नगारखान्याच्या भव्य कमानींतून किल्ल्यांत प्रेक्षक जातो. समोर मोठें थोरलें विस्तीर्ण हिरवेंगार मैदान दृष्टीस पडतें. या मैदानांत अत्यंत सुंदर फुलझाडें लावलेलीं आहेत. या हिरवळीवरून थोडें पुढें चालून जातांच मोठा दिवाणखाना दृष्टीस पडतो.

**दिवाण–इ–आम :** हा नेत्रदीपक, भव्य दगडी दिवाणखाना म्हणजेच दिवाण-इ-आम. याच दिवाणखान्यांत जगप्रसिद्ध मयूर सिंहासन होतें असें म्हणतात. अद्यापहि तें ठेवण्यासाठीं केलेलें मोठें दगडी सिंहासन येथें आहे. या सिंहासनावर मयूरासनांत बसून बादशहा दरबार चालवीत असे. मंत्री वगैरेंनीं त्याच्या हातांत खलोटा देण्यासाठीं खालीं एक मोठा संगमरवरी टेबला-सारखा ओटा आहे. यावर उभें राहून बादशहाच्या हातांत खलोटा वगैरे देत

असावेत. दिवाणखान्यास शेंकडों भव्य अखंड दगडाचे खांब आहेत. त्यामुळें त्याच्या भक्कमपणाचा आणि सौंदर्याचा अंदाज प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज येणें अशक्य आहे. या सिंहासनावर बसून दरबारांत मान-सन्मान घेणाऱ्या त्या बादशहाचें दैव शिकंदर नि थोर असलें पाहिजे.

**रंगमहाल :** या किल्ल्यांतील रंगमहाल पाहून तर प्रेक्षक थक्क होतो. संगमरवरी फरशी व रंगीबेरंगी नक्षीकाम पाहून प्रेक्षकांस येथें विश्रांति घ्यावीशी वाटते. परंतु इतरहि अनेक गोष्टी पाहण्यासारख्या असल्यानें वेळ पुरत नाहीं.

ही बादशहाची ऐशआरामाची नि विश्रांतीची जागा होय. येथून समोर यमुना नदीचा सुंदर निळसर काळ्या रंगाचा प्रवाह दिसतो. या बाजूनें किल्ल्याचा तट किंचित् कमी उंचीचा आहे. नदीचें नैसर्गिक संरक्षण असल्यानें तो असा असावा असें मला वाटतें. दिवाण-ई-खास, हमामखाना, संगमवरी मोत्यासारखी तेजस्वी व मनोहर मोती मशिद अशा एकापेक्षां एक वरचढ इमारती यांत आहेत.

किल्ल्यांत एक पुराण-वस्तुसंग्रहालय आहे. यांतील अनेक वस्तु प्रेक्षणीय आहेत. बादशहाचें व त्याच्या राणीचें तलम वस्त्र पाहून प्रेक्षक गुंग होऊन जातो. हें म्यूझियम पाहून मी येथील प्रसिद्ध जुम्मा मशिद पाहण्यासाठीं किल्ल्याच्या बाहेर पडलों.

**जुम्मा मशीद :** ही भारतांतील सर्वांत मोठ्या मशिदींत गणली जाते. ती तांबड्या लाल दगडांची बांधलेली आहे. मशिदीचे घुमट संगमरवरी दगडाचे बांधलेले आहेत. इतकी भव्य नि सुंदर मशिद माझ्या पाहण्यांत नाहीं. विजापूरच्या मशिदी शिल्पकामाच्या दृष्टीनें श्रेष्ठ असल्या तरी त्या इतक्या भव्य नाहींत. अशा प्रकारें दिल्ली येथील अनेक स्थळें पाहतांना अपूर्व आनंद प्रवाशास होतो. बिर्ला मंदिर, पार्लमेंट हाऊस, राजघाट ( गांधीजींची समाधी ) अशीं कितीतरी रम्य नि भव्य स्थळें येथें आहेत ! तीं सर्व पाहून मी येथून माझ्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें निघालों आणि थेट हिमालय गांठला.

**थोडें हिमालयदर्शन :** पठाणकोट हें दिल्लीपासून सुमारें साडेतीनशें मैलांवरील काश्मिरच्या सरहद्दीवरील सर्वांत मोठें नि शेवटचें शहर आहे.

मैलांचे आंकडे मी शक्य तितके देत नाहीं. वाचकांस चार आण्यांचें रेल्वे टाइम टेबल घेऊनहि भारतांतील सर्व ठिकाणांचें शहरांशहरांतील अंतर सहज समजेल. या पठाणकोटपासून मी मोटारनें नेरपूर या खेडेगांवीं गेलों. हिमालयांत वसलेलें हें छोटेसें गांव आहे. येथून मी हिमालयांत खूप खूप भटकलों.

हिमालयाचें वर्णन अनेक प्राचीन आणि अर्वाचीन कवींनीं व लेखकांनीं केलेलें आहे. तो आहेच तसा सुंदर. आल्या जन्मीं हिमालयाचें दर्शन घेतल्याशिवाय मरणारा मनुष्य अभागीच समजला पाहिजे. आकाशाला भिडलेलीं त्याचीं तीं उत्तुंग शिखरें पाहून या-पलीकडे जगच नाहीं असें वाटतें. जर का हिमालयावर सुंदर, नयनरम्य नि थंडगार बर्फ सतत नसतें, तर मात्र त्याचें तें काळें कुळकुळीत नि विराट् रूप पाहून प्रेक्षकांची भीतीनें गाळण उडाली असती; परंतु बर्फामुळें तो आल्हाददायक नि सुखकर वाटतो. निसर्गाचा भव्यपणा हिमालय पाहिल्याशिवाय अजमावतां येत नाहीं. माणसाची मति जेव्हां कुंठित होते तेव्हां त्याचा बुद्धिवाद संपतो व तो दैववादी बनतो. परमेश्वराची भ्रामक कल्पना यांतूनच उगम पावली असावी असें मला वाटतें. मी हिमालयांत इतका भटकलों कीं, कधींहि आजार माहीत नसलेला मी आजारी पडलों. अन्न गोड असलें तरी तें बेतानें खावें हा नियम मी विसरलों. हिमालयाच्या सृष्टिसौंदर्याची मीं इतकी लूट केली कीं, परिणामीं आजार पत्करावा लागला. परंतु फारच लवकर मी या आजारांतून बरा झालों. हिमालयाचें दर्शन ही माझ्या आयुष्यांतील अविस्मरणीय घटना आहे. त्याचे दिवसांतून बदलणारे ते तीन रंग पाहून तर मी देहभान विसरत असें. सकाळीं तो रुपेरी रंगाचा दिसे, तर दुपारीं तो शान्त व दुधासारखा पांढरा भासे संध्याकाळीं तर जसे सुवर्णाचेच पर्वत चौफेर दिसत. सत्य सृष्टींत आपण हिमालय पाहात आहोंत याच्यावर माझा भरंवसा बसेना. मीं अंगाला एक जोराचा चिमटा घेऊन पाहिला, तेव्हां हाताला जखम होऊन रक्त बाहेर आलें. मग मात्र आपण सत्य सृष्टींतच आहोंत याची जाणीव झाली. आजपर्यंत जगाला कंटाळलेले सर्वच महात्मे येथें घेऊन निसर्गाचें हें नंदनवन पाहून चकीत झाले आणि त्यांनीं परमेश्वराचें ध्यान करण्यास या रम्य जागेंत आपलें उर्वरित आयुष्य व्यतीत केलें. वाचकहो, खरोखर तुम्हांला माझी प्रेमाची विनंती आहे कीं, तुम्ही एकवार तरी कोणत्याहि निमित्तानें घर

सोडाच. 'उंबरघाट' ओलांडला कीं तुम्हांला हिमालय ओलांडणें अशक्य नाहीं. माझें हें पुस्तक वाचून जर वाचकांस हिमालय पाहण्याची इच्छा झाली, तर माझा उद्देश सफल झाला असेंच मी मानीन..

● ● ●

# महाराष्ट्रांतील अपूर्व शिल्पदर्शन : १२

**वेरूळ व अजंठा :** वेरूळ व अजंठा हीं लेणीं म्हणजे भारताच्या गत-वैभवाचें मूर्तिमंत स्मारक आहे. शिल्पकलेचा तो अद्वितीय मासला आहे. भारताच्या प्राचीन संस्कृतीचें हें फार मोठें ग्रंथभांडार आहे. कलेचें माहेरघर, कलावंतांचें श्रद्धास्थान आणि प्रेक्षकांचें स्फूर्तिस्थान आहे. कला, ज्ञान आणि मनोरंजन यांचा त्रिवेणी संगम म्हणजेच वेरूळ आणि अजंठा येथील जग-प्रसिद्ध लेणीं. हीं बघण्याचा योग मला तिसऱ्या सफरींत आला. वाचकांना महाराष्ट्रांतील या अमोल ज्ञानभांडाराचा व त्याच्या उज्ज्वल परंपरेचा थोडक्यांत परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे. तो कितपत साधला आहे हें आतां वाचकांनींच ठरवावें.

नासिकहून मनमाडमार्गें औरंगाबादपर्यंत रेल्वेनें प्रवास केल्यावर आपण वेरूळच्या अगदीं नजीक येऊन ठेपतों. येथून वेरूळपर्यंत मोटारी मिळतात. मला औरंगाबादपासून एक टॅक्सी विनामूल्य मिळाली होती. उस्मानाबाद जिल्ह्यांतील कांहीं पहेलवान मंडळी येथील बिबिका मकबरा ही प्रसिद्ध इमारत बघत होती. ही इमारत ताजमहालची छोटी प्रतिकृतिच आहे. किंबहुना या इमारतीस दक्षिणेकडील ताजमहाल असेंहि म्हणतात. येथें एक मोठी मौज झाली, आणि त्यामुळेंच मला दौलताबाद, वेरूळ, घृष्णेश्वरपर्यंत मोफत टॅक्सी मिळाली. ती मौज अशी–बिबिका मकबरा या इमारतीच्या जवळचा

एक छोटेसें पुराणवस्तुसंग्रहालय आहे. त्यांत औरंगजेब बादशहाचा लाल मखमलीचा तंबू, त्याचा नमाज पढण्याचा गालीचा, जेवणाचीं सोन्याचांदीचीं भांडीं, पालखी वगैरे वस्तु प्रामुख्यानें आहेत. जेवणाच्या ताटावर झांकण ठेवण्याचें जें सोनेरी भांडें आहे, त्याचा आकार कांहींसा पूर्वीच्या सैनिकाच्या डोक्यावरील चिलखती टोपासारखा आहे. हीं भांडीं पाहतांना या पहेलवानांपैकींच एक आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, "क्या जवान ये उस टाईम के ? देखो, उनका सर कितना बडा था । वा खूब !" हे त्याचे उद्‌गार ऐकून मला मोठ्यानें हसू कोसळलें. त्या गृहस्थास माझा राग आला असावा. डाव्या हातावरील तंबाखूम उजव्या अंगठ्यानें अधिकच जोरानें मळीत तो मला हसण्याचें कारण विचारूं लागला. मीं चुकीबद्दल त्याची माफी मागितली आणि खरें तें त्याला सर्व समजावून सांगितलें. त्यामुळें त्याचा रागानें चढलेला पारा खालीं उतरला. तो म्हणाला, "बडे दिमागवाले आदमी हो तुम !" त्यावर मी त्याला म्हणालों, "यांत कांहीं विशेष नाहीं. हा माझा धंदाच आहे." तो पहेलवान माझ्यावर बेहद्द खूश झाला. मला त्यानें वेरूळपर्यंत त्याच्याच टॅक्सींत घेतलें. माझें जेवण, चहा, पानसुपारी सर्व कांहीं त्यानेंच केलें हें सांगणें नकोच.

**दौलताबाद किल्ला :** वेरूळच्या रस्त्यावर औरंगाबादपासून सुमारें पांच मैल अंतरावर हा प्रसिद्ध प्राचीन डोंगरी किल्ला आहे. रामदेवराव व शंकरदेवराव यादव आणि महंमद तघलख या इतिहासप्रसिद्ध लोकांपासून याचा इतिहास उपलब्ध आहे. सुडीच्या आकाराचा हा अत्यंत प्रचंड व मजबूत असा किल्ला आहे. नैसर्गिक रीत्याच संरक्षणास योग्य असा ह्या डोंगराचा आकार आहे. त्यांतून या किल्ल्यास अधिक संरक्षणक्षम बनविण्यासाठीं तटबंदी करून उंच उंच कडे तोडून खोलच खोल असा प्रचंड खंदक तयार केलेला आहे. हा खंदक सुमारें दीडशें ते दोनशें फूट खोल आहे. आजहि या खंदकावरून जाण्यायेण्याचा जो लाकडी छोटासा पूल आहे तो काढून टाकला तर वर जाणें अशक्य गोष्ट आहे.

प्रथम बाहेरच्या तटबंदींतून आंत जातांच शत्रूवर तोफांचा प्रचंड मारा करतां यावा यासाठीं जागोजाग बांधलेले मोर्चे आणि ठिकठिकाणीं ठेवलेल्या अतोनात तोफा पाहून प्रेक्षक थक्क होतो. येथून थोडें पुढें जातांच चांदमिनार

हा भारतांतील दुसऱ्या नंबरचा उंच मिनार दृष्टीस पडतो. कुतुबमिनार-पेक्षां याचें बांधकाम हें संपूर्णपणें निराळ्या धर्तीचें आहे. तांबड्या रंगाचा आणि जागोजाग छत्रीप्रमाणें किनार असलेला हा मिनारहि कमी सुंदर नाहीं. यावर चढून किल्ला पाहण्याची मौज येते. हसन गंगू बहामनी याच्या स्मरणार्थ हा मिनार बांधलेला आहे. येथून बरेंच वर चढून गेल्यावर या किल्ल्यांतील प्रसिद्ध असा हा खंदक लागतो. खंदक पाहून प्रेक्षक आश्चर्य-चकित होतो. पण याहीपेक्षां आश्चर्यकारक दुसरें ठिकाण म्हणजे किल्ल्याचें भुयारी प्रवेशद्वार. किल्ल्यावर चढण्यासाठीं हेंच एकुलतें एक प्रवेशद्वार आहे.

**किल्ल्यांतील पांच गुप्त मोक्याचीं ठिकाणें :** या प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर किल्ल्यांतील गुंतागुंतीच्या वाटांची आणि किल्ल्याच्या अभेद्यपणाची खरीखुरी कल्पना येते. अंधाऱ्या आणि फसव्या वाटा अनेक आहेत. त्यांतून वर जाणें शत्रूस प्राणसंकटाहून कमी सोपें काम नाहीं. प्रेक्षकास आजहि मशाली लावून त्या प्रकाशांत वर चढावें लागतें. शत्रूवर तुफानी आणि चौफेर हल्ला करतां येण्यासाठीं यांत अतोनात युक्त्या वापरलेल्या आहेत. उदा० मार्गानें चालतां चालतां मध्येंच एका वाटेस दोन वाटा फुटतात. यांतून कोणता मार्ग धरावा याचा अंदाज प्रेक्षकास आजहि बांधतां येत नाहीं. यांपैकीं एक वाट वर्तुळाकार वळण घेऊन पुन्हा पहिल्यांच जागेवर येते. या वाटेंतून शत्रु जिवंत राहणें हें अशक्यप्राय काम आहे. या वर्तुळाकार वाटेस भुलभुलैया असें नांव आहे. शत्रूस येथें पांच मोठमोठ्या प्राणघातक संकटांत टाकलें जाई. एका वाटेस फुटलेल्या दोन वाटां-पैकीं निश्चित कोणती वाट वर जाते, याचा थोडा तरी विचार शत्रु करणारच ! त्यासाठीं तो थोडासा गोंधळून येथें उभा राहणें स्वाभाविक आहे आणि नेमकी ही संधि साधून याच जागेवर पडेल अशा बेतानें वरून कढत तेल ओतण्याची व्यवस्था केलेली आहे. हा पहिला प्राणघातक हल्ला. यांतून कांहीं बचावलेले लोक जर भुलभुलैया रस्त्यानें गेले तर त्यांची चाहुल लागावी म्हणून अंधारांत जागोजाग खड्डे खोदलेले आहेत. त्यावर शत्रु ठेंचाळतांच त्यांच्यावर ठेवलेल्या भुयारी मार्गांतून पिसाट व निवडक सैनिक बाणांचा पाऊस पाडीत. हा दुसरा जबरदस्त आघात. यांतून कोणी शिकंदर नशिबाचा सैनिक वांचलाच तर तो वर्तुळ पूर्ण करून पुन्हा मूळच्या जागेवर

येऊन वरून ओतलेल्या कढत तेलाच्या कढईमुळें गारद केला जाई. हा तिसरा प्रहार. एवढ्यांतून जवळ जवळ कोणीहि शत्रुसैनिक वांचत नसे आणि जर समजा एखादा वांचला, तर तो पुन्हा वर जाण्याचा प्रयत्न करणारच. कारण मागें फिरण्यास जागाच नाहीं. मागें परतण्याचें दार इतकें लहान बोगद्या-सारखें आहे कीं, प्रथम त्यांतून मान बाहेर काढावी लागते. आणि किल्ल्याचे संरक्षक तर याच संधीची वाट पाहात बाहेर उभे असतात. मान बाहेर येते न येते तोंच तलवारीच्या फटकऱ्यानें ती धडापासून वेगळी होई. तेव्हां शत्रूस वर जाणेंच भाग पडे. वर जाण्यासाठीं त्यानें दुसरा मार्ग जर धरला तर तो वर जाण्याचा मार्ग नसून फसवा मार्ग असे. तेथून निसटून शत्रु पूर्ण दोनशें फूट खोल खंदकांत कोसळला जाई. हा चवथा प्रहार. आतां एवढेंहि करून यानंतर मागाहून आलेले सैनिक शहाणे झाले आणि त्यांना ही गोष्ट माहीत झालीच, तर वर ठेवलेलें दार बंद केलें जाई. हें दार मोठ्या थोरल्या लोखंडी तव्यानें बंद केलें जात असे. मागें पुढें सरकविण्याची त्यांत सोय केलेली आहे. मिरच्यांचीं शेंकडों पोतीं पेटवून एका पाठोपाठ एक जळतें पोतें आंत टाकून हा तवा बंद केला जाई. शत्रु मांजराप्रमाणें तडफडून मिरच्याच्या धुरांत गुदमरून मरून पडत असे. असा हा पांचवा आणि अखेरचा वार ! एवढ्या दिव्यांतून जो कुणी जाईल तो किल्ला जिंकण्यांत विजयी होईल असें वाचकास वाटेल. परंतु छे ! वर गेल्यावर मैदानांत जंगी लढाई होणारच ! ती जिंकल्याशिवाय किल्ला हस्तगत होणें अशक्यच. असा हा अभेद्य आणि अजिंक्य किल्ला आहे. वर बारादरी व राजवाडा आहे. तींत शाही घराण्यां-तील लोक राहात. येथून खालीं पाहिलें तर माणूस बाहुलीपेक्षांहि लहान दिसतो. तब्बल दोन ते तीन तास चढण्यांतच खर्च होतात. आम्ही खूप जलद चढलों होतों. कारण बरोबर सर्व पहिलवान होते ना ! त्यांची येथें मात्र सरशी झाली. वर जाईपर्यंत त्यांनीं मला थकवून टाकलें होतें. तीन तासांत आम्ही चढून उतरून आलों. किल्ल्यावर कांहीं पहाडी मुलामुलींचा एक सुंदर नाचगाण्याचा कार्यक्रम झाला. पहिलवान मंडळींनीं त्यांना सात रुपये मोबदला दिला. अर्थातच मला तो मोफत बघतां आला हें नव्यानें सांगणें नकोच. एवढ्या उंचीच्या या किल्ल्यावर पिण्याच्या स्वच्छ पाण्याचे प्रचंड हौद आहेत. त्यांत बाराहि महिने चांगलें स्वच्छ आणि थंड पाणी असतें. तें

मीं स्वतः पिऊन पाहिलें आहे. किल्ल्याच्या वरच्या टोकांवर निशाण-बुरूज आहे. तेथें पूर्वी निशाण लावलें जात असे. त्याच्या जवळच एक प्रचंड तोफ आहे. शत्रूचें निशाण तेथें फडकलें तरच समजायचें कीं, किल्ला जिंकला गेला. असा हा अंगांत वीरश्री निर्माण करणारा दुर्भेद्य पहाडी किल्ला पाहून आम्हीं वेरुळचा मार्ग धरला.

**शिल्पकलेचा कळस :** वेरुळला लहानमोठ्या तीसपस्तीस लेणीं किंवा गुंफा आहेत. सुमारें एक मैल लांबीच्या डोंगरांत क्रमाक्रमानें या तीस-पस्तीस गुंफा खोदलेल्या आहेत. वेरुळच्या या डोंगरांत जातांच तो जणू बोलूं लागतो. पाषाणांतील जिवंतपणा, ज्ञान, कला आणि भक्ति यांचा हा अमोल ठेवा पाहून आनंदातिशयानें प्रेक्षक देहभान विसरतो. एकेका गुहेच्या शिल्पकामाचें वर्णन करणें अशक्य आहे. कागदावर लेखणीनें लिहिणें हें जर एवढें अवघड काम आहे, तर मग छन्नी-हतोड्यानें काळ्या पाषाणा-वर जिवंत कलाकृति निर्माण करणें हें काम किती अवघड असेल याचा कयास वाचकांनींच बांधावा. पाषाणांत जीवनाचें मधुर संगीत निर्माण करणाऱ्या त्या भारताच्या सुपुत्रांचो धन्य आहे. या कलावंतांनीं वेरुळच्या लेण्यांत आपली सर्व कला ओतली आहे. त्यांच्या या कलाकृतीचा कळस म्हणजेच येथील कैलास लेणें. नेत्रदीपक, चितथरारक, भव्य नि दिव्य असें हें मंदिर डोंगर फोडून अलगद हळुवार हातानें काढलेलें आहे. जणू कांहीं निसर्गनिर्मित मूळचेंच सुंदर आणि गगनचुंबी मंदिर या डोंगरांत होतें आणि कलावंतांनीं तें हुडकून काढून हळूच त्यावरील दगडाचें आच्छादन झाडून काढलें. खरोखरीच पुनरावृत्तीचा दोष पत्करूनहि मला हें पुन्हा एकवार सांगावेसें वाटतें कीं, याचें वर्णन करणें अशक्यप्राय काम आहे. तें वाचकांनीं स्वतःच जाऊन पाहावें. त्यांत त्यांना आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं असें मी स्वनुभावानें सांगतों. असें हें शोभायमान लेणें पाहून येथून जवळच पायथ्याला सुमारें एक मैल अंतरावर असलेलें प्रसिद्ध घृष्णेश्वराचें मंदिर पाहून आम्ही पुन्हा औरंगाबादेस परतलों. कारण अजिंठ्यास जाण्यासाठीं पुन्हा येथें येणें जरूर असतें. मधून जाण्यास मोटार अथवा साय-कलचा मार्ग नाहीं. वाटेंत सर्वत्र आडवा पर्वत पसरला आहे. औरंगाबाद तें अजिंठा हें सुमारें चौसष्ट मैल अंतर आहे.

**अजिंठा-चित्रकलेचा कळस :** वेरूळ शिल्पकामाच्या दृष्टीनें जगांत अजोड आहे, तर अजिंठा शिल्पकाम, रंगकाम आणि चित्रकला याच्या दृष्टीनें जगांत बिनतोड आहे. अजिंठ्याच्या या सौंदर्यांत येथील अद्भुत शांतता आणि वनश्रीनें अमोल भर टाकलेली आहे. त्यामुळें प्रथमदर्शनींच प्रेक्षकाचा ग्रह अनुकूल होतो. मुख्य रस्त्यापासून आंत डोंगरामागें तीन-चार मैल अंतरावर जंगलांतील एका प्रशस्त पहाडांत हीं लेणीं कोरलेलीं आहेत. वाघेरा नांवाची एक नदी मोठ्या कड्यावरून सात टाक्यांतून आदळत, टप्प्याटप्प्यानें खालीं पडते.

नंतर ती एक चंद्राकृति वळण घेऊन पुन्हा पुढें जाऊन लेण्याच्या डाव्या बाजूस वळून आपला मार्ग क्रमीत सळसळ करीत निघून जाते आणि अजिंठ्याच्या सुमारें चोवीस गुंफा याच चंद्राकृति नदीप्रमाणें तिला समांतर अशा चंद्राकृतीच कोरलेल्या आहेत. किंबहुना, त्या किंचित् नालाकृति आहेत. एक नंबरच्या गुहेसमोर प्रेक्षक उभा राहिला तर त्याला चोविसावी गुहा त्याच्यासमोर दिसते. एकीपेक्षां एक भव्य आणि सुंदर अशा या गुहा आहेत. या लेण्यांचा इतिहास उद्बोधक तसाच अद्भुतहि आहे. विलक्षण योगायोगामुळेंच त्या जगासमोर येऊं शकतात. एरवीं त्या कोण जाणे किती दिवस माणसास अज्ञात राहिल्या असत्या ! मजेदार इतिहास असा आहे :

बुद्धाच्या महानिर्वाणानंतर त्याच्या अस्थि ठिकठिकाणीं त्याच्या शिष्यगणानें वांटून घेतल्या. त्यावर ठिकठिकाणीं अनेक स्तूप बांधण्यांत आले. त्यांपैकींच येथील लेण्यांतहि कांहीं स्तूप व कांहीं चैत्य ( बौद्ध प्रार्थनामंदिरें ) आहेत. कांहीं विद्वान् लोक असा कयास बांधतात कीं, सहाव्या शतकाच्या आरंभीं बौद्ध धर्माचा भारतांत ऱ्हास होऊं लागला. कांहीं दिवसांनीं बौद्ध धर्म संपुष्टांत येतो कीं काय, असा त्या धर्माच्या धर्माधिकाऱ्यांना व अनुयायांना प्रश्न पडला आणि म्हणून बौद्ध धर्माचें अस्तित्व व महत्त्व माग राहावें या हेतूनें प्रचंड आणि कलाकौशल्ययुक्त शिल्पकाम हातीं घेण्यांत आलें. हें काम अनेक शतकें चाललें होतें. वाचकहो, विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सात-आठ शतकांत कलावंतांच्या किती पिढ्या झाल्या असतील ? तरीदेखील अजिंठा व त्यावरील कलाकृति ही एका वेळीं आणि एकाच विचारवंतानें आंखलेल्या आराखड्यानुरूप झालेली आहे असें वाटतें, प्रमाण-

बद्धता असून देखील कमालीचा भव्यपणा या कामांत आहे. नाजूक कुंचल्याचे हळुवार हात जसे भिंतीवरून फिरलेले आहेत, तसेच टाकीचे आणि घणांचे प्रचंड घावहि या पर्वतानें झेललेले आहेत. अशा प्रकारें अनेक शतकांच्या मेहनतीनें निर्माण झालेलें सौंदर्यस्थान कोण जाणे केव्हांपासून आणि कशानें बंद झालें! तें ब्रिटिश राजवटीपर्यंत भारतवासीयांना अज्ञात होतें; आणि कांहीं लोक तर म्हणतात कीं, यामुळेंच भारतीय कलेचा हा अमोल ठेवा सुरक्षित राहिला. एरव्हीं मोगल राजवटींत अंध धर्मद्वेषामुळें ती नाश पावली असती. हें खरें असो कीं खोटें, परंतु जर का असें झालें असतें, तर अनेक शतकांच्या लाखों कलावंतांच्या सर्व मेहनतीवरच पाणी पडलें असतें, आणि भारत व जग या अमोल कलाकृतीला पारखें झालें असतें.

**लेणीं प्रकाशांत कशीं आलीं?** : अशीं हीं लेणीं ब्रिटिश राजवटींत लढाईच्या धामधुमींत जगापुढें अचानकपणें उघड झालीं. ती कथा अशी सांगतात कीं, एक पराजित ब्रिटिश लष्करी तुकडी या डोंगराच्या आश्रयानें लपून राहिलेली होती. रात्रीच्या वेळीं निवारा म्हणून ते यांपैकीं सर्वांत उंच जें चैत्य आहे, त्याच्या गुहेंत अजाणतेपणानें घुसले. त्यांना वाटलें ही नैसर्गिकच गुहा आहे. कारण, तिचा फारच थोडा भाग उघडा होता. परतु आंत एक प्रचंड दगडाचा खांब आणि त्यावरील सुंदर शिल्पकाम पाहून त्यांनीं ही मानवनिर्मित गुंफा आहे हें ओळखलें. पुढें हीं गोष्ट अनेक विद्वानांस समजली. एका ब्रिटिश साहेबानें दुर्बिणीच्या साहाय्यानें हाच चैत्याचा भाग पाहिल्यामुळें हें सत्य जगापुढें आलें असेंहि म्हणतात. नंतर सरकारनें आणि हैद्राबादच्या निजामानें क्रोडों रुपये खर्चून येथील मातींत पडलेला भाग तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं उकरून काढला व तो साफसूफ केला. हें काम फार अवघड होतें. कारण भिंतीवरील अनेक उच्च दर्जाचीं चित्रें मातीनें ओलसर झालेलीं होतीं. अशा वेळीं तीं खराब न करतां जशींच्या तशीं ठेवून अत्यंत हळुवारपणें माती काढून घेणेंहि मोठें नाजूक व जिकिरीचें काम होतें. परंतु तें यशस्वीपणें पार पाडण्यांत आलें. लाखों रुपये खर्चून जंगलांतून एक सुंदर रस्ता इथपर्यंत काढला आणि पुढें सरकारच्या पुराणवस्तु खात्यानें तें आपल्या देखरेखीखालीं ठेवून घेतलें. ब्रिटिशांनीं भारतांत केलेल्या कांहीं चांगल्या गोष्टींपैकीं ही एक गोष्ट केली, हें कुणालाहि कबूल केलें पाहिजे.

२६५४०८ भू-प्रवास २३।३।६०

अशा प्रकारें पुन्हा ही भारताची कीर्ति वाढविणारी कलाकृति जगासमोर मोठ्या डौलानें आली. येथील सर्वच गुंफा प्रेक्षणीय असल्या तरी यांपैकीं चार-पांच गुंफा ह्या अत्यंत कौशल्यपूर्ण आहेत. अजिंठ्याच्या चित्रकलेचें वैशिष्ट्य हें आहे कीं, डोंगरांतील दगडी भिंतीवर शेण, माती आणि गवताच्या वस्त्रगाळ मिश्रणाचा गारा करून त्याचा गिलावा केलेला आहे. निरनिराळ्या वनस्पतींपासून रंगीत पानें, आणि दगडापासून निरनिराळे सुंदर रंग तयार केलेले आहेत. सुमारें पंधरा-सोळाशें वर्षांपूर्वीं काढलेलीं हीं चित्रें आजहि तितकींच सुंदर आणि तेजस्वी दिसतात. ढोबळ मानानें वर वर पाहतां प्रत्येक गुंफेंत साम्य दिसतें. एक मोठा सभामंडप, त्याच्या दुतर्फा बौद्ध भिक्षूंना ध्यानस्थ बसण्यासाठीं काढलेल्या खोल्या आणि मध्यभागीं भिंतीला बुद्धाची भव्य दगडी मूर्ति, हें सर्व साधारणपणें प्रत्येक गुंफेंत सारखेंच वाटतें. तरीहि त्यांत पुष्कळ फरक निरीक्षण केल्यानंतर आढळतो. एक दोन गुंफा पाहतांच प्रेक्षक आश्चर्यानें थक्क होतो. शिल्पकलेचा ज्याचा थोडा फार अभ्यास आहे त्यास तर अजिंठ्याच्या कलाकृतीचें कौतुक वाटेलच, परंतु अगदीं नवख्या व अडाणी प्रेक्षकासहि अजिंठा पाहून कौतुक आणि आनंद वाटतो.

**बुद्धाची मूर्ति** : नमुन्यादाखल एकच मूर्ति पाहू. ही मोठी थोरली भव्य अशी बुद्धाची मूर्ति आहे. बुद्धाच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ही ध्यानस्थ स्थितींत बसलेली आहे. परंतु या मूर्तीच्या चेहऱ्यावर बुद्धाच्या आयुष्यांतील तीन महत्त्वाचे प्रसंग चित्रित केलेले आहेत. हें निरीक्षक प्रेक्षकाच्या ताबडतोब ध्यानांत येतें. ते तीन प्रसंग असे : जगांतील दुःख पाहून दुःखी आणि चिंताक्रांत झालेला बुद्ध, त्यांतून मुक्ततेचा मार्ग सांपडल्यानंतर होणारा आनंद आणि त्यामुळें शेवटीं लाभलेली शुद्ध चिर शांतता. हे तीन प्रसंग बुद्धचरित्रांत प्रमुख स्थानीं आहेत. हेच मूर्तीच्या डावीकडून, उजवीकडून आणि समोरून पाहिलें असतां भिन्न भिन्न प्रकारें अत्यंत स्पष्टपणें दृग्गोचर होतात. शिल्पकलेंत अशा प्रकारच्या एकाहून एक वरचढ गोष्टी येथें प्रेक्षकास पाहतां येतात. उदा० चार हरणांना एकच तोंड. तें कोणत्याहि हरणास कल्पनेनें जोडलें कीं वेग-वेगळ्या पोजमध्यें तें प्रत्येक हरणास शोभून दिसतें. तसेच झुंज खेळणारे बैल ! झुंज घेतांना निरनिराळ्या स्नायूंवर कमीजास्त ताण पडून ठिकठिकाणीं आलेला

१०७९९

फुगीरपणादेखील या चित्रांत बिनचूक चित्रित केलेला आहे. अशा कितीतरी गोष्टींची शिल्पकृति निरीक्षण करून सूक्ष्म रीतीनें तयार केलेली आहे.

**पद्मपाणि बुद्ध :** अजिंठ्याची चित्रकला ही जगांतील प्राचीन शिल्पकलेंत आणि चित्रकलेंतही सर्वश्रेष्ठ समजली जाते. चित्रकलेचा नि रंग शास्त्राचा माझा अभ्यास मुळींच नाहीं. शिल्पकलेसंबंधीं मात्र मला थोडेंफार माहीत आहे. परंतु या दोन कला पुष्कळच भिन्न आहेत. तरीसुद्धां येथील पद्मपाणी हें चित्र पाहून मी थक्क झालों. या चित्रांतील सौंदर्य, डौलदारपणा, भावना व प्रमाणबद्धता अवर्णनीय, सुंदर नि हुबेहुब आहे. या चित्रांत निळ्या रंगास फार महत्त्व आहे असें म्हणतात. त्याशिवाय चित्राची पार्श्वभूमि चित्रकारास नीटपणें साधत नाहीं; परंतु हा रंग पूर्वी तयार करतां येत नव्हता. त्याच्या अभावामुळें अर्थातच चित्रें सुंदर होणें म्हणजे कठीण काम होतें, परंतु अंजिठ्यांतलि चित्रें कलावंतांनीं उगीच निराळ्या मार्गानें भरून काढलीं. त्यांनीं हिरवा रंग या कामीं वापरला आणि या रंगाच्या पार्श्वभूमीवर खुलतील असे दुसरे रंग चित्रासाठीं वापरले आणि आपला मार्ग सोपा केला. हे रंग माती, दगड, वगैरेंपासूनहि बनविले जात होते. मातीच्या खवल्याच्या वस्त्रगाळ मिश्रणानें रंगाला एक प्रकारची विलक्षण चमक आलेली आहे. चित्राच्या गळ्यांतील रंगीत हार हा पांढरा शुभ्र खरोखरीचाच हार गळ्यांत घातलेला आहे, असा भास होतो. असे चमत्कार व प्रसंग तर या चित्रकलेंत अनेक चित्रित केलेले आहेत. गुंफा अत्यंत मोठाल्या आहेत. त्या अर्थानें त्यांना गुंफा म्हणणेंहि योग्य नाहीं. जणू राजवाड्यांतील भव्य दिवाणखानेच ! याच्या शिल्पकामांतहि कमालीचा आश्चर्यकारकपणा भरलेला आहे. कापडाच्या हालत्या मंडपाप्रमाणें वाऱ्यानें आडकणारा दगडी सभामंडप पाहून प्रेक्षकाचीहि मति गुंग होते. वस्तुतः ही सर्व रंगाची करामत असते.. या गुहांचीं प्रवेशद्वारें तर राजवाड्यांच्या प्रवेशद्वारास लाजवतील इतकीं भव्य आणि कलापूर्ण आहेत. केशरचनेच्या ज्या पद्धति आज जगांत अद्यावत् आणि सुंदर समजल्या जातात, त्या सर्व या प्राचीन चित्रांत आहेत. रंगीत कपड्यावरील आणि कागदावरील शेंकडों प्रकारचीं निरनिराळीं डिझाइन्स यांत चित्रित केलेलीं आहेत. आधुनिक नेकटाय, मनीबॅग देखील आपण या प्राचीन लोकांजवळ पाहूं शकतों. भारत देश हा सूवर्णभूमि होता असें म्हणतात. हें खरें असो वा खोटें, परंतु

सोन्याचा नाहीं तरी ज्ञानाचा धूर येथें हमखास निघत होता, हेंच प्रेक्षकास कळतें.

असें म्हणतात कीं, वल्लभभाई पटेल यांनीं आजिंठा आणि वेरुळसंबंधानें पुढील उद्‌गार काढलेले होते: "जिन्होंने वेरुळ और अजिंठा नहीं देखा उन्होंने भारतका कुछ भी नहीं देखा।" अजिंठा आणि वेरुळ पाहून मला हेंच वाटतें. अमीर वा फकीर हीं दोनच प्रकारचीं माणसें हें पाहूं शकतात. कारण भटकणें हें इतरांना त्यांच्या संसारप्रपंचाच्या चक्रव्यूहांत अडकून पडल्यानें शक्य नसतें आणि भटकल्याशिवाय हें दर्शन तर अशक्य !

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९०७९१

मराठी ग्रंथ ... भू-प्रवास
अनुक्रम २६५०८
क्रमांक १७५ नों. दि. २३।३।६०

REFBK-0010791